म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
IRBK-0100282
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २८२
IRBK-0100282

संगीत

# वीरविडंबन नाटक

हें नाटक

## नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एलएल. बी.

संपादक 'केसरी' व 'मराठा'

आणि

'मराठे व इंग्रज' 'आयर्लंडचा इतिहास' 'सुभाषित आणि विनोद'
'ग्यारीबाल्डीचें चरित्र' 'तोतयाचें बंड' 'चंद्रगुप्त'
'कृष्णार्जुन युद्ध' 'अमात्य माधव' 'श्रीसंत भानुदास'
'सरोजिनी' 'नवरदेवाची जोडगोळी'
या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें.

( आवृत्ति पहिली )

सन १९१९

IRBK-0100282

किंमत १ रुपया.

श्री ठाणे, ... शाखा.
२६२
नों. दि. ..............
नाटक

मुद्रक

शंकर नरहर जोशी, 'चित्रशाळा प्रेस'

८१८, सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रकाशक

कृ. स. हर्डीकर, मॅनेजर बलवंत संगीत मंडळी, नागपूर.

# प्रस्तावना

प्रस्तुत नाटकांत पांडव अज्ञातवासांतून प्रगट झाले हा पौराणिक विषय घेतलेला आहे. तथापि, स्वतः कर्तृत्वशून्य असतां पराक्रमाची व्यर्थ बडबड करणारा उत्तर हीच या नाटकांत मुख्य भूमिका योजिली आहे.

'विडंबन' या संस्कृत शब्दाला अनेक अर्थ आहेत. त्यांपैकीं बरेच अर्थ लागू पडणारे प्रसंग या नाटकांत आढळतील. अर्जुनासारख्या वीराला बृहन्नडेचा वेष घेऊन नृत्यगायन करावें लागणें हें वीरविडंबन. उत्तरासारख्या क्षत्रिय राजपुत्रानें वीराचा आव आणणें हें वीरविडंबन. विराटनगरच्या स्त्रियांनीं आत्मरक्षणार्थ हातांत हत्यार धरणें हें वीरविडंबन. प्रत्येक प्रसंगीं अर्थ मात्र वेगवेगळा आहे.

प्रस्तुत नाटकाचा प्रथम प्रयोग 'बलवंत संगीत नाटक मंडळी'नें पुणें येथें ता. १८ जानेवारी रोजीं किर्लोस्कर नाटकगृहांत करून दाखविला.

पुणें. ता० १ फेब्रुआरी १९१९ — न. चिं. केळकर.

ठाणे, ग्रंथसंग्रहालय
२८२
नाटक

# नाटकांतील पात्रें

| पुरुष | स्त्रिया |
| --- | --- |
| राजा विराट | राणी सुधेष्णा |
| कुमार उत्तर | उत्तरा |
| धर्म | द्रौपदी [ सैरंध्री ] |
| अर्जुन [ बृहन्नडा ] | दुःशीला |
| भीम [ वल्लव ] | सुशीला |
| दुर्योधन | कुसुम |
| कर्ण | अनेक स्त्रीसैनिक |
| शकुनी | |
| अमात्य | |
| मधुप | |
| अनेक हेर दूत गोपाल गवई इत्यादि. | |

श्रीशंकर प्रसन्न

# संगीत वीरविडंबन नाटक

## अंक पहिला.

पद १ राग भूप. ताल नेवरा.

शंकरा देइ चिरकाल अभया ॥ दीन नाटक बालकां
या ॥ धृ० ॥ जन रुचिररुचिवरित धरिती वेषा ते ॥
वितरि त्यांवरि तूं निज माया ॥ १ ॥ व्यतिकरिततनु
सकल जगता सांगसि तूं ॥ धरिला पथ भव भय ताराया २

पद २

वंदन तव चरणि असो रंगदेवते ॥ तेजस्वी भरत
पुत्र तव कृपा मूर्ते ॥ धृ० ॥ लक्ष्मीपाति रक्षि पहा
अन्य युगिं सुरां ॥ रूपा धरि मोहिनीच्या श्रीगुणा-
करा ॥ अवतरलें भूवरि या नाट्य तत्व तें ॥ १ ॥

### प्रवेश पहिला

[ दिवाणखान्यांत खुर्च्या वगैरे मांडून ठेवल्या आहेत. एका बाजूस गवईबुवा तबलजी तंबोरा—तबला लावून बसले आहेत. ]

सुमंत:—हं, गवईबुवा, होऊंद्या आतां सुरुवात गाण्याला.

गवई:—पण गाणें ऐकायला पुढें कोणी तरी येऊन बसलें पाहिजे ना ?

सुमंत:—त्याचें तुम्हाला काय ?

गवई:—सभागृहांतल्या या मोकळ्या आसनापुढेंच गाऊं म्हणतां ? माझें गाणें मी स्वतः पुष्कळ वेळां ऐकलें आहे. इथें कुणा तरी थोरा मोठ्या पाहुण्यासमोर गायला मला बोलावलें असेल असें मी समजलों.

सुमंतः–तुमची समजूत बरोबर आहे. आमच्या सरकारचे पाहुणे दुर्योधन महाराज यांच्या करमणुकीकरितां तुमची योजना झाली आहे.

गवईः–फार चांगलें. मग ते येतांच सुरुवात करितों.

सुमंतः–छेः छेः तसें नाहीं तें. दुर्योधन महाराजांचा एक क्षणसुद्धां करमणुकीशिवाय फुकट जातां कामा नये अशी सक्त ताकीद मला झाली आहे. समजा, दुर्योधन महाराज इकडे आले आणि गाणें चालू नसलें तर तो क्षण करमणुकीशिवाय फुकटच जाणार की नाहीं ? ( चुटकी वाजवून ] हं–आटपा, गाण्याला एकदम सुरुवात करा.

गवई––पण रिकाम्या आसनापुढें कसें गावें बुवा ?

सुमंत––तुम्हां धंदेवाईक गवयांना हा काय ? बिदागीची पिशवी तरी तुम्हांला डोळ्यांपुढें दिसते आहे ना ? झालें तर. तीच गाणें ऐकायला समोर बसली आहे असें समजून घ्या. हं–करा सुरुवात. एक क्षणसुद्धां गमावूं नका.

गवई––बरें आहे बुवा ! आमच्या धंद्याच्या वर्मावरच घाव घातलात आतां पुढें काय बोलणार ?

[ गाण्यास सुरुवात करतो; दुर्योधन प्रवेश करितो. ]

दुर्योधन––हा काय प्रकार ? राजा त्रिगर्त कुठें आहे ? शकुनी मामा कुठें गले ? मित्रराज कर्ण अद्यापि कां नाहीं आला ? हा गवई कोण ? आणि हें गाणें कशाकरितां ? [ गवयाकडे पाठ फिरवून बसतो. ]

सुमंतः––[ स्वगत ] दुर्योधन महाराजांना पुरुषाचें गाणें आवडत नाहींसें दिसतें. [ उघड ] महाराजांना हें गाणें आवडत नसलें तर दुसरें तयार आहे. [ शीळ वाजवितो; गाणाऱ्या मुलींचा ताफा पडद्यांतून येऊन नृत्य–गायन करूं लागतो; दुर्योधन त्यांच्याहिकडे पाठ फिरवून बसतो. ]

दुर्यो०ः––[ थोड्या वेळानें उसळून ] कोण बेवकूफ मनुष्य आहे हा? कायरे, हें गाणें बजावणें काय चालवलें आहेस या ठिकाणीं ?

सुमंतः––महाराजांना हें नृत्यगायन आवडत नसेल तर यांच्याहून मोठ्या गाणार–नाचणारणींचा ताफा आहे मजजवळ तयार ! आज्ञा होईल

तर बोलावतों आंत. महाराजांच्या करमणुकीकरितां सर्वप्रकारची सिद्धता आहे. आज्ञा होण्याचाच अवकाश !

दुर्यो०:—[ रागानें उठून ] हरामखोर माझी खुशामत करूं पाहतो. [ त्याच्या तोंडांत देऊन ] चल, आटप हा सगळा बाजार. तुला कुणी सांगितली ही नसती उठाठेव ?

सुमंत:—त्रिगर्त राजांच्याच आज्ञेवरून—

दुर्यो०:—फिरून जीभ लांब करून बोलतो [ त्याच्या तोंडांत देतो ] निघालां कीं नाहीं सर्व इथून ? [ मुली दोन वाटांनीं पळून जातात ] अरे, हा तंबोऱ्या अजून इथंच बसला आहे !

पद ३ राग कामोद ताल एकताला

दुर्यो०:—जाइरे मूर्खा निघोनि जाइरे ॥ करिसी कटुरवा कशाला ? कपिसम ॥ मधुन मधुन उकालिसे वदन रदन ॥ धृ० ॥ पाहीं विनोदा नर जो भुकेला ॥ रमवित जा जा तयासि देइल तो तुज लघुमति धन ॥ ॥ जाइरे० ॥ १ ॥ क्रीडा विलासा मानी मी वमना परी ॥ विभवज्वरिता होइ विनोदहि विषसम सुलभ बहुजरी ॥ जाइरे० ॥ २ ॥

[ तबला पायानें लाथाडून देतो. गवई व तबलजी पळून जातात ]

राजा त्रिगर्त झाला तरी खुषमस्कऱ्याच दिसतो. अशा साधनांनीं हा माझी करमणूक करूं पाहतो काय ? पण क्षुद्र मनाच्या मनुष्याला करमणुकीचे हे असले क्षुद्र प्रकारच सुचावे यांत काय आश्चर्य ? [ सुमंतास ] ए बेवकूफ ! राजा त्रिगर्त कुठं आहे ? बोलतोस कीं नाहीं ?

सुमंत:—त्रिगर्तराज आतां इतक्यांत येतील तोंवर आपली करमणूक—

दुर्यो०:—फिरून करमणुकीची गोष्ट बोललासच. चल चालता हो. इथून, आणि त्रिगर्त राजाला इकडे पाठवून दे. ( सुमंत जातो ) करमणूक ! आतां कसली करमणूक ? पांडवांचा वनवास आणि माझी करमणूक एकदमच संपली. अज्ञातवासी पांडव कुठं आहेत हें जोंपर्यंत कळत नाहीं तोंपर्यंत मीहि राजपदारूढ आहे कीं त्या पदापासून भ्रष्ट झालों हें

कसें कळणार ? पांडवांचा अज्ञातवास यशस्वी रीतीनें संपला कीं माझा वनवास सुरू होणार.

पद ४ राग बिहाग ताल त्रिताल.

दुर्यो०:—विधिची क्रीडन रीती विपरीत खरी ॥
मनुज बुडवितो मधुनि मधुनि तो असुख निर्झरीं ॥
दृढ बांधोनी भोग गुणांनीं घटियंत्रीं ॥ धृ० ॥
विपदा तरुनि उठतिल पांडव मीं कौरववर होईन तृणसम
कोण पुसे मग मजला । जगही धिःकारी ॥ १ ॥ दैव० ॥

[ त्रिगर्त प्रवेश करतो. ]

राजा त्रिगर्ता, आदरातिथ्याचे तुझे हे प्रकार आतां पुरे झाले. मी करमणुकीकरतां इथपावेतो तुझ्या नगरीला आलों नाहीं.

त्रिगर्त:—नाहीं महाराज, मी तरी असें कसें म्हणेन ? पण आपल्यासारख्या अधिराजांचें पाय माझ्या घराला कशानें लागणार ! आपण माझ्या घरीं आला आणि मी आपलें आदरातिथ्य केलें नाहीं तर मला कसें बरें वाटेल ?

दुर्यो०:—मला बरें वाटावें अशीच तुझी इच्छा असेल तर त्याला फक्त एकच मार्ग आहे.

त्रिगर्त:—महाराजांच्या तोंडांतून शब्द निघण्याचाच अवकाश, मी तो ताबडतोब पुरा करीन. आज्ञा व्हावी.

दुर्यो०:—राजा, हें बोलणें फार सोपें पण करणें फार दुष्कर आहे.

त्रिगर्त:—आपल्या कृपेनें मला दुष्कर काय आहे ?

दुर्योधन:—फक्त एकच गोष्ट.

त्रिगर्त:—ती कोणती ?

दुर्योधन:—अज्ञातवासी पांडवांचा शोध.

त्रिगर्त:—आहे खरीच. पण मी पांडवांच्या शोधांतच आहें.

दुर्योधन:—नुसतें शोधांत राहिल्यानें माझें समाधान कसें होणार ? तो शोध सफळ व्हायला नको काय ? मी सुद्धां याच शोधांत आज कैक महिने घालविले; पण आतां मात्र मी निराशेच्या दुःखानें वेडा होऊं लागलों आहें.

त्रिगर्त:—महाराजांची ! आणि निराशा ? अशी गोष्टच कधीं होणार नाहीं. कर्णराजांचो ईर्षा, शकुनीमामांचें चातुर्य, हीं जोपर्यंत आपल्या बाजूला आहेत तोंपर्यंत पांडव पाताळांत दडून बसले असले तरी त्यांचा शोध लागल्याशिवाय राहणार नाहीं.

दुर्यो०:—होय. माझ्या सुदैवाप्रमाणें या माझ्या स्नेह्यांच्या व उपकारकर्त्यांच्या प्रयत्नावर माझी भिस्त आहे. पण पांडवांच्या अज्ञातवासाचे आतां अवघे तीन महिने शिल्लक उरले आहेत. या तीन महिन्यांत जर शोध लागला नाहीं तर पांडव राजरोस रीतीनें पुढें येऊन आपलें राज्य मागतील व मला तें त्यांच्या स्वाधीन करावें लागेल !

त्रिगर्त:—तीन महिन्यांत इकडची पृथ्वी इकडे होईल. महाराजांनीं चिंता करण्याचें कांहीं कारण नाहीं. हे पहा, कर्णराज आलेच.

कर्ण:—( प्रवेश करून ) मित्रा सुयोधना, तुझा विजय असो.

दुर्यो०:—मित्रा, पांडवांचा अज्ञातवास यशस्वी होऊं पहात आहे. त्यांचे हितचिंतकहि त्यांना असाच आशीर्वाद देत असतील नाहीं ?

कर्ण:—मित्रा, सुराज्यव्यवस्थेनें तूं आपल्या समस्त राज्यांतल्या प्रजेला इतका प्रिय होऊन राहिला आहेस कीं, पांडवांना विजयी होण्याचा आशीर्वाद देणारा एकही हितचिंतक आजच्या घटकेला उरला असेल असें मला तरी वाटत नाहीं. पण तें असो. मी तुला एक आनंदाची बातमी सांगायला आलों आहें.

दुर्यो०:—ती कोणती ?

कर्ण:—कीचकाचा वध नुकताच झाला.

दुर्यो०:—काय ! कीचकाचा वध झाला ?

त्रिगर्त:—[ आनंदानें ] अहाहा ! फार छान झालें. माझा जन्माचा शत्रु नाहींसा झाला.

दुर्यो०:—आपल्या मित्रांच्या शत्रूचें निर्दालन होणें हें इष्टच आहे. त्रिगर्ता मी तुझें अभिनंदन करितों.

कर्ण:—सुयोधना, तूं एकट्या त्रिगर्त राजाचेंच काय पण या बातमीमुळें स्वतःचेंहि अभिनंदन करणें योग्य आहे.

दुर्यो०:—तें कसें ?

कर्ण:—कीचकाचा वध झाला खरा; पण तो कां कसा व कुणी केला याकडे लक्ष दिलेंस तर तुला स्वतःचें अभिनंदन करण्याचेंहि कारण कळून येईल.

दुर्यो०—मित्रा, दुःखाप्रमाणें आनंदाचीहि बातमी कोणाला एकदम सांगून टाकूं नये, सांगत सांगत सांगावी असें तुझें मत दिसतें. पण हा सुयोधन दुःखाप्रमाणें सुखाच्याहि कामीं एकभोजी आहे. त्याला सर्व सुखाचा व सर्व दुःखाचा ग्रास एकदम कारितां येतो हें तूं विसरलास ? सांग, तुझी बातमी सर्व एकदम सांगून टाक.

कर्ण:—कीचकवध झाला त्याचा प्रकार फारच अद्भुत आहे. विराट राजाच्या पदरीं सैरंध्री नांवाची एक सुंदर दासी आहे, तिच्यावर कीचक बलात्कार करण्याला प्रवृत्त झाला म्हणून त्याचा खून झाला.

दुर्यो०—राजदरबारच्या सुंदर दासींवर बलात्कार नेहमींच होतात; पण त्याकरितां खून सहसा होत नाहींत.

कर्ण:—अगदीं बरोबर. शिवाय, खून झाला तो कीचकासारख्या दहा हत्तींच्या बळाच्या योद्ध्याचा, आणि तोही द्वंद्वयुद्धांत; इतकेंच नव्हे तर तोहि इतक्या सफाईनें झाला कीं भर राजवाड्याच्या संगीतशाळेंत मध्यरात्रीं हा खून झाला. तरी त्याचा पत्ता मुद्दा किंवा चाहूलहि कुणाला लागली नाहीं.

दुर्यो०:—विराट राजाच्या दरबारीं कीचकाचा खून करण्यासारखा धाडसी किंवा बलवान् वीर कोणी असेल असें मला वाटत नाहीं.

कर्ण:—विराटाच्या दरबारींच काय, पण इतर राजदरबारींसुद्धां असा प्रबल योद्धा सांपडणें शक्य नाहीं.

दुर्यो०:—नसेल, पण मला आनंद वाटण्यासारखें यांत काय आहे !

कर्ण:—मित्रा, तुला सुखदुःखाचा ग्रास एकदम करतां येतो; पण कोणत्याही गोष्टींत अनुमान मात्र एकदम बांधतां येत नाहीं असेंच म्हणावें लागतें. कीचकाचा वध करूं शकेल असा वीर मला तरी एकच दिसतो.

दुर्यो०—तो कोणता ?

कर्ण—द्वितीय पांडव भीमसेन. माझा तरी तर्क असा चालतो की, हा खून–हें भयंकर कर्म–भीमसेनानेंच केलें. अर्थात् भीमसेन विराट नगरच्या आसपासच कुठें तरी असला पाहिजे. आणि एकट्या भीमाला आपण ओळखून काढलें तरी सर्व पांडवांना फिरून बारा वर्षें वनवासाला जावें लागेल !

दुर्यो०:—भीमसेन समोर आल्यावर त्याला नुसतें ओळखून काय उपयोग ? त्याच्याशीं गदायुद्ध करण्याला हे पहा माझे बाहू कसे स्फुरण पावत आहेत.

कर्णः—भीमसेन समोर आल्यावर मग महायुद्ध होईल; पण तो समोर कसा येणार ?

दुर्यो०:—याची तोड शकुनीमामाच कांहीं सांगू शकतील.

शकुनी:—[ प्रवेश करून ] हा पहा मी शकुनी तेंच सांगायला आलों.

[ सर्व उठून उत्थापन देतात. ]

सुयोधना, कर्णा, पांडव संशोधनाचें आपलें कार्य सफळ होणार ! मात्र मी सांगतो ती युक्ती करा.

दुर्योधन—पांडवांना पहिला वनवास घडविण्याची युक्ति ज्यांना सुचली त्यांनाच पांडवांना फिरून वनवास घडविण्याची युक्ति सुचणार हें काय सांगायला पाहिजे ?

शकुनीः—युक्ती फारच सोपी आहे. फाशांचा आवाज ऐकतांच जुगारी मनुष्य आपलें देहभान विसरतो, स्त्रियांच्या कांकणाचा आवाज ऐकतांच कामी मनुष्य आपले कान टवकारतो, त्याचप्रमाणें शस्त्रास्त्रांचा खणखणाट किंवा रणदुंदुभीचा आवाज ऐकतांच खरा वीर पुढें सरसावल्याशिवाय राहात नाहीं हा सामान्य नियमच आहे. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं, तशीच ती त्याच्या मरणालाहि कारणीभूत होते.

दुर्यो०:—पण आपण यापूर्वीं सर्व राजे पादाक्रांत करून मांडलीक बनवून सोडले असल्यानें आतां आम्हीं रणसंग्राम तरी कुणाशीं मांडूं शकणार ?

शकुनी:—भांडण करणाराला प्रतिपक्षाची वाण केव्हांच पडत नाहीं. कलहप्रिय मनुष्यानें जुने शत्रु संपले तरी नवीन शत्रु निर्माण केले पाहिजेत. विराट राजा पांडवांचा पक्षपाती आहे ही गोष्ट तुला माहीतच आहे.

दुर्यो०:—पण असल्या क्षुद्र शत्रूवर हत्यार उपसणें यांत माझ्या सारख्याला भूषण तें कोणतें ?

शकुनी:—ही वेळ भूषण पहाण्याची नसून कार्य साधण्याची आहे.

कर्ण:—पण विराट राजावर स्वारी करण्याला जगाला दाखविण्यासारखें कारण तरी पाहिजेना ?

त्रिगर्त:—महाराज, या कामीं मी एक तोड सुचावितों. पूर्वी कीचकाच्या बळावर विराटानें माझ्या राज्यावर स्वारी करून मला दांतीं तृण धरायला लाविलें होतें. कीचक जिवंत असेपर्यंत मला त्याच्यावर सूड घेतां आला नाहीं. आज कीचक मारला गेल्यावर मी विराटावर सूड घेण्याला कां प्रवृत्त होऊं नये ?

शकुनी:—मी हीच तोड सुचविणार होतों.

दुर्यो०:—मग त्रिगर्त तें काम उरकण्याला एकटा पुरे आहे [illegible]

कर्ण:—पण असल्या क्षुद्र प्रतिपक्षांच्या भांडणांत भीमसेन पुढें येऊन प्रगट होईल असें मला वाटत नाहीं.

शकुनी:—सुयोधना, कर्ण बरोबर बोलला. कौरवांचा संबंध थोडाबहुत आल्याशिवाय भीमसेनाला आत्मघातकी स्फुरण येणार नाहीं. माझा बेत असा आहे कीं, त्रिगर्तांचे पाहुणे म्हणून आपण त्याच्या बरोबर विराटनगरच्या आसपास शिकारीला जावें. शिकार करतां करतां त्रिगर्तानें विराटाचा गौळवाडा लुटावा. अर्थात् विराट राजा त्याला प्रतिबंध करायला येईल, तसें झालें ह्मणजे आपण युद्धांत सामील होऊं, आणि सुयोधन युद्धांत सामील झालेला पाहतांच भीमाला पराक्रम दाखविण्याची संधि साधावीशी वाटेल.

दुर्यो०:—एकंदरीनें, म्हटलें तर हें युद्ध आहे, म्हटलें तर नाहीं.



दुर्योधनः—एकदम विराट नगरावर आपण चालून गेलों तर ?— [ पृ. ९.

कर्णः—सुरवातीला तें युद्ध नाहीं, येवढ्यावरून आपणावरचा युद्ध करण्याचा अपवाद टळेल. शिकारीला व मर्दानी हुल्लडीला युद्धाचें स्वरूप आलें तर आपला कार्यभाग तेवढा साधून अपवाद उरणार नाहीं.

दुर्यो०:—मी अपवादाला जुमानीत नसतों. ( हंसून ) मग काय ? मित्रा त्रिगर्ता, नाहीं नाहीं ह्मणतां तुझ्या हातची करमणूक मला स्वीकारावी लागणार !

त्रिगर्तः—माझी इच्छा येऊन जाऊन तेवढीच होती. पण शकुनीमामांच्या युक्तीनें आपली करमणूक करण्याबरोबर माझा सूडही साधणार !

[ दूत प्रवेश करतो ]

दूतः—पांडवांचा माग विराटनगरापर्यंत लागला महाराज.

शकुनीः—सुयोधना, एकूण माझे प्रयत्न यशस्वी होणार असें दिसतें. बरें पुढें ?

[ दुर्योधन व कर्ण एकमेकांच्या हातावर टाळी देतात. ]

दूतः—पुढें मात्र तो माग गुप्त झाला.

दुर्यो:—तर मग पांडव खचित विराटनगरांत किंवा त्याच्या आसपास असले पाहिजत. अशा स्थितींत अप्रत्यक्ष मार्गाचा अवलंब न करितां एकदम विराटनगरावरच आपण चालून गेलों तर ?

शकुनीः—बिकट व नाजूक परिस्थितींत प्रत्यक्षापेक्षां अप्रत्यक्ष मार्गाचाच अवलंब अधिक श्रेयस्कर असतो. पांडवांना हुडकून काढून धरण्याकरितां आपण विराटनगरावर चालून गेलों तर पांडवांना आपल्या हेतूचा संशय येऊन ते सावध होतील. स्वतः बेसावध आहों असें दाखविल्यानें शत्रूही बेसावध राहतो.

पद ५ ठुंबरी पंजाबी.

शकुनीः—गूढा कपट नीति ।। प्रहरण जगतीं ।।धृ०।। केसरि
जरि विक्रमबल ।। तरि नमवी निज भुजदल ।। ही
वधरीति ।। १ ।। लपुन छपुन वन पल्लव जालीं ।। वाजुं
न दे अणुही पदतळ ।। गज बाले अति ।। २ ।।

कर्ण:—मित्रा, शकुनीमामांचें म्हणणेंच मला अधिक ग्राह्य वाटतें.

दुर्यो:—ठीक आहे. जसें तुम्हां दोघांना वाटेल तसेंच करा.

शकुनी:—त्रिगर्ता, विराटाचे दोन गोळवाडे उत्तर व दक्षिण दिशेला आहेत ना ?

त्रिगर्त:—होय महाराज.

शकुनी:—तर मग आपणाला दोहोंकडून एकदम मारा केला पाहिजे. चला. हा कपटाचा फासा कसा टाकावयाचा हें मी सर्व ठरवितों.

त्रिगर्त:—सुयोधन महाराजांचें थोडेंबहुत कार्य मजकडून झाल्यास मी धन्य होईन. [ सर्व जातात. ]

---

## अंक १ प्रवेश २

[ दु:शीला आणि सुशीला प्रवेश करितात. ]

दु:शीला:—या मेल्या सैरंध्रीला कुठें सोधावी कुणाला ठाऊक ?

सुशीला:—मेल्ये सोधीनास कां आणखी चार ठिकाणीं ? सोधलीस तर तुझे पाय मोडतील वाटतें ? राजवाड्यांत सुग्रास अन्न खातेस तें पचूं दे थोडें पायीपटी करून.

दु:शीला:—तूं कांग असा तिचा कैवार घेतेस नेहमीं ?

सुशीला:—तूं कांग अशी तिच्या पाठीस लागतेस हात धुवून नेहमीं ?

दु:शीला:—अग कां म्हणजे काय ? ही पांढऱ्या पायाची बया या राजवाड्यांत आल्यापासून आम्हीं इतर दासी अगदीं निस्तेज झालों आहों. तिच्यामुळें संकटें तरी काय थोडीं आलीं ? तिच्यापायीं कीचक महाराजांचा खून सुद्धां झाला. इचे नवरे म्हणे पांच गंधर्व आहेत. कोण भयंकर अवदसा ही ! तिला पाहिलें कीं मला भीतीच वाटते.

सुशीला:—तिचें तेज आहेच तसें !

दु:शीला:—तिच्या तेजानें राजवाड्यांत खून तर झालेच. आता राजवाड्याला आग लागावयाची तेवढी बाकी उरली आहे !

सुशीला:—मी तर म्हणते कीं, कीचक महाराजांचा खून झाल्यानें राजवाड्यांतल्या सगळ्या पतिव्रतांचा हृद्रोग टळला. आणि वाडा जळून जाता

तरी मी म्हटलें असतें कीं, कीचकासारख्या अधमानें विटाळलेली ही वास्तु बरी पवित्र झाली !

दुःशीलाः—आपल्या सुदेष्णा राणीसाहेब तिला या खुनानंतर राजवाड्यांतून हांकून द्यायला तयार झाल्या होत्या; पण आतां पहातें तों फिरून तिला कांहीं दिवस ठेवून घ्यायचा हुकूम झाला आहे. तुझें माझें पटेना आणि तुझ्यावांचून गमेना अशांतली गत झाली म्हणायची.

सुशीलाः—राणीसाहेबांनीं केलें तेंच बरोबर आहे. त्यांना माणसाची परीक्षा तुझ्यापेक्षां पुष्कळ चांगली आहे.

दुःशीलाः—बरें बाई. घालीनात कां गळ्यांत गळा त्या अवदसेशीं ! मी काय आपली सांगितल्या कामाची.

सुशीलाः—मग हें ठाऊक होतें तर कशाला आपली बेताल जीभ इतका वेळ वेडेंवाकडें बोलून नाचवलीस ?

दुःशीलाः—मेलं मनांत येतें तें बोलल्याशिवाय राहवत नाहीं. तूं सैरंध्रीची जिवलग मैत्रीण. तुझ्याजवळ कुठून बोलायची बुद्धि मला झाली कुणाला ठाऊक ? बरें पण सांगतेस का सैरंध्री कुठें आहे ती ? तिला शोधला वेळ लागला म्हणजे राणीसाहेब माझ्यावर एवढे डोळे करतील.

सुशीलाः—अश्शी, आतां कशी आलीस वठणीवर ? अग आपल्याला दासींचा जन्म आला म्हणून अशी माणुसकी सोडूं नये हो. सैरंध्री कोणीहि असो. पण दासीच्या जन्माला खचित आलेली नाहीं. आपणासारख्या बायका तिच्या दासीच्या दासी शोभतील बरें. मी म्हणतें तेंच पुढें मागें केव्हां तरी खरें ठरेल बघ.

दुःशीलाः—बरें हो ! तिचा स्नेह संपादून एखादा तरुण गंधर्व नवरा करून घ्यायचा असेल तर घे. माझी ना नाहीं. पण आधीं सैरंध्री कुठें पाहिलीस तें सांगशील का ?

सुशीलाः—मला नाहीं माहीत. ती राजवाडा सोडून बाहेर थोडीच गेली असेल. चार पावलें आणखी हिंड म्हणजे सांपडेल. मला तुझ्याशीं हुजत घालायला वेळ नाहीं समजलीस ? ( दोघी दोहों बाजूंनीं जातात. )

---

## अंक १ प्रवेश ३

[ संगीतशाळेची एक खोली. हातांत पक्वान्नाचे ताट घेतलेला भीम प्रवेश करतो. ]

**भीमः**—धिःकार असो या अज्ञातवासाला. कीचकाचा वध करून देवी द्रौपदीवरचें संकट टाळल्यापासून तिला भेटावें आणि अभिनंदनपर समाधानाचे दोन शब्द बोलावे म्हणून आज दहा अकरा दिवस आटोकाट प्रयत्न केला; पण व्यर्थ. तिला भेटण्याचे निरनिराळ्या चार ठिकाणीं चार मित्रांनीं संकेत केले; पण ते सारे फुकट गेले. आयत्या वेळीं कांहीं तरी काम निघून तिला सत्तेनें कोणी तरी हांक मारून हाताला धरून ओढून नेई. आज सुदैवानें इकडे येण्याला वरी संधि मिळाली. मी बोलून चालून सैंपाकघरचा धनी, संगीतशाळेकडे मी कसा येणार ? पण आज संगीतशाळेंत होणाऱ्या समारंभाच्या वेळीं पक्वान्नें खाण्याची उत्तराला लहर आली त्यामुळें इकडे येण्याला फावलें. पण मी आलों म्हणून द्रौपदी कशी येणार ? कीचकाची पीडा तिच्यामागें लागल्यापासून तिचा चेहरा कोमेजल्या कमळासारखा म्लान व निस्तेज झाला होता. आज ती दृष्टीस पडली तर त्या चेहऱ्यावर फिरून पूर्वीची टवटवी पाहून मला किती तरी आनंद होईल. अे हो ! दैवा, शाबास. तुला शतशः धन्यवाद असो. ही पहा द्रौपदीच इकडे येत आहे. देवी द्रौपदी—

[ हातांत पुष्पांच्या माळा घेऊन द्रौपदी प्रवेश करिते. ]

पद ६ चाल—राग केदारा ताल त्रिताल.

द्रौपदीः—काय देवा अजुनी येत तुजला । दया नाहीं ना ।
दया नाहीं ना ।। आस मात्र धरिली मनिं ।। परि सोसेना
गुप्त वास हा मला ।। धृ० ।। राहुनि पर गृहिं मळवुनि
काया ।। दासी कर्मी पांडव जाया ।। शिणतां कृष्णा
केवि पाहवे तुला ।। १ ।।

**भीमः**—देवी द्रौपदी—

**द्रौपदीः**—[ साशंक मुद्रेनें इकडे तिकडे पाहून ] महाराज, काय हा अविचार ! माझें नांव घेऊन आपण येवढ्या मोठ्यानें हाक मारतां ती कोणी ऐकेल ना ?

भीमः—देवी, अविचार हेंच या भीमाचें भीमपण.

द्रौपदी—महाराज, फिरून तेंच. माझें नांव न घेतां आपण आपलें स्वतःचें नांव मोठ्यानें उच्चारलें तरी तें तितकेंच अनिष्ट आहे.

भीमः—देवी, अनिष्ट संपलें. दुष्ट कीचकाचा मी वध केला तोच आपल्या अज्ञात वासाच्या समाप्तीचा मुहूर्त. कुलगुरूंनीं नुकताच दादांना गुप्त निरोप पाठविला आहे कीं, चांद्रमासांच्या कालगणनेनें आपल्या अज्ञातवासाचे आतां अवघे चार दिवस राहिले आहेत.

द्रौपदीः—चार दिवसच काय, पण अज्ञातवासाची एक घटकाहि आपला वनवास फिरून उभा करायला पुरेशी नाहीं काय ?

भीमः—होय देवी. पण कीचकाचा वध केल्यानंतर तुझ्याशीं झालेल्या या पहिल्या भेटीच्या आनंदांत मला सावधगिरीचा विसर पडणें साहजिकच नाहीं काय ? देवी बोल, कीचकाचा वध झाल्यानें आतां तूं निष्काळजी झालीस ना ?

द्रौपदीः—होय. पण त्या वधानें फिरून एक संकट माझ्यावर येऊं पहात होतें.

भीमः—तें कोणतें ?

द्रौपदीः—माझे पाठीराखे गंधर्व आहेत असें मला सांगावें लागलें. त्याबरोबर सुदेष्णा राणीसाहेब भ्याल्या. फिरून हे गंधर्व आणखी काय अरिष्ट आणतील न जाणे असें ह्मणून त्यांनीं मला नगर सोडून जाण्याची आज्ञा केली.

भीमः—मग ?

द्रौपदीः—मी त्यांच्या हातापायां पडलें, रडलें, पदर पसरून भिक्षा मागितली तेव्हां दया येऊन आणखी पंधरा दिवसांची मुदत मला मिळाली.

भीमः—आतां पंधरा दिवसाचेंही काम नाहीं. जिंकला, आह्मी अज्ञातवास जिंकला. देवी द्रौपदी—

द्रौपदीः—( घाबरून ) महाराज, आपण फिरून अविचारांत शिरून मला माझ्या नावानें हाक मारली हें बरें का ? कीचकवधानें आपणाप्रमाणें मलाहि आनंद झाला आहे. पण बेसावधपणाचा एकहि क्षण आपणाला फिरून वनवास आणि अज्ञातवास घडवील, हें लक्षांत आहे ना ? महाराज हळू बोला.

भीमः—कीचकाच्या रक्तानें माखलेले हात तसेच ठेवून या अज्ञातवासांतून बाहेर पडून त्या हातांनीं तुझ्या या कष्टपीडित देहाला मला कुरवाळायला सांपडतें तर मी धन्य झालों असतों. पण नाहीं. तें सुख दैवांत नाहीं. फिरून ते हात मला सैंपाकघरच्या खरकट्यांत भरावे लागले.

द्रौपदीः—( घाबरून ) निघा महाराज इथून निघा. कोणाचाशी चाहूल आली वाटतें.

[ भीम पक्वान्नांचें ताट उचलून घेतो. ]

दुःशीलाः—( पडद्यांतून ) सैरंध्री, अग ए मेल्ये सैरंध्री. तूं आहेस तरी कुठें ?

द्रौपदीः—( भीमास ) महाराज, राजवाड्यांतली ही गजघंटा आली वाटतें इकडे. आपण निघून जा. ( मोठ्यानें ) ये हो दुःशीले. मी इकडे आहें बरें का ? ( भीमास ) एकाचे अकरा करणारी ही सगळ्या दासींतली चटोर दासी. महाराज, आपण जा कसे. ( मोठ्यानें ) दुःशीले, ये इकडे माझा हात गुंतला आहे. ( भीमास ) महाराज, आपणाला इथें पाहून ती कांहीं तरी टाकून बोलेल. तो अपमान मला दुःसह होईल.

भीमः—अपमान ! अज्ञातवास हें अपमानाचें माहेरघर. त्याला भिऊन काय होणार ? पण अज्ञातवास संपत आला असें दिसूं लागल्यापासून अपमानाचें मला उलट कौतुकच वाटूं लागलें आहे. आजवर झालेल्या अपमानापेक्षां अधिक दुःसह असा अपमान ही बिचारी दासी, तो काय करणार ?

दुःशीलाः—( प्रवेश करून ) सैरंध्री, मेल्ये इकडे ग काय करीत होतीस ? आणि हा कोण ? हा तर बल्लव. काय कुजबुजतेस त्याच्याशीं ? सांपडेल त्या पुरुषाशीं कुजबुजण्याच्या तुझ्या सवयीनें झाले तेवढे तुझे धिंडवडे पुरे नाहींत वाटतें ?

द्रौपदीः—अग कुजबुजणें कसलें ? या फुलांच्या माळा संगीतशाळेकडे नेत होतें त्या जरा एकमेकांत गुंतल्या. त्या सोडवायला मदत करा ह्मणून बल्लवराजांना सांगत होतें दुसरें काय ?

दुःशीलाः—अहाहा, काय पण सोज्वळ संपादणी करते आहेस ! जसें कांहीं कोणी खरेंच म्हणेल. नाजुक फुलांच्या माळांची गुंतागुंत झाली आणि ती म्हणे सोडवायला हा धटिंगण मदत करणार ! मोठा नाजुक कीं नाहीं. मेल्याचीं बोटें पहा, या लतामंडपाच्या खांबायेवढालें आहे एकेक. त्यांनीं कां हा फुलांच्या माळांची गुंतागुंत सोडविणार ? नाजुक ग बाई अगदीं नाजूक. बल्लवा, मेल्या, मणाचा भात ढवळायचा तो पळा आणायचा होतास, नाहीं तर मणाच्या पोळ्या लाटायचें तें लाटणें. ह्मणजे त्यांनीं या गुंतलेल्या फुलांच्या माळा चांगल्या सोडवितां आल्या असत्या !

भीमः—काय दुःशीलाबाई, मी नाजूक नाहीं म्हणतां ? मला तर वाटतें कीं माझ्याइतका नाजुक या साऱ्या अंतःपुरांतहि कोणी नसेल. तुमच्या डोळ्यांतलें काजळ या नाजुक बोटांनीं काढून दाखवूं कां ? तुमच्या ओंठावरचा विड्याचा रस ओंठ न दुखावितां पुसून दाखवूं कां ?

द्रौपदीः—बल्लवराज, ही दुःशीला आली माझें काम झालें. तुह्मी जा बरं का आतां ? [ भीम जातो ]

दुःशीलाः—मी जसें कांहीं तुझें कामच करायला आलें असेन ! गुंतेनात का तुझ्या फुलांच्या माळा. खाशील शिव्या राणीसाहेबांच्या. तूं त्यांची आवडती दासी. शिव्या खाल्यानें आणखी आवडती होशील. मी राणीसाहेबांचा नुसता निरोप सांगायला आलें आहें तुला.

द्रौपदीः—काय निरोप आहे ? काय आज्ञा आहे राणीसाहेबांची मला ?

दुःशीलाः—निरोप असा आहे कीं आणखी अर्ध्या घटकेनें संगीत-शाळेंत फुलांच्या माळांचीं तबकें भरून तयार पाहिजेत. जर चुकलीस तर माझ्या कामाला पडायचें नाहीं अशी सक्त ताकीद आहे त्यांची.

द्रौपदीः—अगबाई. खरंच कां ? या मेल्या माळा एकांत एक गुंतल्या त्या सुटतील तरी कशा ? दुःशीले मदत करतेस का मला जराशी ?

दुःशीलाः—माझें अडलें आहे खेटर तुला मदत करायला. शाबासकी घेणार तूं आणि मदत करावी मी ? खासा न्याय ! ज्यानें करावें त्यानेंच भरावें. येणार-जाणाऱ्या पुरुषाकडे नजर लाविली नाहीं ह्मणजे हातांतल्या माळा गुंतत नसतात. ही पहा मी चाललें. निरोप सांगितला, माझें काम झालें. [ फणकाऱ्यानें जाते ]

द्रौपदीः—चांद्रमासाच्या कालगणनेनें अज्ञातवास आणखी चार दिवसांनीं संपणार; मग चांगलीशी संधी पाहून प्रगट व्हावयाला हरकत नाहीं असा कुलगुरुजींचा गुप्त निरोप धर्मराजांना आला. तो अर्जुनजींना गुप्तपणें कळवायला मला त्यांनीं सांगितलें. समारंभाच्या आधीं संगीतशाळे-च्या वाटेवर अर्जुनजी भेटतील, या आशेनें मी कांहीं तरी बहाणा करून इकडे आलें; तों अर्जुनजींच्या आधीं भीमसेनच भेटले. बरें, कीचकाचें संकट या अज्ञातवासांत अशा रीतीनें निवारायला त्यांच्याशिवाय कोण समर्थ होता ? ह्मणून कृतज्ञताबुद्धीनें त्यांना भेटून आपल्या आनंदाश्रूंनीं त्यांचे पाय भिजवावे असें पुष्कळ वेळां मनांत आलें; पण मनाजोगें घडून आलें तर मग तो अज्ञातवास कसला ? पण सुदैवानें त्यांची दृष्टभेट तरी झाली आणि दोन शब्द बोलायला सांपडले. अगबाई, हें अर्जुनजीहि इकडे आलेंच वाटतें.

अर्जुन—[ प्रवेश करून ] ( हळूच ) देवी द्रौपदी, कीचकवधा-मुळें संकटाचें ग्रहण सुटलेल्या तुझ्या या मुखचंद्रिकेला मी प्रेमप्रणाम करितों.

द्रौपदीः—[ इकडे तिकडे पाहून ] ( गहिंवरून ) महाराज हें काय बरें असें बोलतां ? मी संकटमुक्त झाल्याची आनंदाची बातमी आपणाला कळवून या पूर्वींच आपल्या पायावर डोकें ठेवायला धांवत यायला पाहिजे

होतें, आणि मी येण्याचा पुष्कळदां प्रयत्नही केला; आपली एकांती गांठ पडण्याचा योगच येईना. पण आज संगीत शाळेच्या समारंभाच्या गडबडींत आपली ओझरती गाठ पडेल या आशेनें मी इकडे आलें. आपण मला प्रणाम करावयाचा, कीं मी आपल्याला ?

अर्जुनः—देवी तुझ्या पातिव्रत्याच्या तेजामुळेंच असल्या प्रचंड संकटाचें अशा यशस्वी रीतीनें निवारण झालें. तूं आह्मा पांडवाची नुसती धर्मपत्नी नसून भूषण आहेस. पति हा जसा पतिव्रतेचा देव तशीच पतिव्रता पत्नी ही पतीची देवता. मी तुला पवित्र अंतःकरणानें प्रणाम कां करूं नये ?

द्रौपदीः—असो; महाराज, हा एकांत क्षणभरहि टिकण्याची शाश्वती नाहीं. कोणीं येऊन आपल्या एकांताचा भंग केला नाहीं तोंपर्यंत धर्मराज महाराजांचा गुप्त निरोप आपणाला सांगून टाकूं दे.

अर्जुनः—( उत्सुकतेनें ) दादांचा काय गुप्त निरोप आहे ?

द्रौपदीः—कुलगुरुजींनीं त्यांना असा निरोप गुप्तपणानें पाठविला आहे कीं, येत्या सप्तमी तिथीला आपला अज्ञातवास पुरा होतो. मग योग्य संधि पाहून प्रगट व्हावयाला हरकत नाहीं. महाराज, आमचा हा खडतर अज्ञातवासयोग खरोखरच आतां संपणार ना ? [ रडूं लागते ]

अर्जुनः—द्रौपदी, अज्ञातवास संपायचा अवघ्या चार दिवसांवर आला असें मला तूंच सांगतेस आणि तूंच अश्रुपात करितेस !

पद ७. चाल—हम लारा माता.

**उरला थोडा गूढ वास पांचाळी ॥ ध्रु० ॥ सरली घोरा**
**रजनी उगवे यश तरणी ॥ पांडव मंगल भाळ तळीं ॥**
**उरला ॥ १ ॥ घर्षण निकर्षीं घडतां सुवर्ण दिपवी**
**नयना ॥ क्लेशाचि होती बहु सुफली ॥ २ ॥**

द्रौपदीः—संकट समोर उभें राहिलें असतांना हृदयावर दडपण पडल्यानें अश्रु येत नाहींत; पण संकट दूर होण्याच्या बेताला मनाला हलकें वाटून अश्रु येतात. महाराज, संकटें सोसावीं पुरुषांनीं आणि मन उदार

करून लोकोत्तर विचारांनीं स्वतःचें समाधानहि करावें पुरुषांनींच. धन्य त्यांची! आम्हा बायकांना अबला हेंच नांव योग्य आहे. आम्ही स्वतः निर्बळ त्या निर्बळ असून शिवाय पुरुषांनाहि आम्ही दुःख विलापांनीं निर्बळ करितों. आणि हें सारें कळत असूनही आमचे दुःखविलाप आह्माला आवरत नाहींत. पण महाराज, मी दुःख करितें तें माझ्या स्वतः करितां नव्हे, तर आपली ही दुर्दशा पाहून. आपल्यासारख्या वीराला असा वेष धारण करावा लागावा आणि आपली अशी विटंबना व्हावी हें देवाला कसें आवडलें?

अर्जुनः—देवी, देव कधीं आला होता मला सांगायला कीं तूं असला बृहन्नडेचा वेष घे म्हणून? त्याला कां वरं दोष लावतेस? केवळ आत्मरक्षणाचा एक सोपा उपाय म्हणून स्वेच्छेनें मी तो घेतला. मला तर वाटतें कीं, हा वेष मला घ्यावा लागला हें एका परीनें फार बरें झालें.

द्रौपदीः—तें कसें महाराज?

अर्जुनः—लोकांनीं मला सर्व जगांतला श्रेष्ठ वीर असें नित्य ह्मणावें, आणि या स्तुतीच्या मद्यानें मीहि गुंग होऊन जाऊन स्वतःला श्रेष्ठ वीर मानूं लागलों होतों. आणि असें होतां होतां, देवी, अहंकाराचा दुर्धर रोगच मला जडल्यासारखा झाला होता. तो रोग हटावा म्हणून बृहन्नडा वेषाचें हें औषध मी जाणून बुजून घेतलें. उपोषणानें जसें अजीर्ण हटतें किंवा तीक्ष्ण अंजनानें जसा उन्माद वायू उतरतो, तसाच हा अर्धनर नारीचा वेष मला गुणकारी झाला. अज्ञातवास घडविणाऱ्या दुर्योधनाचे हे मजवर उपकारच झाले असें मी मानतों. समजलें? आतां तरी अश्रु आवर.

द्रौपदीः—पण, महाराज, आपल्या या स्त्री वेषांत आपली भेट घेणें म्हणजे न बोलतां आपला उपहास करणें असेंच मला वाटतें. आपला स्त्री वेष पाहून माझी मलांच लाज वाटते गडे.

अर्जुनः—माझा हा विकृत वेष पाहून तुला वाईट वाटतें, तसेंच तूं दृष्टीसमोर आलीस म्हणजे मलाहि वाईट वाटतें. पण वेडे ही लाज काय ती तुझ्या माझ्या पुरती आहे. इतर सर्व जगाची लाज वाटण्याचें मला

मुळींच कारण नाहीं. या उभ्या नगरांत मला अर्जुन ह्मणून कोणीहि ओळखीत नव्हता. मग मला लाज कसची ? जो वीर अर्जुन तीच ही स्त्री वेषधारीबृहन्नडा, असें जर मला कोणी दुहेरी नात्यानें ओळखील, आणि त्यानें मला असें ओळखलें हें मला कळेल तर मग मला त्याची लाज वाटेल.

[ पडद्यांत—सैरंध्री, अग ए सैरंध्री ? अजून तुझ्या माळांची गुंतागुंत सुटली नाहीं कायग मायाविनी ? कीं बसली आहेस कुणा पुरुषाशीं गुलगुल गोष्टी करीत ? ]

द्रौपदीः—( दचकून ) महाराज, अज्ञातवास अजून संपला नाहीं त्याचें हें घ्या प्रत्यंतर ! (मोठ्यानें) अग आलें हो दुःशीले ! पुष्पमाळांची गुंतागुंत सुटायला आतां फारसा वेळ लागणार नाहीं. तूं हो पुढें आणि राणीसाहेबांना सांग मी आलेंच ह्मणून.

[ पडद्यांत—तुझ्यासारख्या सुंदर आणि चवचाल दासीच्या माळेची गुंतागुंत जन्मभरसुद्धां सुटायची नाहीं हो. बैस तूं आपली ती सोडवीत. मी जातें.]

अर्जुनः—द्रौपदी, या दुष्ट दासीची वीज कडकडली पण बरी परस्पर निघून गेली; नाहीं तर ती आमच्या क्षणभराच्या एकांतावर पडून त्याचा विध्वंस करती. पण द्रौपदी हें पहा, मला स्त्रीवेष धारण केलेला पाहून तुला वाईट वाटतें, तसेंच तुला, या पांडवपत्नीला, या लोकोत्तर साध्वीला, या हलकट दासीनें आपल्या जिभेच्या केरसुणीनें केराप्रमाणें झिडकारावी हें पाहून मलाहि वाईट वाटत नसेल काय ? पण वेडे तुला किंवा मला वाईट वाटून उपयोग काय ? नाटकांतील सुंदर नटाला एखादे वेळीं आपल्या भूमिकेकरितां अमंगल वेष चढवावा लागतो पण त्याचें त्याला वाईट वाटतां कामा नये. आमचें हें अज्ञातवासाचें नाटक संपलें म्हणजे तुझ्या व माझ्या वेषाची खंति न करितां तूं आणि मी आपल्या भूमिका कशा बेमालूम वठविल्या याचें सारें जग कौतुकच करील. द्रौपदी, आपल्या अज्ञातवासाच्या नाटकाचें भरतवाक्य म्हणण्याची वेळ जवळ आल्याची नक्की बातमी तूंच ना मला आतां सांगितलीस ? आतां घाबरूं नकोस आणि वाईटहि वाटूं देऊं नकोस.

[ पडद्यांत—बाई बाई शर्थ झाली तुझ्या दांडगेपणाची ]

द्रौपदी:—असें काय करतेस तें अगदींच ? ही पहा आलेंच हो.

अर्जुन:—देवी द्रौपदी, जा. उरलेले आज्ञातवासाचे चार दिवस आनंदांत घालिव. थोडी उरलेली सैरंध्रीची भूमिका नीट वठीव; कुणाला संशय येऊं देऊं नको. खऱ्या चतुर पुरुषाचें काय किंवा स्त्रीचें काय चातुर्य हें अष्टपैलु असतें. तें कोणत्याहि स्थितींत डासळत नाहीं. वेषाची उपाधि विनाशी आहे. आपल्या या चारित्र्याचा आत्मा अमर आहे. तुझा आणि माझा वेष ही केवळ माया आहे. आपल्या या चारित्र्याचा आत्मा या उपाधी टाकून देऊन लवकरच प्रगट होइल; तेव्हां त्याचें तेज कौरवांनाहि दिपवून आणि भाजून टाकील. मग या राजवाड्यांतल्या भिकार दासदासींची काय कथा? जा तुझा विजय असो.

द्रौपदी:—( हंसून आनंदानें ) आपल्या कृपेनें '<u>विजय</u>' हा माझा नेहमींच आहे.

( दोघेंहि दोहींबाजूंनीं जातात. ) [ पडदा पडतो. ]

---

## अंक १ प्रवेश ४

[ उत्तर व उत्तरा प्रवेश करितात. ]

उत्तर:—ताई, आपली आवडती रत्नमाळा घासून पुसून लखलखीत करून ठेवली आहेस ना ?

उत्तरा:—होय बरें दादा. पण तिची उठाठेव तुला काय म्हणून ?

उत्तर:—तिचा आणि तुझा आज वियोग होणार म्हणून. मुलगी सासरीं निघाली म्हणजे त्या दिवशीं तिची आई मुलीची वेणीफणी विशेष काळजीनें करिते. तुझ्या रत्नमाळेची काय अपूर्वाई तुला करावयाची असेल ती तूंहि करून घे. कारण तिला तूं आज मुकणार.

उत्तरा:—कां बरें ? उद्यां ती कुणाची होणार ?

उत्तर:—कुणाची म्हणजे माझी ? तूं आपली पैज विसरली असशील; पण मी नाहीं हो विसरायचा !

उत्तरा:—असें असें. गायनशाळेची परीक्षा तरी आधीं होऊं दे. मग पाहूं मी माझी रत्नमाळा हरते कीं, तूं आपला मोत्याचा कंठा हरतोस! माझी माळ आणि तुझा कंठा यांच्या लग्नाचा वाङ्निश्चय माझ्याकडून अगदीं कायम आहे. पण दादा तूंच संभाळ बरें.

उत्तर:—मला काय संभाळायचें? माझा कंठा एकाद्या दिग्विजयी राजपुत्राप्रमाणें आपल्या नवरीचें हरण करून माझ्या घरीं परत येणार.

उत्तरा:—नाहीं दादा नाहीं. एखाद्या अधिराज्ञीच्या मुलीसारखी माझी रत्नमाळाच आपला नवरा म्हणजे तुझा मोत्यांचा कंठा हरण करून माझ्या घरीं परत येणार. तुझा मोत्यांचा कंठा माझा जांवई होणार, पण घरजांवई रे घरजांवई. त्याला आपल्या बायकोच्या घरींच नांदावें लागणार. गायनशाळेच्या आजच्या परीक्षेंत माझ्या मुली जिंकणार आणि तुझे मुलगे हरणार, तेव्हां तूंच संभाळ.

उत्तर:—आहे आतां घोडा मैदान जवळच आहे.

पद ८. चाल—रसिया बारेके.

सुयशा नर जिंकिती ॥ भगिनि तूं स्पर्धा करिसी
किती ॥ धृ० ॥ जनन सुमंगल असे नरांचे ॥ पाणी
अबला अभागिनी त्या ॥ भरिति हातीं करितिल
माती ॥ सुयशा ॥ १ ॥

उत्तरा:—हो हो, हातच्या कांकणाला आरसा कशाला?

पद ९. चाल—असती बैरी.

आतां भरली ॥ तव अयशाची घटका सगळी ॥ न
टळे कधिं ते ॥ करिसी जरी तूं आयासातें ॥ कंकण
बघण्या हातिं जसें ॥ दर्पण धरितां होत हंसें ॥ दैव
परीक्षा तव फसली ॥ धृ० ॥ नारी भूषण जगताला ॥
मूल प्रकृति जन ह्मणती तिजला ॥ अखिल प्रवृत्ती ती
प्रसवे ॥ नेइ जगा उद्धरुनी सकल सवें ॥ १ ॥

[ अमात्य प्रवेश करितो. ]

अमात्यः—ताईसाहेब, कुमार, आपल्या दोघांचा कडाक्याचा वाद धा म्हाताऱ्याच्या बहिऱ्या कानांनाही चांगलाच ऐकूं आला.. आहे, एकूण विवाहाच्या मंगलकार्याची तयारी आहे. आनंद! ताईसाहेबांची रत्नमाळा सासुरवास भोगायला सासरीं जावो, नाहीं तर कुमारांचा मोत्याचा कंठा घरजांवई होऊन सासुरवाडीस बंदिवान होऊन पडो, तो विचार पुढचा आहे. आह्मांला आपली लग्नससारंभाची मेजवानी खायला मिळाली ह्मणजे झालें. 'मिष्टान्नमितरेजनाः'

उत्तराः—( टाळी वाजवून ) हा हा अमात्य आले बरें झालें. अमात्य-राज, बोलाना, गायनशाळेच्या परिक्षेंत माझ्या मुली जिंकणार कीं दादाचे मुलगे हरणार ?

उत्तरः—हो अमात्य सांगा. माझे मुलगे जिंकणार कीं ताईच्या मुली हरणार !

अमात्यः—गायनशाळेच्या परीक्षेंत पुढें कोण जिंकणार आणि कोण हरणार कुणाला ठाऊक ? पण तूर्त तरी प्रश्न विचारण्यांत आपण दोघांनीं जिंकलें आणि मी विचारा हरलों येवढें मात्र खरें. पण अशा आपमतलबी प्रश्नांच्या जोडीनें तोंड बंद होण्यापेक्षां बल्लवानें बनविलेल्या गोड गोड लाडवांच्या जोडीनें तोंड बंद झालेलें आपणाला बुवा अधिक आवडेल. शिवाय आपणा दोघांच्या बिनतोड प्रश्नांना उत्तर देण्याच्या प्रयत्नांत माझी फजिती करून घ्यायला आतां वेळ तरी कोठें आहे ? कारण मुहूर्ताची घटका भरून हे पहा दोन्ही पक्षाचे वऱ्हाडी येऊं लागले लग्न मंडपांत.

[ एकीकडून मधुप व दुसरीकडून कुसुम येतात. ]

उत्तराः—कायग कुसुम, आपल्या सर्व मुली आल्या का परीक्षेच्या तयारीनें ?

कुसुमः—होय ताईसाहेब; त्या मघाशींच येऊन बसल्या संगीतशाळेंत. मी आपल्यालाच बोलवयाला आलें आहे.

उत्तरः—कायरे मधुपा, आपलेहि सगळे मुलगे आले कीं नाहीं परीक्षा देण्याच्या जय्यत तयारीनें ?

मधुपः—होय कुमार; ते सुद्धां मगाच येऊन बसले आहेत संगीतशाळेंत. मी झालों तरी आपणालाच पाचारण करण्याला आलों आहे.

पद १०. चाल—रामवदन मति.

येत सकल मम छात्रमंडळी रंगसभेमधिं विजयोत्सुक
अति । देऊं परीक्षा । सगळी ॥ येत ॥ धृ० ॥ नाट्य
नृत्य अभिनय गायनपटु जयशंका न मुळीं ॥ येत ॥ १ ॥

उत्तरः—हां ताई, काढ तुझी रत्नमाळा गळ्यांतून आणि दे इकडे.

उत्तराः—ती काय म्हणून मी इतक्यांत देईन ? आण तुझाच मोत्याचा कंठा इकडे. मी तो जिंकलाच म्हणून समज.

अमात्यः—कुमार, ताईसाहेब आतां मात्र मी करतों न्याय याचा. ( उत्तरास ) आपला कंठा ( उत्तरेस ) आपली रत्नमाळा दोन्ही काढून आपण मजजवळ द्या. परीक्षेचा आणि पैजेचा निकाल लागेपर्यंत त्या दोन्ही जिनसा माझ्याजवळ ठेवतों. जें कोण पैज जिंकील त्याला दोन्ही देइन. हो खुद्द नवरा आणि नवरी हींच दोन्ही ज्याच्या हातांत त्याला मग मिष्टान्नाला काय कमी ? म्हणून हें काम मी आनंदानें पत्करतों. आहे कबूल ?

उत्तरः—( मोत्याचा कंठा अमात्यांस देऊन ) हा घ्या माझा कंठा. माझा वरपक्ष आहे म्हणून सत्पक्ष आहे. त्याचाच जय होणार हे लक्षांत ठेवा.

उत्तराः—( रत्नमाला अमात्यांस देऊन ) ही घ्या माझी रत्नमाला. दादाच्या हातीं ती जाईल अशी मला भीतीच नाहीं. माझा वरपक्ष नसला तरी गुणानें माझा वरचढपक्ष आहे. दादा चल.

उत्तरः—चल ताई. [ दोघे हातांत हात घालून जातात. ]

अमात्यः—ठीक झालें. आतां हा लग्नसोहळा किंवा हें संगीत युद्ध जितकें लांबेल तितकें लांबो. आणि तें लांबवायला आणि रंगवायला मला बृहन्नडेला सांगितलें पाहिजे. पण ही पहा सैरंध्रीहि आली वाटतें बृहन्नडेकडून वऱ्हाडी मंडळीला पाचारण करायला.

द्रौपदीः—[ प्रवेश करून ] आपणां सर्वांना संगीतशाळेकडे बोलावलें आहे. स्वतः सुदेष्णा राणीसाहेबहि येऊन बसल्या आहेत मौज पहायला.

अमात्यः—मौज तर खरीच. कीचकमहाराज मेल्यामुळें राणीसाहेबांच्या मनाला दुःख झालें होतें, त्यांना ही मौज पाहून थोडी करमणूक तरी होईल. मौज पण मौज होईल. उत्तराताईसाहेब आणि कुमार उत्तर यांच्या अंगांत कलहदेवता धूप घातल्यावरोबर संचारत असते. या प्रेमकलहाला हातभार लावायला आपणाला गेलेंच पाहिजे. पण कायग, सैरंध्री, या लग्नसमारंभांत तूं कोणत्या बाजूची वऱ्हाडीण ? या प्रेमकलहांत तूं कोणत्या पक्षाची अभिमानी ?

द्रौपदीः—[ हंसून ] हें काय विचारावें अमात्यराज ? मी अर्थातच ताईसाहेबांच्या पक्षाची असणार.

अमात्यः—अग असायचीच. जातीकडे जात वळणारच. मीच पाहीनास ? उभय पक्षांचा जामीनदार आणि मध्यस्थ आहें. पण मनांतून म्हणशील तर मला पुरुषांचाच अभिमान असणार. मी कुमार उत्तरराजांच्या पक्षाचा आहे. नाहीं म्हणायला या राजवाड्यांत ज्याला स्त्रीजातीचा किंवा पुरुष जातीचा अभिमान म्हणून नाहीं असें एकच मनुष्य मला दिसतें.

द्रौपदीः—तें कोणतें ?

अमात्यः—अग आपला म्हण आपली म्हण बृहन्नडा! ( द्रौपदी तोंड खालीं घालते ) तिनें स्त्रीजातीचा अभिमान कसा धरावा किंवा पुरुष जातीचा तरी कसा धरावा ? पण आजच्या गायनपरीक्षेंत सरस निरस ठरवायला असला तृतीय प्रकृति–म्हणजे निःपक्षपाती–परीक्षक पाहिजे होता तो आयताच मिळाला ! चल सैरंध्री तुलासुद्धां ही गंमत पहायची असेल !

[ जातो ]

द्रौपदीः—( कपाळावर हात मारून ) एक शब्द चुकून मोकळ्या मनानें बोलायला गेलें तों आणखी एक अपमान पदरांत पडला. याचेंच नांव अज्ञातवास. याचेंच नांव वीरविडंबन. अमात्यराज आपणाकडून सरळ मनानें विनोद करून गेले, पण तसें करतांना त्यांनीं जातां जातां या माझ्या जखमी काळजावर आणखी एक चरचरीत डाग दिला. आणि इतकें करून वरती मला गंमत पाहायला त्यांनीं बोलावलेंच. ( रडत ) मी कसा हा आपल्या हातानें आपल्या पायावर दगड मारून घेतला ! देवा

भाईराया श्रीकृष्णा, या तुझ्या आवडत्या पांडववीरांच्या विटंबनेची गंमत पहायची तुझी हौस पुरे झाली नाहीं कां? ( डोळे पुसून ) काय म्हट-लेंस, देवा? आतां अज्ञातवासाचे अवघे चारच दिवस उरले असतील? पण अज्ञातवासाचे अवघे पंधरा दिवस उरले असतां कीचकानें माझा तसा अपमान केलाना! मग उरलेल्या चार दिवसांचा तरी मी कसा भरंवसा धरूं? देवा, भात शिजेपर्यंत दम निघतो पण तो पानावर वाढीपर्यंत दम निघत नाहीं हा बाळपणचा अनुभव मनांत आण, म्हणजे माझ्या मनाची स्थिति तुला कळून येईल.

पद ११. चाल—आश्रया या स्थला.

उदयकालीं गमे गहन शामा, ही त्रियामा ॥ धृ० ॥
भीति कापवि वळें अंतरी। भीति कारण पळे दुरि
जरी। अभिभवा भासवी विक्रमा ॥ १ ॥

( पडद्यांत सुस्वर वाद्यांचा स्वर ऐकूं येतो )

[ दचकून ] अगबाई, मी हा व्यर्थ शोक आवरून शुद्धीवर यावें म्हणून गायनशाळेंतून प्रियपतींनीं प्रेमळ गोड आवाजानें ही सूचना तर केली नसेल? खरेंच, तिकडच्या विटंबनेपुढें माझी विटंबना कांहींच नाहीं. ज्यांच्या जिवावर मी हा अज्ञातवास काढतें त्यांचेंच उदाहरण पाहून मीहि हे वेळीं अवेळीं डोळ्यांतून अश्रु काढणारें दुःख आवरून धर-लेंच पाहिजे.

[ डोळे पुसून जाऊं लागते ]

दुःशीलाः—( प्रवेश करून ) मेल्ये सैरंध्री, तूं सदाचीच अभागी. तिकडे संगीत शाळेकडे काय मौज मौज चालली आहे अन तूं इकडे काय करतीस एकटीच ?

द्रौपदीः—अग मी बरी ही असली मौज दडवीन? पण इकडे गुलाब पाण्याचे हजारे राहिले होते ते आणायला आलें. गायनसमारंभ चालला असतां मधून मधून अंगावर गुलाबपाणी उडवायला नको का? चल

[ दोघी जातात. पडदा पडतो. ]

---

## अंक १ प्रवेश ५

[ पडदा उघडतो. राणी उत्तर उत्तरा मुलगे मुली अमात्य दासी अर्जुन द्रौपदी बसलीं आहेत. सुस्वर वाद्यें वाजत आहेत. ]

राणीः—बृहन्नडे, आतां होऊं द्या समारंभाला सुरवात.

उत्तरः—पण आधीं परीक्षक ठरवा आणि मग परीक्षेला सुरवात करा.

उत्तराः—निराळा परीक्षक कशाला हवा? बृहन्नडाच तें काम करील,

उत्तरः—आपल्याला नाहीं बृहन्नडेचा विश्वास पटत. तिचा स्त्रीविद्यार्थ्यांकडेच नेहमीं ओढा असतो. ती स्वतः स्त्री, तिचा ओढा स्त्रियांकडे असणारच !

दासीः—आपल्याला नाहीं बृहन्नडेचा विश्वास पटत. तो स्वतः पुरुष त्याचा ओढा पुरुष विद्यार्थ्यांकडे असणारच.

अर्जुनः—( हंसून ) एकूण माझ्यावर स्त्रियांचा विश्वास नाहीं आणि पुरुषांचाहि नाहीं अं ! पण राणीसाहेब, दोघांचाहि विश्वास माझ्यावर असता तरी हें परीक्षकाचें काम मी केलें नसतें.

राणीः—अगबाई, तें कां बृहन्नडे ?

अर्जुनः—मी या मुलामुलींचा स्वतः शिक्षक आहें म्हणून. शिक्षकानें परीक्षक होऊं नये असें शास्त्रच आहे.

अमात्यः—मग हें परीक्षकाचें काम आईसाहेबांनींच करावें.

राणीः—पण मी झालें तरी स्त्री. मी झालें तरी या मुलामुलींचा पक्षपात करणार नाहीं कशावरून ?

उत्तरः—पंचाईत झाली खरीच ! पुरुष पुरुष म्हणून नालायख, स्त्रिया स्त्रिया ह्मणून नालायख ! आणि बृहन्नडा पुरुषहि नाहीं किंवा स्त्रीहि नाहीं म्हणून नालायख !

अमात्यः—अथवा पुरुष आहे आणि स्त्रीहि आहे म्हणून नालायख असेंच कां म्हणाना ?

राणीः—मिळून आपल्यापैकीं परीक्षक होण्याला कोणीच लायख नाहीं, मग वाट काय ?

उत्तरा:—दादानें ही नसतांचि कांहीं तरी कुरापत काढून घोंटाळा घातला आहे दुसरं काय ?

उत्तर:—बरं, मुलींच्या नृत्यगायनाची परीक्षा मी घेतों आणि मुलींच्या नृत्यगायनाची परिक्षा उत्तराताई घेऊं दे.

उत्तरा:—हं आहे कबूल मला.

अर्जुन:—आपणा उभयतांना ही व्यवस्था पसंत असली तरी माझी तिला हरकत आहे.

राणी:—ती कां बृहन्नडे ?

अर्जुन:—शत्रु पक्षाकडे परीक्षकाचें काम दिलें म्हणजे न्याय फारच चांगला व्हायचा! परीक्षकांच्या अन्यायाच्या चढाओढीत बिचाऱ्या शिक्षकांची मेहनत फुकट जायची. माझी विनंति अशी आहे कीं, राणीसाहेब व अमात्य उभयतांनी मिळून परीक्षकाचें काम करावें. (स्वगत) या अवध्या राजवाड्यांत गायनवादनाची ज्यांना मुळींच गोडी किंवा ज्ञान नाहीं अशी हीं दोनच माणसें आहेत.

राणी:—आणि आह्मां दोघांत मतभेद झाला तर ?

उत्तरा:—तर मग बृहन्नडा ज्या बाजूचा जो निकाल देईल तो खरा.

उत्तर:—कबूल कबूल ही अट मला कबूल आहे.

अमात्य:—म्हणजे शेवटीं बृहन्नडा देईल तोच निकाल खरा ह्मणायचा!

बृह०:—अमात्यराज, माझा असा हेवा कां करितां ?

पद १२ चाल—बनरे घरका.

मन कां कृपण केलें, क्षुद्र भावने कां स्थान दिलें॥धृ०॥
जातिवंत हो पुरुष स्त्रिवा। देहीं संकर अवतरला॥
तुह्मां सारिखा मनुज असें मी॥ स्वाभिमान वाटे
मजला॥ १॥

या माझ्या स्त्री–पुरुषमिश्र देहाचे तोटे तर अनेक आहेतच. पण त्यामुळें असा एखादा फायदा चुकून मिळाला तर तोहि तुह्मांला कां पहावत नाहीं ? आपण आणि राणीसाहेब या दोघांत मतभेदच न

झाला तर अखेर न्याय करण्याचें काम माझ्यापर्यंत कशाला येईल ? आपला मतभेद झाला तरच येणार.

अमात्यः—(स्वगत) स्त्रिया आणि पुरुष दोघेहि भांडले म्हणजे तृतीय प्रकृतीचें असेंच साधावयाचें.

राणीः—ठरलें, बृहन्नडेची तोड सर्वांना मान्य आहे. आतां होऊं द्या सुरवात.

उत्तरः—पण आधीं स्त्रियानीं गायन वादन करून दाखविलें पाहिजे.

उत्तराः—हें नाहीं मला कबूल. मागून गाणाराचीच अधिक छाप पडते ऐकणारावर. दादा, तुझ्या कुरापती चालूच आहेत. मीं नाहीं हें कबूल करणार. (बाबा, पुरुषांचा मान पहिला. किती केलें तरी ते पुरुष, पुरुषांच्या पावलांवर पावलें टाकीत आम्हीं स्त्रियांनीं चालायचें. मुलीनीं आधीं गायल्यानें मुलांचा उपमर्द व्हायचा.

उत्तरः—छे: छे: असें कसें होईल ? स्त्रियांचाच मान पहिला. त्यांना गृहदेवता म्हणतात. त्यांची पूजा आधीं झाली पाहिजे.

उत्तराः—मी नाहीं आपला हक्क सोडणार या कामीं.

उत्तरः—आणि मीहि पण आपला हक्क सोडणार नाहीं.

राणीः—अरे तुम्ही दोघें अशीं वर्दळीवर कां येतां ?

अमात्यः—मला वाटतें मुलांनीं आणि मुलींनीं मिळून एकदमच गाऊन नाचून दाखवावें.

अर्जुनः—अमात्य, तुह्मांला स्त्रीपुरुषमिश्रित देह न आवडो; पण स्त्रीपुरुषमिश्रित गायन आवडतें तर.

अमात्यः—न आवडायला काय झालें ? तें पहात ऐकत तर जन्म गेला.

राणीः—दोघें मिळून गायलीं तर मग सरस निरस कसें ठरवायचें ?

अर्जुनः—मग या पहिल्याच वादग्रस्त मुद्यावर परीक्षा थांबायची कीं काय ?

राणीः—मला नाहीं कांहीं सुचत तोड.

अर्जुनः—असो. पुरुष किती झाले तरी धीट असतात. मुलांनीं तुह्मीच सुरवात कराना. ( स्वगत ) अमात्य परीक्षक बनला अं. गायनशास्त्राचें एक अक्षरही न का कळेना. ठीक, या मुलांकडूनच त्याची फजिती करूं या. ( उघड ) अमात्यराज, आपण कोणत्या रागांत कोणत्या तालांत मुलांनीं चीज म्हणावी याची फर्मास करावी.

अमात्यः—( स्वगत ) अरेच्या, माझ्या अज्ञानाचा भोपळा फुटायची वेळ आली. मी परीक्षक झालों नसतों तरी बरें होतें. कानावरून चार शब्द गेले आहेत खरे. पण बोलायला गेलों तर अज्ञान बाहेर पडायचें.(उघड) तो मान राणीसाहेबांकडेच गेला पाहिजे.

राणीः—( स्वगत ) मला तरी या गाण्यांतलें काय कळतें आहे. ( उघड ) सर्व कामांत सल्ला देण्याचा अधिकार अमात्याकडे असतो. याच कामापुरता तो अधिकार मी आपणाकडे कसा बरें घेऊं ? तुम्ही रागाचा आणि तालाचा सल्ला द्या. मग त्याप्रमाणें हुकूम करण्याचें काम माझें,

अमात्यः—( स्वगत ) बाजू अंगावर आली. आतां भिऊन काय होणार ? कशी तरी वेळ मारून नेली पाहिजे. ( उघड ) ठीक आहे. मुलांनो, भैरवीच्या तालांत धुमाळी राग म्हणून दाखवा पाहूं. ( सर्व मुलगे मुली खो खो हंसतात. ) कांहीं चूक झाली वाटतें ?

अर्जुनः—कांहीं विशेष नाहीं. आणि आपली चूक झाली तरी मुलें दुरुस्त करून घेतील. ( मुलांना डोळ्यानें खूण करून ) हं, अमात्यांना भैरवी राग ऐकायचा आहे; तें हें पद म्हणा पाहूं. ( मुलें पद म्हणतात. )

अमात्यः—वाः, मुलांनीं भैरवी फार चांगली म्हटली. (सर्व मुलें हसतात. ) अजून कांहीं तरी चुकलेंच असें दिसतें.

उत्तरः—जाऊं दे की अमात्य. रागाची अदलाबदल झाली तरी पद चांगलें वठलेंना ? तसा शेरा द्या म्हणजे झालें. आतां मुलींनीं गाऊन दाखवावें.

उत्तराः—हो हो, त्या गाऊन दाखवितील याहून उत्तम.

अर्जुनः—अमात्यराजांनीं फिरून फर्मास करावी.

**अमात्यः**—( स्वगत ) आतां रागाचें आणि तालाचें नांव घेण्याची सोय नाहीं. (उघड) मुलींनों, जें पद तुम्हांला चांगलें येत असेल तें म्हणा; राग आणि ताल कोणताही चालेल.

**उत्तरः**—वाः वाः, हा तर उघडच पक्षपात झाला. मुलांना मात्र रागाचें आणि तालाचें बंधन आणि मुलींना कांहींच बंधन नको वाटतें ! स्त्रियांना तर पुरुषांहून अधिक बंधन हवें.

**उत्तराः**—निदान परीक्षेत तरी स्त्रियांवर पुरुषांपेक्षां कमी बंधनच असलें पाहिजे. तें कांहीं नाहीं. परीक्षकांचा हुकूम होऊन चुकला. मुलींनो म्हणाग तुम्हांला उत्तम येत असेल तें पद.

**उत्तरः**—हा उघड पक्षपात मी चालूं द्यायचा नाहीं. रत्नमाळा वालविण्याची वेळ आली म्हणून चालल्या आहेत वाटतें ह्या युक्त्या. बरें आहे, मला सुचेल ती युक्ती मीही करीन. ( मुली पद म्हणूं लागतात उत्तर यांच्या समोर वेडीं वांकडीं तोंडें व हातवारे करून दाखवूं लागतो. मुली हसूं लागतात, गाण्याचा बिघाड होतो. ) हं, आईसाहेब, अमात्यराज, बोला आतां मुलींचें गाणें अधिक चांगलें झालें कीं मुलांचें ? ताई, आतां रत्नमाळा गेली.

**उत्तराः**—हें कायरे दादा, तूं तर पोराहून पोर झालास.

**अर्जुनः**—मला वाटतें उभय पक्षांनीं इतक्यांतच वर्दळीला येऊं नये, अद्यापि नृत्याची परीक्षा व्हायची आहे.

**उत्तरः**—ठीक आहे, त्याला माझी कांहीं हरकत नाहीं.

**अमात्यः**—मुलांमुलींनीं मिळून एकाच तालावर नाचून दाखविलें पाहिजे; म्हणजे सरस निरस ठरवायला बरें पडेल.

**राणीः**—बरें तसेंच कां होईना. ( एका बाजूस मुलगे व दुसऱ्या बाजूस मुली नृत्य करितात. उत्तर मुलींच्या पायांत हळूच चित्राची बेटकुळी सोडतो. त्या घाबरतात व त्यांचा नाच विसकटतो. )

**उत्तरः**—चला, गाण्याप्रमाणें नृत्याची परीक्षाहि झाली. माझी पुरुष मंडळीच यशस्वी झाली. पुरुषच ते यशस्वी व्हायचेच. मग तें युद्ध असो वा नृत्यगायन असो. ताई, रत्नमाळा जिंकली.



उत्तरः—बरें आहे. मला सुचेल ती युक्ति मीहि करीन.

[ पृ. ३०

उत्तरा:—( रागावून ) पुरे पुरे तुझा पुरुषार्थ. नृत्यगायनांत तुझ्या पुरुषांनीं काय दिवे लावले हें दिसून आलें तेंच युद्धाचें व्हायचें. पण दादा, तोंड वाकडीं करून आणि पायांत बेटकुळ्या सोडून शत्रु पराजित करतां येत नसतो. ज्याला य:कश्चित् नृत्यगायनाच्या परिक्षेंत धर्मयुद्ध करितां येत नाहीं, त्याची वीर म्हणून कीर्ति काय होणार हें दिसतच आहे.

उत्तर:—ताई, नृत्यगायन तें नृत्यगायन आणि युद्ध तें युद्ध. या संगीतशाळेंत युद्धाची किंवा वीरकर्माची गोष्ट तूं कशाला बोलतेस? युद्धाविषयीं नुसतें बोलण्याचाहि स्त्रियांना अधिकार नाहीं. अंत:पुरांतली क्रीडा, अंत:पुरांतला खेळ हीं बोलून चालून करमणूक. करमणुकींत धर्म कसला किंवा अधर्म कसला? माझे मुलगे नृत्य किंवा गायन करीत असतां तुला सुचणारी युक्ति करून तूंहि वाटेल तर त्यांचें नृत्यगायन बिघडवायचें असतेंस तुला कुणी नको म्हटलें होतें? पण पुरुष ते पुरुष. त्याच्या कार्याचा बिघाड करण्याची स्त्रियांची छातीच नाहीं व्हायची. त्याना रणभूमि[illegible] विजय मिळायचा हें देवानेंच सांगितलें आहे पण अंत:पुरातल्या [illegible] खील ते विजयच मिळवायचे.

[illegible]:—कपटी पुरुषांनीं अंत:पुरांत मुळीं पायच घालूं नये. निष्कपटी सरळ मनाच्या स्त्रियांचा हा उपमर्द आहे.

राणी:—अरे, असे वर्दळविर कां येतां?

[ विराट घाईनें प्रवेश करितो. ]

विराट:—उत्तरा, अरे अंत:पुरांत काय करीत बसला आहेस? वेळ पाहून खेळ करावा.

राणी:—आपण असे कावरेबावरे कां दिसतां? काय झालें?

विराट:—प्रिये, आपला शत्रु जो त्रिगर्त त्यानें दक्षिण दिशेचा गौळवाडा लुटून आमच्याशीं युद्धाची कुरापत काढली आहे.

राणी:—अगबाई, माझा कीचकदादा स्वर्गवासी झाला म्हणून वाटतें [illegible]ला ही बुद्धि सुचली. खरेंच आतां कसें होईल?

उत्तरः—अग आई, अशी घाबरतेस काय म्हणून ? कीचकमामा गेले म्हणून काय झालें ? त्रिगर्तांचा हा काळ, हा सवाई कीचक, जिवंत असतांना भीति कसची ? बाबासाहेब, हा पहा मी आतांच्या आतां त्रिगर्तावर स्वारी करून त्याला आपल्या पायाशीं बांधून आणतों.

पद १३ चाल—चतुर्भूज करूनी.

पराभव करुनि सुयोधना ।। बांधुनि आणिन मृगयापशु-
सम वळविन परतुनि सकल गोधना ।। धृ० ।। कौरव
कसले वीर मजपुढें ।। चिरडुनि टाकिन तें घुंगुरटें ।।
जाळिन पोळिन भूधर सह भू ।। शिवेल कधिं जरि
कोप मन्मना ।। १ ।।

विराटः—उत्तरा, हा प्रसंग इतका सोपा नाहीं. त्रिगर्ताला कौरव सैन्याचें पाठबळ आहे अशी बातमी आली आहे. मी सर्व सैन्य घेऊन त्रिगर्तावर निघालों आहें. तूं माझ्यामागें हें नगर संभाळ म्हणजे झालें.

उत्तर—बाबा, तुमचें आतां वय झालें. तुम्हीच घरीं राहिलें पाहिजे. माझ्यासारख्या तरूण वीराला घरीं बसून तुम्हांला रणांगणावर धाडणें शोभतें का ? मी आजवर संपादन केलेली युद्धविद्या फुकटच [illegible] कीं काय ?

विराटः—नाहीं. उत्तरा, मी वृद्ध झालों म्हणून काय झालें ? देहांत प्राण आहे तोंपर्यंत मला रणांगणावर गेलेंच पाहिजे, क्षत्रियाला रणांगणावर मरण आलें पाहिजे. तूंहि युद्ध करायलाच जन्माला आला आहेस; पण अजून लहान आहेस. तुला मी रणांगणावर कसा धाडूं ? माझ्या मृत्यूनंतर तुला ही क्षत्रियपरंपरा चालवायचीच आहे. असो; अधिक बोलत बसण्याला मला आतां वेळहि नाहीं. त्रिगर्त आधींच उन्मत्त, त्यांतून त्याला कौरवांची भर आणि आमचे सेनापति कीचक स्वर्गवासी झाले, तेव्हां त्याच्या उन्मत्तपणाला सीमाच राहणार नाहीं. पण या देहांत जीव असेपर्यंत त्याला यशाची आशाच नको. ठीक आहे, हा पहा मी चाललों. प्रिये, उत्तरा. उत्तरे, सर्व जण सावध रहा; आणि नृत्यगायनादि प्रकारांना आतां रजा द्या. [ जातो. ]

उत्तर:—एः, बाबांचें हें नेहमीं असेंच. माझ्या सारख्या वीराचा घरीं राहिल्यानें पाणउतारा होतो हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. कसचा त्रिगर्त आणि कसचें काय ? मी अंगावर येतों असें ऐकतांच तो घाबरून रणांगण सोडून पळून गेला असता. आहे काय आणि नाहीं काय ? आपल्याला तरी त्रिगर्ताच्या या स्वारीचें कांहींच वाटत नाहीं ! बृहन्नडे, आतां होऊं द्या नृत्यगायनाला फिरून सुरवात.

उत्तरा:—दादा, बाबा युद्धाला रणभूमीवर गेले, आणि तुला नृत्यगायन सुचतें ? शाबास तुझी ! चलाग मुलींनों. चल सैरंध्री, आई तूंहि चल. बसूंदे दादाला आणि बृहन्नडेला नृत्यगायन करीत.

पद १४. चाल—मम रोको काना.

चल जाऊं आई न गमे याचा छंद हा भला ॥ ध्रु० ॥
क्षत्र कुलामधिं जन्मा येऊनि
गायक हा बनला ॥ चल ॥ १ ॥
समरगर्जना लय सोडोनी
धरितो करताला ॥ चल ॥ २ ॥
रणभेरींची करुनी खंती
वाजवि हा तबला ॥ चल ॥ ३ ॥

( पडदा पडतो. )

## अंक पहिला समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला

[ शकुनी प्रवेश करितो. ]

शकुनीः—वीरांचें काम वीरांनींच करावें; आणि मुत्सद्यांचें मुत्सद्यांनींच ! दोघांची मदत एकमेकांना असली म्हणजे झालें ! पण त्यांतल्या त्यांत पाहिलेंच तर युद्धाचें सुद्धां बरेंचसें श्रेय आम्हां मुत्सद्यांकडेच येतें. कारण मुत्सद्यांनीं आपल्या कौशल्यानें आणि बुद्धिमत्तेनें कलहाचें बीज पेरून ठेविल्याशिवाय वीरांना तरी आपल्या तरवारींनीं कलहाचें पीक कसें कापायला मिळणार ? मुत्सद्दी कलह रांधतात तेव्हांच वीर तो पानावर नुसता वाढतात. पांडवांशीं कलह करावा असें सुयोधनादि कौरवांच्या मनांत फार दिवसांपासून होतें, पण द्यूतप्रसंग करवून धर्माला वेडेवांकडे पण लावायला जेव्हां मीं लावलें तेव्हां त्यांतून हा पांडवांचा वनवास आणि अज्ञातवास निर्माण झाला. आणि आतां हा अज्ञातवास संपण्याची वेळ आली तेव्हां झालें तरी तो अज्ञातवास विफळ करून फिरून पांडवांना वनवासाला धाडण्याचें कारस्थानहि मलाच केलें पाहिजे. युद्धप्रसंग एकदां जेव्हां होईल तेव्हां सुयोधनाची गदा पांडवांच्या डोक्यांत काय आदळेल ती आदळो. पण त्यांच्या डोक्यावर फिरून वनवास—अज्ञातवासाची धोंड आदळायची कशी याचा विचार करण्याकरितां तूर्त मला आपलें डोकें खाजवावें लागतें आहे खरें. कोण आहेरे तिकडे ? [ सेवक प्रवेश करितो. ] पांडवांच्या शोधाकरितां पाठविलेली ती हेरमंडळी बाहेर बसली आहेत त्यांना आंत बोलाव पाहूं. [ सेवक जातो. ] आतां हे सारे हेर येऊन नन्नाचा पाढा वाचणार; पण नकार सांगतांना गुलाम ऐट अशी आणतील कीं यंव् ! आपलें काम फत्ते करून येणाराला मुळींच ऐट करावी लागत नाहीं. त्याचें कामच त्याच्याकरितां शिफारस करितें. पण ज्यांची कामगिरी फसली त्यांना मात्र खोटी तडफ दाखविल्याशिवाय गत्यंतर नसतें. [ हेर

येतात. ] पांडव कुठें तरी या विराट नगराच्याच आसपास असावे अशी माझी आतां पक्की खात्री झाली आहे. तरी पण इतर ठिकाणीं धाडलेलेहि सर्व हेर जसे काय पांडव आपल्या हातीं आतां सांपडणार अशा आविर्भावाची बेमालूम बतावणी करतील.

पद १५. चाल—दावि पंथा अनुसरे.

हेर आले खचित सगळे कटुमुखीं रडत अयश वरुनी ।। ध्रु० ।।
अमति कुमति जडमति वक्रमति वक्रगति
खल शठ चांडाळ भृत्य मी तयांचा धनी ।। हेर आले ।। १ ।।
करितिल धनसंहार रचितिल अनृतभार
मळवितिल सच्चरित छल कपट दूषणीं ।। हेर आले ।। २ ।।

१ हेरः—[ पुढें होऊन ] पांडवांच्या शोधाकरितां मी हा शिकाऱ्याचा वेष घेऊन सर्व अरण्यें पालथीं घातलीं. तिरकमठे, बाणांचे भाते, सावजें पकडण्याचीं जाळीं, सापळे, रात्रीं पाजळण्याच्या दिवट्या, तरवारी, भाले, बरच्या, तोमर, मुसल, मुग्दल, पाश, परशु—

शकुनीः—बस बस, शस्त्रास्त्रांची ही तुझी याद पुरी कर. तूं हेर म्हणवतोस; एखाद्या लष्करी अजबखान्याचा रखवालदार नव्हेस. शस्त्रास्त्रांचीं नांवें तुझ्यापेक्षां मला पुष्कळ अधिक माहीत आहेत. पुढें बोल काय तें.

१ हेरः—अशी प्रचंड सामग्री घेऊन मी निघालों. प्रथम अह्मारण्य धुंडाळलें. त्या अरण्यांतले ते गगनभेदी विशाळ पर्वत, पाताळालाहि उदरात ठाव देणाऱ्या खोल दऱ्या, राज्येंच्या राज्यें किंवा सैन्यांचीं सैन्यें गडप करून टाकणाऱ्या प्रचंड गुहा, सूर्याला कायमचा हद्दपार करणारे गर्द वृक्ष, मुंगीचाहि रिघाव न होऊं देतील अशीं लतांचीं जाळीं, एकावर एक शेंकडों हत्ती गडप करतील अशा खोल दलदली, एक पाऊलहि न मावणाऱ्या पाउलवाटा, नुसता स्पर्श होतांच मृत्यु भेटविण्यासारख्या विषारी उदकांचीं सरोवरें, ज्यांत भुतें व समंद भर दिवसा घस्त चालतात अशीं स्मशानें—

शकुनीः——शाबास. निर्मनुष्य अशा अरण्यांत स्मशानेंहि असतात हें मी आज प्रथमच ऐकिलें.

१ हेरः——अशा निर्मनुष्य अरण्यांत मी पांडवांचा शोध करीत असतां मला अनेक प्रकारचीं श्वापदें भेटलीं. अक्राळ विक्राळ स्वरूपाचे सिंह, रक्तमांसात लोळणारे वाघ, सिंहासारखे क्रूर असे लांडगे, मस्त हत्ती, एका टापेच्या प्रहारानें घोड्यालाहि चीत करणारीं रानगाढवें, पांच पन्नास वृक्षांना एकदम वेटोळीं घालून बसणारे सर्प, मनुष्याला नखांत धरून सहज आकाशांत घेऊन उडून जातील असे गरूडपक्षी—

शकुनीः——हें पशुपक्ष्यांचें वर्णन फारच बहारीचें वठलें. आणि या श्वापदांत दडून बसणाऱ्या पांडवांचा तूं शोध केलास! तुझ्या अकलेपेक्षां तुझ्या धैर्याची शाबास खरी. मग या शोधाच्या कामांत तुझ्यावर संकटेंहि आलींच असतील!

१ हेरः——फक्त एक महाराजांच्या पायांची कृपा म्हणूनच जगून वांचून आलों.

शकुनीः——तुझ्या बायकोच्या कपाळाच्या कुंकवाच्या बळावर असें कां म्हणेनास?

१ हेरः——अशा त्या अरण्यांत अशा त्या शस्त्रास्त्रांच्या सरंजामानिशीं जाऊन, अशा त्या श्वापदांची शिकार करितांना मजवर अनेक संकटें आलीं. मी वाघ—सिंहांच्या छातीवर कितीक वेळां बसलों, तर वाघ—सिंह माझ्या छातीवर कितीक वेळां बसले. गरुडपक्ष्यांच्या पकडींत सांपडून वर उंच गेल्यावर आकाशांत मला त्यांच्याशीं युद्ध करून आपली सुटका करून घ्यावी लागली. सर्पाच्या मागें लागून खोल विवरांत शिरावें लागल्यानें पाताळांतून भूलोकावर आल्याचा अनुभव मला मिळाला. भूत, पिशाच, वेताळ, समंद, ब्रह्मराक्षस——

शकुनीः——यांची सुद्धां तूं शिकार केली असली पाहिजे. पण या सर्व प्रयत्नांत एका पांडवांच्या शिकारीखेरीज बाकी तुझी सर्व शिकार साधली. तूं हेरापेक्षां भाट किंवा फार तर एखादा कवि होण्याच्या अधिक लायकीचा

दिसतोस. चालता हो पाहूं माझ्या पुढून ! अरण्याच्या या सर्व वर्णनावरून तूं आपलें घर सोडून बाहेरसुद्धां पडला नव्हतास आणि हेराच्या कामगिरी करितां तुला दिलेली सर्व रक्कम घरच्याघरींच उडविलीस असें मला वाटतें. कायरे, तूं कधीं निशा करीत असतोस का ?

१ हेर:—छे सरकार, दारुला मी शिवतहि नाहीं. फक्त अफूची गोळी खाऊन वरती थोडी भांग पीत असतों.

शकुनी:—तूं सत्यवक्ता आहेस. अशीं अद्भुत वर्णनें दारू पिणारापेक्षां भांग पिणारालाच अधिक सुचायचीं. कोण आहेरे तिकडे ? मार याला धक्के आणि घालवून दे पाहूं. ( हेर जातो. )

२ हेर:—[ प्रवेश करून ] पांडव बारा वर्षांच्या वनवासाला कंटाळले असून ते मनुष्याच्या सहवासाला हपापलेलेहि असावे असा तर्क करून मी अरण्याची वाट सोडून भरवस्तीच्या नगरांत त्यांचा शोध करूं लागलों.

शकुनी:—तुझा तर्क बरोबर आहे. शिवाय माणसांत माणूस मिसळून सहज खपून जातें. संशयाची फसवणूक राजमार्गानें जितकी होते तितकी आडवाटेनें होत नाहीं. बरें तूं पुढें काय केलेंस ?

२ हेर:—क्षुद्र मनुष्याचा वेष घेण्यापेक्षां मोठ्या ऐश्वर्यसंपन्न मनुष्याचा वेष घेतल्यानें सर्वत्र प्रवेश होणें सोपें, असें समजून मी एक प्रवासाला निघालेला राजपुत्र बनलों. ज्या नगरांत जावें त्यांत एक जंगी वाडा भाड्यानें घ्यावा, पांच पन्नास दासदासी बाळगाव्या, गाड्याघोडीं ठेवावीं, पंचपक्वान्नांचें जेवण रोज करवावें, स्नेहीमंडळी मेजवानीला बोलवावी, वर दिवाणखान्यांत सोन्यारुप्यांच्या पेल्यांतून पिण्याची दारू उडवावी आणि खालीं अंगणांत रंगीबेरंगी आतषबाजीची दारू उडवावी, नाचगाणीं करावीं—

शकुनी:—एकूण राजा सुयोधनाच्या पैशावर तूं गुप्त हेरानें चार दिवस राजासारखी चैन केली म्हणतोस ! तुझा राजयोग फारच चांगला फळाला आला खरा !

२ हेर:—हेतु इतकाच कीं, या चैनीच्या आणि श्रीमंतीच्या मान्यांत पांडवांसारखीं मातबर माणसें सहज नजरेला पडून सांपडायचीं !

शकुनी:—पण फुकट मिळालेल्या या श्रीमंतीच्या धुंदींत पांडव दृष्टीस पडले तरी ते तुला दिसायचेच कठीण !

२ हेर:—तें कां महाराज ? माझ्या घरीं मेजवानीला येणाऱ्या माणसांपैकीं दोघांचौघांनीं आपण पांडव असल्याचें जवळ जवळ कबूलहि केलें होतें. पण—

शकुनी:—पण काय ? मी सांगतों काय झालें तें. तुझ्या जवळचा पैसा संपून मेजवान्या बंद पडल्या; तेव्हां तुझ्या घरीं येणारे हे अन्नार्थी पांडवहि पुढें यायचे बंद झाले दुसरें काय ?

२ हेर:—महाराजांनीं बरोबर ओळखलें. माझ्या जवळचे सर्व पैसे संपून उलट वर पुष्कळसें कर्ज झालें आहे. सरकार, तेवढें देवाविण्याची आज्ञा व्हावी.

शकुनी:—दुसऱ्याच्या पैशावर राजयोगाचीं सुखं भोगण्याची चटक तुला लागली ती अजून सुटलेली दिसत नाहीं. ठीक आहे, कैदखान्यांत कांहीं दिवस काढ म्हणजे तूं बरा निरोगी होऊन परत जाशील. कोण आहेरे तिकडे, या हेराला धक्के मारून तुरुंगाच्या सुभेदाराच्या स्वाधीन कर.

[ हेर जातो. ]

३ हेर:—( प्रवेश करून ) पांडव वनवासाला कंटाळले असें समजून मीहि त्यांना नगरांतूनच शोधण्याचा प्रयत्न केला. पण दरबार थाटून पांडव कसचे सांपडणार ? म्हणून मी स्वत: गुप्त वेषांतच राहिलों; आणि गुप्त बातम्या मिळण्याचे सर्व अड्डे ठिकठिकाणीं मी आपलेसे करून घेतले.

शकुनी:—ते कसे काय ?

३ हेर:—प्रत्येक नगरांत रिकामटेकडे व दुसऱ्याच्या नुसत्या उठाठेवी करणारे छिद्रान्वेषी लोक पुष्कळ असतात. शहरांत बाहेरचा कोण आला गेला, कोण कसा आहे हें सगळें यांना माहीत असतें. अशा लोकांना खूप पैसे चारून मी वश केलें. विशेषत: नगरांतल्या विश्वयोषिता, वारयोषिता यांचा मी परिचय केला. कारण गावांत येणाऱ्या नव्या लोकांची माहिती जशी त्यांच्याकडे मिळते तशी ती कोतवालींतहि मिळत नाहीं.

शकुनी:—आला मजकूर ध्यानांत. पांडवांची माहिती वारयोषितां-च्याकडून मिळवूं पहाणाऱ्या हेराची अक्कल समजली. तुला कामगिरीकरितां दिलेले सर्व पैसे संपून गेले असतील !

३ हेर:—होय महाराज आणखी थोडे पैसे देण्याची कृपा व्हावी, म्हणजे पाडवांना हटकून शोधून काढतों.

शकुनी:—कोण आहेरे तिकडे, या बेअकली मनुष्याला कोतवालाच्या स्वाधीन करून फटके मारा म्हणून सांग माझा हुकूम. [हेर जातो.]

४ हेर ( प्रवेश करून )—पांडवांना आयती एक वर्षाची फुरसत मिळाली; तिचा उपयोग ते बहुधा तीर्थयात्रेकडे करतील असा मनाशीं मी विचार केला. तीर्थयात्रेच्या योगानें एक ठिकाणीं पुष्कळ दिवस मुक्काम करण्याची आपत्ति टळून शिवाय त्यांतल्यात्यांत पुण्यसाधनहि घडतें. फरारी होणाऱ्या पळपुट्या लोकांना क्षेत्रें आणि तीर्थें हीं मोठीं आश्रय-स्थानें होतात.

शकुनी:—पांडव मुमुक्षू ब्राह्मण नसून कर्मवीर क्षत्रिय आहेत हें याच्या गांवींहि नाहीं. शिवाय ते वृद्धहि नाहींत, धर्मसाधनाच्या मागें लागायला ! बरें, मग तुला एकाद्या क्षेत्राच्या जागीं पांडव आढळले का ?

४ हेर:—पांच पांच पुरुष बरोबर एकेक बायको असे यात्रेकरूंचे समुदाय मला पुष्कळ ठिकाणीं आढळले. तेव्हां हेच पांडव असावे असा मी तर्कहि केला पण—

शकुनी:—पण काय ?

४ हेर:—पांडवांना पूर्वी कधीं मी पाहिलें नव्हतें आणि आपण टिपून दिलेली चेहेरेपट्टी मी बरोबर न्यायला विसरलों इतकेंच.

शकुनी:—मिळून पांडवांचा शोध न लागला तरी तुझ्या सर्व तीर्थ-यात्रा बिनखर्चीं भागल्या म्हणतोस. हा हेर मूर्ख असला तरी भाविक आहे, स्वार्थी नाहीं. जा याला नुसता हांकलून द्या. [ हेर जातो. ]

५ हेर ( प्रवेश करून ):—पांडवांना अज्ञातवासाचे दिवस घालवा-यला त्यांचा मित्र श्रीकृष्ण याच्या द्वारका नगरीसारखें दुसरें ठिकाण नाहीं असें जाणून मी तिकडे गेलों. शोध करितांना मला असें समजलें कीं,

पांडवांचे रथ, घोडे आणि सारथी हे मात्र द्वारकेंत शिरले खरे; पण स्वतः पांडव द्वारकेंत गेल्याचा मागमूस लागला नाहीं. तेव्हां मी हताश होऊन परत आलों.

शकुनीः—कोणत्याहि संकटांत श्रीकृष्ण पांडवांना मदत करतो व करणार ही गोष्ट खरी. तरी पण 'अज्ञातवास' या शब्दाचा खरा अर्थच तुला न कळल्यामुळें तुझ्या हातून ही चूक झाली आहे. पांच पांडव व सहावी द्रौपदी यांच्याखेरीज कोणीहि म्हणजे खुद्द श्रीकृष्णानेंहि त्यांना या एक वर्षात ओळखलें असतें तरी त्यांचा पण फुकट गेला असता. असो, तुझाहि मला फारसा उपयोग नाहीं, जा. [ हेर जातो. ]

६ हेरः—( प्रवेश करून ) मी हेर आहे पण श्रद्धाळू आणि धार्मिक आहे सरकार. पांडवांचा शोध लावण्याची कामगिरी पत्करल्यापासून मी गायत्रीपुरश्चरण करीत असतों आणि नित्य रात्रीं मला जीं स्वप्नें पडतात तीं मीं एके ठिकाणीं लिहून ठेवलीं आहेत. गायत्रीकृपेनें पांडवांच्या ठाव-ठिकाणाचा मला दृष्टांत नच झाला तर शेवटीं सगळ्या स्वप्नांचा अर्थ एकत्र करून त्यावरून सुचलेल्या दिशेनें जाऊन मी पांडवांचा शोध कर-णार आहें. माझें शोधाचें काम अजून संपलें नाहीं महाराज !

शकुनीः—कर्मठ ब्राह्मणा, जा आपल्या घरीं जाऊन खुशाल बैस. फिरून द्रव्याच्या आशेनें हेराचें काम पत्करूं नको. [ हेर जातो. ]

७ हेरः—( प्रवेश करून ) मी दैववादी आहें सरकार. माझा असा पक्का विश्वास आहे कीं, माझें दैव खंबीर असलें आणि माझ्या नशिबांत द्रव्यलाभ असला, तर मी घरबसल्या पांडव माझ्या घरींच चालून येतील आणि आम्ही पांडव म्हणून मला सांगतील. मग त्यांना ओळखायला कसली पंचाईत ?

शकुनीः—खरें आहे. पांडवांनीं स्वतः तुला आपल्या तोंडानें आम्हीं पांडव म्हणून सांगितल्यावर मग त्यांना ओळखायची मुळींच पंचाईत नाहीं. जा. हेराचें काम पत्करण्यापेक्षां एखाद्या नगरांत जाऊन फलज्योति-षाचें दुकान काढ, म्हणजे तुला याहून अधिक फायदा होईल.

७ हेरः—असें कां म्हणतां सरकार ? दैवगति दुर्निवार असते. दैवगतीमुळेंच पांडवांना द्यूत खेळण्याची बुद्धि झाली आणि वनवास घडला.

शकुनीः—तुझ्या सारख्या दैववाद्याला हेर म्हणून पुढें येण्याचा तरी उद्योग करण्याचें काय कारण होतें ? तुझा दैववादावरहि खरा विश्वास नाहीं. जा, निवळ दैववादी लोकांचा राजनीतीला उपयोग नसतो. तुझे ग्रह तुझी वाट पहात बसले असतील. [ हेर जातो. ]

८ हेरः—( प्रवेश करून ) तेजस्वी मनुष्य अज्ञातवासांत असला तरी त्याच्या हातून होणारीं कृत्यें नेहमीं तेजस्वीच असतात. म्हणून एखादें लोकोत्तर तेजस्वी कृत्य घडलेलें ऐकूं येण्याचीच मी वाट पहात होतों. आणि विराट नगरांत कीचकासारख्या बलाढ्य योद्ध्याचा गुप्त वध झाला असें ऐकतांच हे पांडवकृत्यच असलें पाहिजे असें समजून मी तेव्हांपासून विराट नगराच्या आसपास घिरट्या घालूं लागलों. ज्या स्त्रीकरितां एवढा मोठा पराक्रम झाला ती स्त्री सती द्रौपदीच असली पाहिजे; आणि तो पराक्रम करणारा वीरहि भीमसेनच असला पाहिजे, असा तर्क बांधून मी बारीक नजरेनें गुप्त शोध चालविला आहे सरकार.

शकुनीः—( उठून ) शाबास, तुझा युक्तिवाद अगदीं बरोबर आहे. तुला यश न आलें तरी तुझी शोधाची दिशा बिनचूक आहे. बरें पण तुझ्या पुढच्या शोधांत आणखी काय काय निघालें सांग पाहूं ?

८ हेरः—मला पुढें शोध लावतांना आणखी असें समजलें कीं, सुमारें ८।९ महिन्यांपूर्वीं विराट नगरांत एकाच दिवशीं पांच पुरुष व एक स्त्री निरनिराळ्या वेषानें शिरून सर्वांनीं विराट राजाच्या पदरीं नोकऱ्या धरल्या; आणि हे स्त्रीपुरुष अद्यापि विराट नगरांतच वास्तव्य करित आहेत. त्यांनीं नीच वेष पत्करले असले तरी त्यांचें तेज कांहीं लोकोत्तर आहे असें म्हणतात.

शकुनीः—तुझा तर्क बरोबर आहे. माझ्या विचाराशीं तुझे विचार तंतोतंत जुळतात. पांडव शत्रु खरे; पण ते कोणत्याहि वेषानें चांगल्या लोकांत मिसळले असतां आपल्या तेजानें आणि गुणांनीं इतर लोकांवर आपली छाप बसविल्याशिवाय राहणार नाहींत, हें मला, म्हणजे पांडवांच्या कट्ट्या शत्रूलाहि

कबूल केलेंच पाहिजे. मेघपटल कितीहि दाट आलें तरी तें सूर्याला पूर्णपणें झाकूं शकत नाहीं. फार काय पण खग्रास ग्रहणांत सूर्य सांपडला असतां देखील पशुपक्षी भांबावून सूर्यास्त झाला म्हणोत, पण मनुष्याला मनुष्याचें तोंड दिसण्याइतका तरी सूर्यप्रकाश अवशिष्ट राहतोच. पांडव विराट नगराच्या आसपास किंवा खुद्द विराट नगरांत असल्याची बातमी मला दुसऱ्याहि एका हेराकडून पूर्वीच कळली आहे, तरी पण हें घे तुला तुझ्या चातुर्याबद्दल बक्षीस. [ सोन्याचें कडें काढून देतो. ]

पद १६. चाल—अति अगाध हा भव.

किती कुशाग्र मति तूं अवसर्पा । अवमानिल तव गति
सर्पा ॥ ध्रु० ॥ दूर राहिलें भक्ष्य तरि तया आघ्राणुनि
करिसी दंशा । फुत्कारें घन व्रण पाडोनी त्यांत ओतिशी
तीव्र विषा ॥ किति ॥ १ ॥

( हेर जातो. )

कोण आहेरे तिकडे, विराट राजाच्या अमात्यांना मी बोलावणें पाठविलें होतें ते आले आहेत का पहा. [ सेवक जातो. ] विराट नगरांतला हा भोळा मनुष्य माझ्या हातीं सांपडला आहे, पाहूं त्याचा कितपत उपयोग होतो तो. [ अमात्य प्रवेश करितो. ] या, अमात्यराज या. [ उठून आसन देऊन बसवितो. ]

अमात्यः—मला आपलें अत्यंत स्नेहभावाचें पत्र पोंचलें, म्हणून आलों त्याच पावलीं.

शकुनीः—आपले माझ्यावर तर फार उपकार झालेंच; पण आपण आल्यानें आपले विराट राजावरहि फार उपकार होण्याचा संभव आहे. आपली निःसीम राजभक्ति जाणूनच मी आपली भेट घेण्याची इच्छा धरली. हल्लीं विराट राजावर मोठें संकट आलें आहे, हें आपणांला माहितच आहे.

अमात्यः—होय. कीचकवध झाल्यामुळें निर्भय होऊन त्रिगर्त राजानें आमच्या महाराजांवर स्वारी करण्याचा बेत केला—

शकुनी:—आणि कौरवराज सुयोधन याचेंहि त्याला या कामीं सहाय आहे हेंहि आपणाला कळून चुकलेंच असेल.

अमात्य—होय, तेंहि दुर्दैवानें खरें आहे.

शकुनी:—विराटराजाचा व माझा पुरातनचा ऋणानुबंध आहे हेंहि तुम्ही जाणतां—

अमात्य:—होय. विराटराजांकडून मी तें ऐकलें आहे.

शकुनी:—म्हणूनच प्रस्तुतच्या संकटांत विराट राजाचें रक्षण करावें असा मी निश्चय केला आहे.

अमात्य:—आपले फार उपकार आहेत. पण हें कसें होणार ?

शकुनी:—म्हटलें तर ते सोपें आहे. म्हटलें तर फार अवघड आहे. पण तें सोपें किंवा कठीण होणें हें सर्वस्वी तुमच्या हातीं आहे.

अमात्य:—शकुनीराज, आपण हें काय बोलतां ? विराट राजावरचें संकट टाळण्यासारखी माझ्या हातची गोष्ट असतां ती मी करण्याला माघार घेईन अशी आपणाला शंका तरी कशी येते ?

शकुनी:—शंका येण्याचें कारण इतकेंच कीं—

अमात्य:—बोला, मन मोकळें करून निःशंकपणें बोला; कचरूं नका.

शकुनी:—कारण इतकेंच कीं. पांडवांविषयीं तुमचें प्रेम कितपत आहे हें मला माहीत नाहीं.

अमात्य:—पण पांडवांचा यांत काय संबंध ?

शकुनी:—तो संबंध मी लवकरच तुह्मांला सांगेन. मला इतकेंच सांगा कीं, पांडव आणि राजा विराट यांच्यापैकीं तुम्हांला कोण अधिक प्रिय आहे ?

अमात्य:—माझ्यासारख्या कट्टया राजनिष्ठ मनुष्याला तुम्ही फिरून असा प्रश्न कसा करितां ?

शकुनी:—हा सुखासुखी कमी अधिक प्रेमाचा विचार नाहीं. समजा, विराट राजावरचें संकट टाळण्याकरितां तुह्मांला पांडवांचें अनहित करावें लागलें, तर त्याला तुम्ही तयार व्हाल काय ?

**अमात्यः**—फिरून चमत्कारिक प्रश्न. एरवीं मी स्वामिभक्त कसला? मला घोंटाळ्यांत पाडूं नका स्पष्ट बोला.

**शकुनीः**—तर मग आतां स्पष्टच बालतों. तुम्ही पांडवांना अज्ञातवासांत विराट नगरांत थारा दिला आहे, ह्मणूनच त्रिगर्त राजावरोबर कौरव सैन्य विराट नगरावर चाल्रून जात आहे.

**अमात्यः**—कोण हा गैरसमज. आम्ही पांडवांना आमच्या नगरांत थारा दिलेला नाहीं.

**शकुनीः**—दिला नसला तर उत्तमच; पण समजा पांडव तुमच्या नगरांत शोधतांना सांपडले तर?

**अमात्यः**—सांपडले तर त्यांना खुशाल घेऊन जा!

**शकुनीः**—त्यांना घेऊन जाण्याचें कारण नाहीं. ते अज्ञातवासांत असल्यामुळें त्यांना आम्ही नुसते ओळखले कीं पुरे, ते चोरासारखे आपल्या पायांनीं वनवास भोगायला वनांत निघून जातील. पण शोधायला झाली तरी तुमची मदत पाहिजे; ती द्याल काय?

**अमात्यः**—विराट राजावरचें संकट हटकून नाहींसें होईल असें मला वचन द्याल तर ती मदत करीन. (हंसून) बाकी पांडवांचा आमच्या नगरांत शोध म्हणजे—

**शकुनीः**—पुष्कळ वेळां कल्पनातीत अशाहि गोष्टी घडून येतात. पण असो; तुम्हांला वचन पाहिजे असेल तर हें घ्या देतों. (हातावर हात मारून) पांडवांच्या शोधाला तुम्ही मदत केली तर विराट नगरावरून कौरव सैन्य परत नेण्याचें काम माझ्याकडे लागलें.

**अमात्यः**—मग या गोष्टीला विलंब कां? होऊं द्या शोधाला प्रारंभ. किंबहुना तुम्ही स्वतःच माझ्याबरोबर चला आणि हवा तो शोध करा.

**शकुनीः**—फार उत्तम. मीच तुमच्याबरोबर येतों. मात्र पांडवांना मी ओळखण्याच्या आधीं मला पांडवांनीं ओळखूं नये म्हणून मला वेषांतर करून यावें लागेल.

**अमात्यः**—तें सर्व कसें काय हें तुमचें तुम्ही ठरवा. गांवच्या महारवाड्यापासून राजवाड्यांतल्या अंतःपुरापर्यंत तुह्मांला हिंडण्या फिरण्याला

परवानगी आणि मदत द्यायचें काम माझ्याकडे लागलें. मी येतों तर. अशा संकट समयीं नगर सोडून मला फार वेळ बाहेर राहतां येत नाहीं. येतों मी.

शकुनी:—अमात्यराज, मी आपला फार फार ऋणी आहें. सुयोधनाच्या मनांतलें विराटराजाबद्दलचें हें हृदयशल्य नाहींसें होऊन उभयतांचा कायमचा स्नेह व्हावा इतकाच माझा हेतु. [अमात्य जातो] विराट नगरावर दोहों बाजूंनीं कौरव सैन्याचा मारा होत असतां मला गुप्त वेषानें जर नगरांत वावरायला मिळालें तर फारच मौज होईल. पांडवांना विराटराजानें थारा दिल्याचें सिद्ध झालें तर राजा सुयोधन माझें वचन बिचन कांहींएक न मानतां विराटराजाची पाळेंमुळें खणून काढल्याशिवाय राहणार नाहीं. तसें झालें तरीहि बरेंच. कौरवांचा एक शत्रू कायमचा कमी होईल. येऊन जाऊन माझें वचन खरें ठरण्याचीच पंचाईत. पण राज्यकारभारांत दिलेलीं वचनें पाळलीं तर मी शकुनी कसला?

पद १७. चाल—होय संसारतरु.

राजकारणिं दिलें वचन अवसरभरें कोण मानिल तया<br>
चतुर जो नृपवरा ॥ ध्रु० ॥ जलतल लिखित लेख<br>
अति सुंदर तरि तरल तरंग उठतां होय जलमय<br>
विफल ॥ राज० ॥ १ ॥

[जातो.]

## अंक २ प्रवेश २

**अर्जुन**:—अज्ञातवास आणि गर्भवास हे एकच नव्हेत काय ? अज्ञातवासाप्रमाणें गर्भवासहि मनुष्य प्राण्याला अनिच्छेनेंच घडतो. एकाची अवधी बारा महिने एकाची नऊ महिने इतकाच फरक. वस्तुतः जिवंत पण बाह्य समाजाच्या दृष्टीनें अदृश्य, म्हणून गर्भवासी प्राणी म्हटला तर जगांत आहे, म्हटला तर नाहीं. आम्ही पांडवहि जगाच्या दृष्टीनें आज बारा महिने असून नसून सारखेच होतों. गर्भावस्थेंतल्या प्राण्याप्रमाणें जग फार झालें तर अनुमानानें आमचें अस्तित्व मान्य करीत असेल. गर्भावस्थेंतला प्राणी आईच्या चिंतेचा विषय होऊन राहतो तशीच आमच्या आयांनीं आमची चिंता केली असेल. येऊन जाऊन फरक इतकाच दिसतो कीं, गर्भवास संपविणारें मूल स्वतः रडत जन्माला येतें, आणि आम्हीं मात्र या अज्ञातवासाच्या गर्भांतून स्वतः हंसत बाहेर पडून कौरवांना रडविणार ! आम्ही दुष्ट दुर्योधनाच्या मूळावर जन्माला येणार खरे.

पद १८. चाल—कंगन वा मोरा हात.

गर्भवास अज्ञातवास । उभय गमती तुल्य हे मजलागीं
स्वरुपिं खास ॥ ध्रु० ॥ अंतकालिं परि फल येई विषमचि
हंसु पांडव अरि होतिल दास ॥ गर्भ० ॥ १ ॥

[ उत्तरा घाईघाईनें येतें. ]

या ताईसाहेब, मी वाद्यें जुळवून बसलें आहें. आज गायन आणि नृत्य यापैकीं तुम्हांला कोणतें शिकावेंसे वाटतें ? तुमच्यासारखी विद्यार्थीण मला आजवर मिळाली नव्हती.

**उत्तरा**—बृहन्नडे, प्रसंग कोणता ? आणि तुला नृत्यगायन कसें आठवतें ? आणि नृत्यगायनाचें सुख सेवन करायला माझें तरी मन मोकळें कुठें आहे ?

**अर्जुन**:—ताईसाहेब, प्रसंग कोणताहि असला तरी मला बृहन्नडेला दुसरें काय सुचणार ? माझा सारा जन्म याच व्यवसायांत गेला. आणि

तुम्हांला झालें तरी, ताईसाहेब, अशा प्रसंगींहि नृत्यगायनाचा नित्यपाठ घ्यायला काय हरकत ? पुरुषांचें काम पुरुष करीतच असतील; त्यांत बायकांनीं लक्ष घालायला कशाला पाहिजे ?

उत्तरा:——प्रत्यक्ष युद्ध करण्याचें काम पुरुषांचें असलें तरी त्यांची चिंता वाहण्याचें काम बायकांकडे असतें. पुरुषांचा पराक्रम हा बाण असला तरी त्याला धनुष्याच्या दोरीप्रमाणें स्त्रियांच्या चिंतेनें आणि ममतेनें गति मिळते. उत्तेजन देण्याला घरीं बायका नसल्या तर पुरुष निष्काळजीपणानें युद्ध करण्याचेंहि टाकून देतील, असें मला माझ्या दादाच्या स्वभावावरून वाटूं लागलें आहे. बृहन्नडे, सांग बरें, कौरवांशीं आणि त्रिगर्तांशीं हा मोठा कठीण प्रसंग आला आहे—सांग, तुला तरी कांहीं युक्ति सुचते का यांतून ? आज इतके दिवस तूं माझ्याशीं इतकी प्रेमळपणानें वागली आहेस कीं, मनांतलें दुःख तुझ्याशीं मन मोकळं करून बोलल्याशिवाय राहवत नाहीं.

अर्जुन:——[ हंसून ] युद्धप्रसंगीं सल्ला विचारायला, ताईसाहेब, तुम्ही फार चांगलें ठिकाण हुडकून काढलें आहेत म्हणायचें नी काय ? एखादा भैरव राग आळवून शत्रूचा पराभव करतां येत असेल तर मला सांगा. माझ्या पायांतले चाळ वाजवून कौरवांना भीति वाटण्यासारखी असली तर सांगा, मी जाऊन कौरवसेनेपुढें नृत्य करितें. स्वरमूर्छेनेनें शत्रूला मूर्छा आणतां येईल तर मी एकटी त्यांचा पराभव करीन. वीर्योन्मादानें बेताल झालेल्या शत्रूचें माझे ताल निवारण करतील तर मी तयार आहें.

उत्तरा:——बृहन्नडे गडे अशी थट्टा करूं नकोस. मी ही कांहीं तुझी थट्टा करण्याकरितां म्हणून तुला सल्ला विचारायला नाहीं आलें. या संगीतशाळेंत देखील तूं इतकें चातुर्य दाखविलें आहेस कीं, तुला हा बृहन्नडेचा वेष कोणींतरी मत्सरी किंवा दुष्ट देवतेच्या शापामुळें प्राप्त झाला असावा असेंहि मला एखादे वेळीं वाटतें. सांग, बृहन्नडे, माझें समाधान होईल असें कांहीं तरी सांग.

अर्जुन:——बरें तसेंच कां होईना ! कौरवांचा पराभव करण्याला या जगांत मला पांडवांखेरीज दुसरे कोणीच समर्थ दिसत नाहींत. पांडव

अज्ञातवासांत आहेत असें ह्मणतात, तेव्हां त्यांचा शोध काढून त्यांची मदत आपल्या महाराजांनीं कां घेऊं नये ?

उत्तराः—छेः, बृहन्नडे, सापानें पायाला विळखा घातला तर म्हणे हिमालयावर जाऊन वनस्पतींचें औषध आणा, असें ह्मणण्यापैकींच तुझी ही युक्ति मला दिसते. अज्ञातवासामुळें गुप्त वेषानें राहणारे पांडव आह्मांला कसे हुडकून काढतां येतील ? आणि त्यांतूनही ते सांपडले तरी आमच्यावरचें संकट दूर होण्याकरितां त्या बिचाऱ्यांनीं अकाळीं प्रकट होऊन फिरून वनवासाला जावें असें मी काय म्हणून करावें ?

पद १९. चाल—अरियेरि पियाबिन.

जरि पांडव मजला आढळले । तरि कधिं न करिन मीं
त्यां प्रगट वळें ।। ध्रु० ।। स्वहितपर जगीं जन असला
तरि । अनुचित विघात हें त्याहि कळे ।। पांडव १ ।।

अर्जुनः—बरें ही नको तर दुसरी एक तोड तुह्मांला सांगतें.(आपली सैरंध्री आहे नव्हे का)?

उत्तराः—होय. मग तिचें काय ?

अर्जुनः—तिचे नवरे पांच प्रबळ गंधर्व आहेत. तिनें त्यांना विनंति केली तर ते नाहीं का येणार महाराजांच्या बाजूनें लढायला ? ते किती रागीट आणि पराक्रमी आहेत हें कीचकवधावरून दिसून आलेंच आहे. त्यांची मदत आपल्याला मिळाली तर ! कीचक मेला म्हणून त्रिगर्त आतां युद्धाला आला आहे; पण ज्या कीचकाच्या भीतीमुळें त्रिगर्त दडून बसला होता त्या कीचकाला क्षणार्धांत मारून टाकणारे गंधर्वच जर आमच्या बाजूनें लढायला आले तर त्रिगर्तांचा पराभव होईल यांत शंका कसली ?

उत्तराः—होय बृहन्नडे; ही मात्र तुझी युक्ति मनाला पटण्यासारखी आहे. पण बाई तिचा आमच्या राजवाड्यांत आजवर छळ कसा झाला, हें तूं पाहिलेंसच. तेव्हां तिला आम्ही कोणत्या तोंडानें सांगावें ?

अर्जुनः—सैरंध्रीवर या राजवाड्यांत संकटें आलीं असलीं तरी कीचकामारख्यांनीं आणलीं. उलट महाराज, राणीसाहेब, आपण स्वतः या

सर्वांना तिला प्रेमानेंच वागविलें आहे. त्याबद्दल तिच्या मनांत कृतज्ञताच असली पाहिजे. आपल्या गंधर्व पतींची मदत देऊन तिला जर आपल्यावर थोडा प्रत्युपकार करतां आला तर ती कां नाहीं करणार ?

उत्तरा:—पण बृहन्नडे, माझ्यानें तिच्याशीं याविषयीं बोलवणारच नाहीं. तूंच हें नाजूक काम करशील का ?

अर्जुन:—मी तें फार आनंदानें करीन. मात्र सैरंध्रीची आणि माझी गुप्त भेट होईल अशी तजवीज करा.

उत्तरा:—तें काम माझ्याकडे लागलें.

अर्जुन:—दुसरे असेंहि करा ताईसाहेब. राज्यावर संकट आलें आहे तेव्हां आपल्या या नगरांतली जेवढी म्हणून सशक्त आणि प्रबळ माणसें असतील त्यांना महाराजांच्या मदतीला पाठवा. समजा, आपल्या मुदपाकखान्यावरचा बल्लव, बरा धटिंगण आहे. युद्धकलेचें ज्ञान नसलें तरी एरवींहि लीलेनें हजार-पांचशें शत्रुसैन्य लोळवील. आपलें अन्न त्यानें आजवर खाल्लें, मग त्याचा अशा प्रसंगीं उपयोग करून घ्यायचा नाहीं तर केव्हां ?

उत्तरा:—होय ग बृहन्नडे बरोबर आहे. आणि राजवाड्यांतली गर्दी कमी झाल्यामुळें त्यानें शिजविलेले भाताचे प्रचंड हंडे खायला तरी इथें आतां कोण आहे ? होय, त्यालाहि मी बाहेर काढतें. तूं सैरंध्रीचें मन वळवण्याचें काम मात्र विसरूं नको हं. [ जाते. ]

अर्जुन:—आपली चिता आपल्या हातानें पेटवल्याप्रमाणें कौरवांना या वेळीं विराट नगरावर स्वारी करण्याची बुद्धि झाली. हें युद्ध आम्हां पांडवांना इष्टच आहे. हें युद्ध जिंकून, यज्ञाच्या ज्वाळेंतून निघालेल्या देवतेप्रमाणें, आम्ही अज्ञातवासांतून प्रगट झाल्यानें कौरवांचे डोळे दिपून जातील. एखाद्या डबक्यांतून घाणेरडा मासा उसळी मारून निघाला तरी तो आवाज करितो; मग आम्ही पांडवांनी पाताळासारख्या संकटमय अज्ञातवासांतून बाहेर पडतांना सर्व जग हादरून थरारून जाण्यासारखा प्रचंड आवाज केला तर तो योग्यच आहे.

पद २०. चाल—प्रथम आद.

गहन नाद जगिं भरेल जयिं आम्ही करुं पांडव तांडव
श्रीशंकरसम समरीं ॥ ध्रु० ॥ वैर अनादि अपार मनिं
आठवुनि नाचूं थैथय अरि कौरव उदरीं ॥ गहन ॥

( उत्तर येतो. )

हं, हा उत्तर आला वाटतें. हा बहुतकरून नृत्यगायनाचे धडे घ्यायला आला असेल. पक्का स्त्रैण आहे. मला तर उत्तर आणि उत्तरा यांच्या नावांची अदलाबदल करावीशी वाटते. हा बायकांच्या जन्माला यायचा पण थोडें चुकलें. ( उघड ) यावें कुमार, मी आपलीच वाट पहात होतों.

उत्तरः—बृहन्नडे, त्रिगर्तांची स्वारी ती काय आणि बाबांनीं खटाटोप तो काय केला ? ह्मातारीं माणसं उगीच कोणत्याहि गोष्टीचा बलवा फार करितात. तळहातावर येऊन बसलेल्या माशीपेक्षांहि त्रिगर्तांची योग्यता मी कमी समजतों. तें काय नुसतें घुंगुरटें आहे.

अर्जुनः—पण, कीचक जीवंत होता ह्मणूनच त्रिगर्तांपासून मी निर्भय आहे असें विराट महाराज नेहमीं म्हणत, आणि कीचक मरतांच त्यांना त्रिगर्तांची पुन्हां भिती वाटूं लागली.

उत्तरः—बृहन्नडे, त्रिगर्तांची वाखाणणी करितांना तूं हळूच कीचकाचीही वाखाणणी करायला सुरवात केलीस. अहाहा ! काय तो कीचक ! उगाच आपलें त्याला सर्वांनीं भ्यावें. तो शूर व बलाढ्य होत असें ह्मणण्यापेक्षां त्रिगर्तांसुद्धां सर्व लोकांनीं त्याला भिण्याचा कटच केला होता हें म्हणणें अधिक शोभेल. उगाच एखाद्या माजलेल्या रेड्यासारखीं अगर बैलासारखीं ज्याच्या त्याच्यावर कीचक आपल्या उन्मत्तपणाचीं शिंगें उगारीत होता इतकेंच. पण तुला सांगूं का बृहन्नडे, माझ्या दृष्टीला त्याची दृष्टच ठरत नव्हती.

अर्जुनः—पण कौरवांकडच्या योद्ध्यांबद्दल, कुमार, तुमचें मत कसें काय आहे ?

उत्तरः—काय असायचें ? शौर्याची कीर्ति उगाच एखाद्या नदी-सारखी फुगत जाते वहातां वहातां. मुळांत पहावें तर चुळकाभर सुद्धां पाणी नसायचें. लोकांची स्तुति करण्याची रीतच अशी आहे जगांत. वानर उड्या मारतांना जशी एकमेकांवर ताण करण्याकरितां उंच उंच उड्या मारीत जातात, तसाच प्रकार स्तुतीचा. पराक्रमाची स्तुति होतां होतां अखेर स्तुतीचाच पराक्रम अधिक ठरतो. स्तुतिपाठकाचें लक्ष मूळच्या स्तुतिविषयावरून उडून आपल्या स्तुतिशब्दाकडे लागतें. तो बोलला त्यावर अतिशयोक्तीनें मी वरचढ कशी करीन, इतकीच त्याला काळजी. कौरव मोठ्या घराण्यांतले राजपुत्र. श्रीमंतांची मुलें सर्वगुणसंपन्न असायचीं, याच न्यायानें कौरव शूर आहेत. बाकी दुर्योधनानें आजवर कोणता पराक्रम गाजविला आहे ? त्याला काम्यक वनांत चित्रसेन गंधर्वानें वेण्याला उलटा टांगून, शिकारींत मारलेल्या सशाप्रमाणें, खांद्यावरून चालविला होता, असें मात्र मीं ऐकलें आहे. दुःशासन तर काय बोलून चालून दुष्ट किंवा क्रूर म्हणून प्रसिद्ध आहे. पराक्रमाविषयीं त्याची कीर्ति मुळींच नाहीं.

अर्जुनः—पण दुर्योधनाला बांधून खांद्यावर नेणाऱ्या गंधर्वांचा ज्यांनीं पराभव केला त्या पांडवांविषयीं आपलें काय म्हणणें ?

उत्तरः—त्यांचाहि प्रकार जवळ जवळ असाच. धर्मराज हा पांडवच ना ? पण एखाद्या कर्मठ भिक्षुकाइतकेंहि शौर्य त्याच्या अंगीं असेल असें मला नाहीं वाटत. हा क्षत्रियाच्या जन्माला मात्र आला. पण राजपदावर बसण्यापेक्षां, डोक्याला शालजोडी बांधून पुढें पोथी ठेवून जेहत्ते ज्या कालाचें ठायीं अशा शब्दांनीं सजविलेलें पुराण सांगायला व्यासपीठावर बसला तर तो अधिक शोभेल. दुसरे ते भीमदादा. खादाडपणांतला त्याचा पराक्रम मात्र प्रसिद्ध आहे. त्याचें प्रचंड शरीर पाहून लोक भितात, म्हणून त्याला काय वाटतें कीं ते माझ्या सामर्थ्यालाच भितात !

अर्जुनः—आतां अर्जुना तुझी पाळी आली संभाळ.

उत्तरः—अर्जुन तर काय बोलायलाच नको. वीरकर्मांतला नटवेपणा मात्र त्याच्याजवळ सगळा भरला आहे. पांचाळी द्रौपदी ही त्यानें

मत्स्यभेद करून जिंकली ह्मणतात. पण मला तर वाटतें कीं, अर्जुन आणि द्रौपदी—दोघेहि तरुणच—त्यांनीं जे प्रेम कटाक्षाचे बाण परस्परावर फेकले तेवढाच कायतो द्रुपदाच्या रंगसभेंतला धनुर्विद्येचा खरा पराक्रम. असले हे धनुर्विद्येंतले प्रकार जगांतले बहुतेक राजपुत्र रोज नवे नवे करीत असतात. अर्जुन तर, मला वाटतें, या अज्ञातवासांत एखाद्या आवडत्या स्त्रीच्या मच्छरदाणींत लपून बसला असेल. आणि तें साधलें नसलें तर स्वतःच स्त्रीवेष घेऊन एखाद्या अंतःपुरांत घुसला असेल.

पद २१. चाल—चमक चली मालनी.

मुळिं न काशि लाज वाटलि याला । नरवर हा नच
बाला अबला ॥ ध्रु० ॥ वीर तरी धनु सरसावोनी
करुनी अरि संहार दाविना । विक्रम जगता, वेष—
विपर्यय गुप्त—वास कां यानें वारिला ॥ मुळिं ॥ १ ॥
वीर्यवन्हि कधिं गुप्त न राहे । कुदशापट-संभार-भीतरीं ।
जाळुनि कवचा प्रगटाचि होइल । विश्व दाहका निज
तेजबला ॥ मुळिं न ॥ २ ॥

अर्जुनः—कुमार, हा तुमचा तर्क मलाही पटतो. असो; नकुळ सहदेवांविषयीं तर आतां बोलायलाच नको.

उत्तरः—त्यांचें नावही घेऊं नका. सारांश, कौरवांसारख्या क्षुद्र क्षत्रियांशीं हे युद्ध करायला भ्याले ह्मणून पांडवांनीं वनवास आणि अज्ञातवास पत्करला. प्रतिज्ञापालनाचें नुसतें सोंग आहे!

अर्जुनः—कुमार, भीष्म आणि द्रोण यांच्यासंबंधानें आपलें मत काय आहे?

उत्तरः—त्या म्हाताऱ्यांची निंदा व्यर्थ माझ्या तोंडून का करवितेस? भीष्म हे सर्वांत वृद्ध. बेंबीपर्यंत दाढी लोंबू लागली म्हणजे मग जाग्यावर बसून शौर्याच्या गोष्टी बोलायला ठीक असतात. नुसती दाढी हालवायला काय लागतें! अर्जुनाचा पराक्रम जसा स्त्रैणपणांत, तसाच भीष्माचा ब्रह्मचर्यपालनांत! (हंसून) क्षत्रियाची स्तुती जेव्हां तो "कट्टा ब्रह्मचारी आहे" असें म्हणून लोक करूं लागतात तेव्हां तर मला हंसूच येतें. द्रोण हे सर्व कौरव पांडवांचे बालपणचे गुरु. मुलांच्या पंतोजीला मुलांनीं विद्वान म्हणावें हें ठीकच आहे!

अर्जुनः—खरें आहे कुमार, मोठ्या पदावरच्या लोकांना स्तुती नेहमी फुकट मिळत असते. त्यांच्या खऱ्या कर्तृत्वाकडे कोण पहातों ?

उत्तरः—उघडच आहे, आमचें हें विराटनगरचें राज्य पडलें लहान; तेव्हां बाबांच्या काय किंवा माझ्या काय पराक्रमाची स्तुती कोण करणार ? एखाद्या पराक्रमाच्या कृत्यावर मोठ्या माणसांना जन्मभर स्तुतीवर खुशाल चरायला सांपडतें; पण पराक्रम गाजविण्याची संधीच ज्यांना जन्मभर मिळाली नाहीं असे वीर काय जगांत थोडे असतात ?

अर्जुनः—विराटनगरच्या सारख्या लहानशा राज्यावर विराट महाराजानीं आजवर संतोष मानला हें पाहून खरोखर मला त्यांचें कौतुकच करावेंसें वाटतें. आणि पुढें आपलाहि विचार राज्य वाढविण्याचा दिसत नाहीं. पण ठीक च आहे. घराण्याचें वळण आपणालाहि सोडतां येत नाहीं.

उत्तरः—बृहन्नडे, मी दिग्विजय करायचा मनांत आणलाच तर—

अर्जुनः—हो, आपणाला नको कोण ह्मणणार पण—

उत्तरः—पण क्षत्रिय कुळांत जन्म झाला म्हणून मनुष्यानें उठतां बसतां मारामारीच करावी असें कांहीं नाहीं. हे माझे बाहु पहा, हे दिसतात लहान पण यांत सामर्थ्य किती आहे ? मी हातांत जर धनुष्यबाण कधीं घेतलाच—

अर्जुनः—होय, तेवढीच काय ती अडचण !

उत्तरः—हातांत जर धनुष्यबाण घेतलाच तर सारी पृथ्वी जाळून सोडीन. पण आपला पराक्रम गाजविण्याकरितां दुसऱ्यांच्या स्त्रियांना रडवित बसायचें हें काय म्हणून ? मनाची शांतता संभाळून संतोष राखणें हा पराक्रम, बृहन्नडे, जातिवंत क्षत्रियालाही कांहीं लहान आहे का तूंच सांग बरें ?

अर्जुनः—नाहीं कुणी म्हटलें ? मला तर वाटतें, कुमार, आपण क्षत्रिय कुळाकरितां एक नवा सांप्रदाय बनवून त्याचे आचार्य बनूं शकाल !

उत्तरः—आणि ही मनाची शांतता रहावी, संतोष गमावूं नये, म्हणून माझ्यासारख्या क्षत्रियाला गायनवादनासारखी करमणूक अक्षय चालू ठेवावी लागते.

अर्जुनः—हो कुमार मी विसरलेंच. आपला नृत्यगायनाचा निपाठ आज अद्यापि व्हायचा आहे. सांगू का ?

उत्तरः—नाहीं, बृहन्नडे, तो मी कधींच विसरणार नाहीं. बाहेर युद्धाचा धूमधडाका चालू असला तरी त्यांतूनही मला मंद्रसप्तकांतला खालचा सूर ऐकूं येईल इतके तीक्ष्ण माझे कान आहेत. रणांगणावर कधीं जावेंच लागलें तरी धनुष्याबरोबर सतार नेण्याला मी कधीं विसरणार नाहीं. धनुष्याची प्रत्यंचा झाडणें आणि सतारीची तार छेडणें दोन्हीं मला एकदमच करावींशीं वाटतील. शत्रूला आव्हान करायचें तें मला एखाद्या उत्तम रागाच्या आरोहावरोहाबरोबर करितां येईल. आणि नृत्याचा ताल किंवा लय ढळूं न देतां मी शत्रूवर धावून जाईन.

अर्जुनः—होय कुमार, तुमच्या अंगांत नृत्यगायन इतकें खचित मुरलें आहे. याची मी साक्ष देईन. ठीक आहे प्रथम गाण्याला सुरवात होऊं दे.

उत्तरः—बृहन्नडे, ख्यालध्रुपदांचा मला मनापासून कंटाळा आहे. इंद्रसभेंत—नाहीं इंद्र एकांतात असतां—रंभा उर्वशी मेनका ज्या प्रेमळ कवनांनीं त्याचे मनरंजन करून त्याला उद्दीपित करितात तसलें एखादें कवन मला शिकीव. गायनामध्यें स्त्रीपुरुषभाव विसरावाच लागतो.

अर्जुनः—ठीक आहे कुमार, अशींहि गाणीं माझ्या संग्रहीं आहेत. पण तीं गाणीं उत्तम वठायला हस्तादि अवयवांना कांहीं विशिष्ट रीतीनें चाळवावें लागतें.

उत्तरः—(हंसून) अग संस्कृत कशाला यांत ? हावभाव करावे लागतात असें स्पष्ट प्राकृतातच कां म्हणेनास ?

अर्जुनः—होय, हावभाव करावे लागतात म्हणून मी तीं गाणीं आपणाला आजवर शिकविलीं नाहीं इतकेंच.

उत्तरः—ऊंः त्यांत काय आहे ? गायनकर्मांत नैपुण्य मिळवूं इच्छिणाऱ्या पुरुषाला हावभावांची लाज धरून काय उपयोग ?

अर्जुनः—आपणाला लाज नाहीं मग चालूं दे. मला बृहन्नडेला हो लाज कसली ? म्हणा कुमार मी सांगतें तसें. ( बृहन्नडा हावभावांसह सांगते व उत्तर तसें म्हणतो. ) ( सेवक प्रवेश करितो. )

सेवकः—दक्षिण दिशेचा गौळवाडा त्रिगर्तानें सर्व हस्तगत केला.

उत्तरः—अरे हें काय विघ्न आणलेंस मध्येंच ? जा उत्तर जिवंत आहे एवढा निरोप शत्रूकडे पाठीव, तेवढा बस्स आहे. बृहन्नडे या चिजेंतला अद-कोमल निषाद मी जरासा चढा लावला यामुळें प्रेमळपणाची हानी ? झाली असेल नाहीं ?

अर्जुनः—पुरुषानें अदकोमल बरोबर लावला तरी स्त्रीच्या अदकोम-लातला प्रेमळपणा त्याला सहसा साधायचा नाहीं.

उत्तरः—हा गायनाचा भक्त थेट स्त्रीच्या कंठाचा कोमळपणा हस्तगत केल्याशिवाय कधींहि सोडणार नाहीं. एरवीं काय पुरुषार्थ ?

२ सेवकः—( प्र. क. ) कौरवसैन्यानें विराटमहाराजांच्या सैन्याला वेढा दिल्याची बातमी आली आहे महाराज ?

उत्तरः—फिरून माझ्या गायनाला विघ्न ? जा, उत्तर जिवंत आहे एवढा निरोप शत्रूला कळीव, तेवढा बस्स आहे. बृहन्नडे, अदकोमल स्वर संपण्यापूर्वींच हात असा वांकडा करायला पाहिजे नाहीं ? अस्त्रमंत्राच्या पाठाबरोबरच शरसंधान हातानें झालें पाहिजे, नाहींतर प्रेमळपणाची हानि व्हायची ! पण नाहीं. जागच्या जागेवर बसून प्रेमळपणाचा उत्कर्ष होणें शक्य नाहीं असेंच मला वाटतें. गायनाला नृत्याची सांगड घालणारे तत्व-वेत्ते खचित वेडे नव्हते. गायन आणि नृत्य यांच्या जोडीनें काळजाचा लक्ष्यवेध हटकून होतो. ज्याला उद्देशून गायन करायचें त्याच्यावर सुरेल तानांचें शरसंधान करितां करिता, नृत्य करीत करीत, अगदीं जवळ जाऊन हल्ला चढविला तर कलिजा हस्तगत करितां येईल. बृहन्नडे, या गाण्याला कोणत्या तालातल्या नृत्याची साथ शोभेल ?

अर्जुनः—केरव्याचा नाच हाच इंद्रलोकांतहि प्रिय असतो.

उत्तरः—( नृत्य करायला लागून ) समज बृहन्नडे, इंद्र हा असा तुझ्या जागीं बसला असला आणि माझ्या जागीं उर्वशी किंवा रंभा मेनका

कुणी तरी असून तिनें असें गात, असें नाचत आणि असे अंगविक्षेप करीत इंद्राच्या अंगाशीं अंग भिडविलें तर इंद्राच्या प्रेमाचा किल्ला कितीहि बळकट असला तरी तो हस्तगत झाल्याशिवाय कसा राहील ?

२ सेवकः—महाराज, कौरवसैन्यानें उत्तरेकडच्या गौळवाड्यावर हल्ला करून तो हस्तगत केला अशी खबर आली आहे.

उत्तरः—( रागावून ) काय करावें ! नृत्यगायनांत फिरून विघ्न ? तुला हा असला निरोप घेऊन यायला किंवा कौरवांना आमच्या गौळवाड्यावर हल्ला करायला नेमकी हीच वेळ कशी सापडली ? खाचित तुमचा हा कांहींतरी दुष्ट कट असला पाहिजे. जा, उत्तर अजून जिवंत आहे असा निरोप शत्रूकडे पाठीव. तेवढा बस्स आहे. बृहन्नडे, माझी कांहीं चूक झाली असली या नृत्यगायनाच्या पाठांत तर मला सांग पाहूं.

अर्जुनः—( स्वगत ) हा नष्टा अधमा क्षत्रियाच्या कुळांत जन्माला आलास त्यापेक्षां एकाद्या वारयोषितेच्या पोटीं मुलगी होऊन जन्मला असतास तर तुझ्या देहाचें अधिक सार्थक झालें असतें ( उघड ) कुमार, नाहीं आतां फारशी चूक राहिली नाहीं. याला म्हणावी नृत्यगायनाची खरी हौस. वाहवा राजपुत्रा धन्य आहेस.

पद २२. चाल—मायेचा मोहपसारा.

आश्रय तूं ललितकलांचा । न ये कोणा सरि तुझी ।
जरि ते करितिल तव हेवा ॥ ध्रु० ॥ सोडुनि लज्जा
स्त्रैण मनानें । गायनाभिनयनाट्यनर्तनें । दाविसि
उत्तानां भावां ॥ आश्रय ॥ १ ॥

उत्तरः—बृहन्नडे, मी आज खचित कृतकृत्य झालों. तुझ्यासारख्या नृत्यगायनांत निपुण असणाऱ्या गुरूकडून अशी शाबासकी मिळाली. तेव्हां मी स्वतःचा धन्यवाद कां न गावा ? (फिरून नाचाला सुरवात करितो.)

[ सुदेष्णा राणी व उत्तरा घाईघाईनें येतात. ]

राणीः—( दुरून ) अरे बाळा उत्तरा, हें काय ?

उत्तराः—दादा मुलांना शिकवितां शिकवितां हा नृत्याचा पाठ स्वतःच केव्हांपासून घेऊं लागलास ?

उत्तर:—आई, उत्तराताई, या आंत या. अशा लाजतां काय ?

उत्तरा:—नाचणाराला लाज नसली तरी बघणाराला हवी.

उत्तर:—ताई तूं कितीहि घालून पाडून बोललीस तरी मला त्याचें कांहींच वाईट वाटणार नाहीं. गायनाविद्या शिकणारानें लाज सोडली तरच त्याला ती विद्या खरी येऊं शकते असा संगीतशास्त्राचा नियमच आहे.

उत्तरा:—पण, दादा, तूं कांहीं एखाद्या गवयाच्या किंवा नटाच्या घरांत जन्माला आलेला नाहींस याची आहे कां शुद्ध ?

पद २३. चाल—कृष्ण कनय्यारे.

तूं क्षत्रियवंशीं जन्मा येसी । हें विसरुनि जासी ।
तूं ते अकीर्ति जाण जडत अति ही ॥ धृ० ॥ रणिं
अरि मिरवित तुज लघु मानुनि । ढंग कसले भलते
करिसी । जना-मनाची धर लज्जा कांहीं ॥ तूं ॥१॥

राणी:—बाळा उत्तरा, उत्तर-दक्षिण दिशेकडून दूत येऊन ते काय काय बातम्या आणताहेत त्या तूं ऐकल्या नाहींस का ? माझा बाळ शहाणा आहे. पण करमणुकीलाहि कांहीं सीमा नको का ? प्रसंग कोणचा आणि तूं करतोस काय ?

[ गोपाळ धांवत धापा टाकीत येतो. ]

गोपाळ:—राणीसाहेब, सर्वस्वी घात की हो झाला ! हाय हाय !

राणी:—अरे असें झालें तरी काय ! नीट सांग.

गोपाळ:—कौरवसैन्यानें उत्तरेकडचा गौळवाडा सफाई लुटला. आह्मां गोपाळांना बेदम मारलें. कित्येक मेले कित्येक मरायला घातले आहेत. आमच्या स्त्रियांची त्यांनीं अब्रू की हो घेतली.

उत्तर:—( ओरडून ) काय ह्मणतोस ? कौरव इतके माजले ?

राणी:—अग बाई, माझा बाळ रागावला बरें का ? क्षत्रियाचेंच मुल किती केलें तरी !

उत्तर:—जा. उत्तर अजून जिवंत आहे असा निरोप शत्रूकडे पाठीव.

उत्तरा:—दादा असें प्रमिष्टासारखें काय करतोस ? या तुझ्ये गिरो-पानें कां कौरव भिणार आहेत ? त्यांनीं गौळवाडा लुटल्यावरहि जर तुझे पाय जागचे हलले नाहींत तर तूं जिवंत असून तरी काय उपयोग ?

राणी:—बाळ, तिकडनें दाक्षिणेच्या गौळवाड्याच्या रक्षणाकरितां धांवून जाणें झालें तेव्हां तुम्ही जाऊं नका मी जातों असा तूं आग्रह धरला होतास ना ?

उत्तर:—पण माझा आग्रह बाबांनीं चालूं दिला कुठें ? मनुष्याची ईर्षा घालविली म्हणजे त्याचे परिणाम असेच व्हायचे.

राणी:—बाळा उत्तरा, ही रागावण्याची आणि हट्ट धरण्याची का वेळ आहे ?

उत्तरा:—दादा, तुला रणांगणावर जायचें नसलें तर तसें सांग मी जातें.

उत्तर:—वः शहाणीच कीं नाहीं तूं ! तूं रणांगणावर जावें आणि मी घरीं बसावें. हा तुझा हट्ट मी चालूं देईन वाटतें ?

[ दूत प्रवेश करितो. ]

दूत:—कौरवांनीं गौळवाडा उध्वस्त केला आणि त्यांच्यातलें कांहीं सैन्य विराट नगरावर चालून येण्याला निघाल्याची बातमी आहे सरकार.

उत्तर:—जा उत्तर जिवंत आहे असा निरोप त्यांना धाड. एकूण माझी भेट घ्यायला कौरव नगरावर चालून येणार काय ? फार चांगलें. कायरे गौळवाडा अगदीं पुरा जमिनदोस्त झाला ना ?

दूत:—होय सरकार. गौळवाड्याची माती झाली राख झाली.

उत्तर:—तर मग आतां तिकडे जाऊन तरी काय उपयोग ? व्यर्थ श्रम. मी त्यांची वाट पहात इथेंच राहिलों तर नगरच्या रक्षणाचें रक्षण होईल. आणि शिवाय कौरवांचा सूड, आई ताई, तुमच्या देखत घेण्याचें सुख मला लाभेल. जा उत्तर जिवंत आहे असा दुर्योधनाला निरोप पाठीव. तेवढा बस्स आहे. पण तेवढ्यानें भागलें नाहीं तर आणखीहि असा निरोप त्याला जोड म्हणावें उत्तर जिवंत असून तुझीच वाट पहात बसला आहे. मरण्याची इच्छा असेल तर नगरावर चालून ये.

उत्तरा:—नगराची काळजी तुला नको दादा. आम्ही स्त्रिया तें पाहून घेऊं. तूं आतांच्या आतां निघून कौरवांवर जा कसा.

राणीः—बाळा उत्तरा तुला जा म्हणवत नाहीं पण रहाहि म्हणवत नाहीं. तूं शत्रूवर चालून जाणें हेंच तुला योग्य आहे.

उत्तरः—( दंड थोपटून ) हा पहा उत्तर निघाला. कौरवांची शंभर वर्षे भरलीं. दुर्योधनाच्या स्त्रीचें मंगळसूत्र तुटलें, भिष्मद्रोणांना माना खालीं घालण्याचा प्रसंग आला. भारत भूमींतल्या राजे लोकांना म्हणावें आतां आपापलीं राज्यें संभाळा. हा उत्तर युद्धाला बाहेर पडल्यावर दिग्विजय केल्याशिवाय परत येणार नाहीं. कोण आहेरे तिकडे, माझा रथ तयार करून आणा पाहूं.

सेवकः—रथ तयार करवतों महाराज. पण सारथी मंडळी सर्व महाराजांबरोबर दक्षिणेच्या गौळवाड्याकडे पूर्वींच निघून गेली.

उत्तरः—फिरून विघ्न. आई, ताई, तूंच सांग बरें मी हा रथी युद्धाला जायला तयार झालों. पण सारथ्यावांचून रथी जाऊन काय उपयोग ? शिवाय सारथी हा रथीवीराचा आधारस्तंभच आहे. तो असा तसा चालत नाहीं. मोठा खंबीर चतुर समयसूचक लागतो. बोला असा कोणी सारथी तुम्ही मला देतां का ?

राणीः—नगरांतलीं आणि राजवाड्यांतील सगळीं मातबर माणसें तिकडच्या बरोबर नेणें झालें. कौरव असा दुहेरी हल्ला करतील हें कळलें नाहीं कोणी मागें ठेवून घ्यायला. या घटकेला एका बल्लवाखेरीज तुझ्या बरोबर सारथी म्हणून युद्धावर पाठवायला दुसरा कोणी दिसत नाहीं. त्याला विचारूं का ?

उत्तरः—नको नको. तो धटिंगणेश्वर रथावर बसला तर सारथ्याचें काम करण्याचें तर दूरच राहिलें; पण माझा रथ मात्र आपल्या नुसत्या वजनानें मोडून टाकील.

राणीः—माठीच पंचाईत झाली. [द्रौपदी येऊन उत्तरेच्या कानांत बोलते.]

उत्तराः—आई चल. दादा चल कसा. मी करतें तुझ्या सारथ्याची तजवीज. तूं आपल्या तयारीला लाग.

राणीः—चल बाळ, आपलें चिलखत घाल, आपलीं शस्त्रास्त्रें घे. देवाला नमस्कार कर. माझा बाळ लढाईवर जायचा.

उत्तरः—चला, हा पहा मी तयार आहें. माझा पाय हलला, आतां कौरवांनों संभाळा. अजून तरी कोणी जारे आणि हा उत्तर अजून जिवंत आहे असा निरोप कौरवांकडे धाडा, तेवढा बस्स आहे. बृहन्नडे, मी जातों. नृत्यगायनाला चार दिवस रजा द्यावी लागते याबद्दल वाईट वाटतें. माझी सतार, माझ्या पायांतले चाळ नीट संभाळ हं.

अर्जुनः—होय कुमार, ते आहेतच इथ नीट. त्यांना लढाईवर थोडेंच जायचें आहे. मला बृहन्नडेला आणि त्यांना गांठ.

( पडदा पडतो. )

---

## अंक २ प्रवेश ३

[ भीम प्रवेश करितो. ]

भीमः—कालपासून युद्धाची गडबड सुरू झाली आहे. आणि स्वैपाक करितांना प्रत्येक गोष्टींत मला युद्धचमत्कार दिसूं लागले आहेत. भाजी चिरून झाली म्हणजे रक्तपाताशिवाय मी कौरवांचे कंठनाळ कसे चिरले अशा भ्रमानें मी भांबावून जातों. आमटी रटरट शिजतांना डाळीचे दाणे वर उसळूं लागले म्हणजे मी मारलेल्या कौरवांची शिरविरहित कवंधेंच रणनृत्य करूं लागलीं आहेत कीं काय असें मला वाटतें. लाडू बनविण्याकरिता मूठ वळली म्हणजे, कौरवांची आठवण होऊन, मी मूठ इतकी घट्ट आवळतों कीं पिठाचा लाडू बनण्याच्या ऐवजीं त्याचें अधिकच पातळ पीठ होऊन तें माझ्या बोटांतून बाहेर येतें. आणि हातांतली पळी ही पळी नसून गदा आहे असे वाटून ती मी चुकून पंक्तींत जेवणारांच्या डोक्यांत घालीन कीं काय या भीतीनें मी कालपासून पंगत वाढायची सोडली आहे. अरे पण हा काय चमत्कार ! उत्तरा ताईसाहेब सैंपाकघराकडे कधीं ढुंकूनसुद्धां पहायच्या नाहींत त्या आज थेट माझ्याच रोखानें इकडे येतातशा दिसतात हें काय ?

उत्तराः—( प्रवेश करून ) बल्लवा !

भीमः—काय आज्ञा ताईसाहेब ? माझ्या हातून कांहीं एखादी चूकबीक नाहीं ना झाली ?

उत्तरा:—नाहीं.

भीम:—आपणाला एखादें दुसरें पक्कान्न बनवून पाहिजे का ? कोणी अतिथिअभ्यागत आला असेल तर सांगा, आतां पाकसिद्धी करितों. एखादी पंगत वाढायची खोळंबली असेल तरी सांगा. माझी ना नाहीं.

उत्तरा:—यांपैकीं एकीहि नाहीं. बल्लवा, तुला मी आज एक निराळेंच काम सांगणार आहे. बाबा कौरवांवर चालून गेले आहेत. त्यांच्या मदतीला जातोस का ?

भीम (खूप मोठ्यानें हंसून):—काय ताईसाहेब मी लढाईवर जाऊं ? युद्धकर्माला चांगला मनुष्य शोधून काढला खरा.

उत्तरा:—त्यांत काय आहे ? राज्यावर संकट आलें म्हणजे कुणाला लढाईवर पाठवावें याचा कांहीं नेम का असतो ?

भीम:—आचारी पाणक्येसुद्धां ?

उत्तरा:—आचारी पाणक्ये बळकट सामर्थ्यवान तरी असतात. आतां इतक्यांतच या राजवाड्यांतले नटनर्तक गायक सर्व युद्धावर रवाना झाले. फार काय सांगूं, बल्लवा, बृहन्नडा सुद्धां युद्धावर आतां इतक्यांतच निघाली. तूं तर काय पुरुष शक्तिमान आणि पराक्रमी आहेस.

भीम:—माझा पराक्रम गेला चुलींत. ताईसाहेब, कशाला सांगतां मला हें जोखमीचें काम ?

उत्तरा:—अरे बल्लवा, जोखमीचें काम अंगावर पडल्यानेंच पात्रता येते ! वीराची कीर्ति ते लढल्यामुळेंच होतेना ? पाळण्यांत वीर कुणालाच म्हणत नाहींत. तूंहि पराक्रम दाखीव, तुझेंहि सैपाकघर सुटून भाग्याचे दिवस तुला येतील. पुरुषानें पराक्रमाची संधि कधींहि गमावूं नये.

पद. २४ चाल—बरुगरुवालियो.

नर करणी करि तरि हरि होइतो । निज भाग्योदय
आपुल्या सहज करीं धरितो ॥ ध्रु० ॥ कालपाश
जोंवरि नच पडती । तोंवरि दैवचमत्कृति घडती ॥
रज भाग्यबलें मदहि दिग्गजाचा हरितो ॥ नर ॥१॥

मग जातोसना ?

**भीम**:—आपली आज्ञाच असेल तर जातों. पण या सैपाकघरच्या वियोग मला कसा सहन होणार ? ताईसाहेब, माझे हे झारे पळ्या लाटणीं एवढीं मात्र मी येईपर्यंत दुसऱ्या कुणाला न देण्याची आज्ञा व्हावी.

**उत्तरा**:—करीन करीन मी ती व्यवस्था. तूं लढाईवर आतां असाच नीघ.

**भीम**:—हा पहा मी तयार आहें. माझ्या डंके नौबती थोड्याच झडायच्या आहेत. आणि शस्त्रास्त्रें तरी मला कशाला ? आपल्या पायाच्या कृपेनें काय सेवा घडेल ती करून फिरून परत येतों.

[ जातात. ]

## अंक २ प्रवेश ४

( अर्जुन व द्रौपदी. )

**अर्जुन**:—द्रौपदी, काय सांगू तुला ? युद्धवार्ता एकामागून एक येत, तेव्हां माझ्या मनांत आनंदाच्या लहरीवर लहरी उठत. देहभान विसरून जाऊन " मी अर्जुन हजर आहे, घाबरूं नका " " मी अर्जुन हजर आहें, घाबरूं नका " असें मीं उन्माद वायूनें ओरडत उठेन कीं काय अशी माझी मलाच भीति वाटूं लागली होती. अज्ञातवासाची शेवटची घटका भरत आली, पण ती भरून बुडेपर्यंत आम्हें आम्हांला जपलें पाहिजे. बरें पण काय ग, ह बायकी पोर, हें अंत:पुरातलें खेळणें, हें क्षत्रियकुलाचें दूषण लढाईवर जाऊन काय करणार ? मला मात्र कौरवांचा नि:पात करून स्वतः प्रगट होण्याची संधी सोन्यासारखी आली आहे.

**द्रौपदी**:—हें जाणूनच मी उत्तरेशीं खलबत करून इकडे आलें आहें. महाराज, आपणाला स्वत:ला रथी होण्याचें जरी एकादा दिवस दूर असलें तरी सारथी या घटकेला होतां येईल. अज्ञातवासाची शेवटची घटका भरून बुडाली कीं सारथ्याचा रथी होण्याला कितीसा अवकाश लागणार ?

पद २५. चाल—कान्हा छांड भय्या.

आला समय आतां । वांछित मनिं जो होता । देतां
दैव हाता ॥ आला ॥ ध्रु० ॥ व्हा क्षणभर नृप सारथि ।
परिवर्तन घडुनि पथीं ॥ रणमुखिं मग व्हाल रथी ।
नरवरदयिता ॥ आला ॥ ॥

अर्जुनः—शाबास. पुरुषाच्या मनांत येणारा संकल्प तोंडांतून बाहेर पडण्याच्याहि आधीं त्याच्या सिद्धतेची तजवीज करून ठेवणारी पत्नीच खरी सहचारीणी. नाहीं तर पतीच्या उमेदीवर विरजण घालणाऱ्या सुगृहिणी, पतीच्या गळ्यांत लोढण्याप्रमाणें वागणाऱ्या स्त्रिया, घरोघर आहेतच वाटतील तितक्या. असो; पण सैरंध्री, मी सारथी म्हणून जाण्याची कल्पना उत्तरेला पसंत आहे का ?

द्रौपदीः—तिला मी एक अर्धवट कानमंत्र सांगितला आहे त्याच्या योगानें आपलें खरें स्वरूप तिला न कळतां आपण सारथ्य करण्याची कल्पना मात्र तिला पुरी पटली.

अर्जुनः—बरें पण उत्तर मला सारथी म्हणून पत्करील का ?

द्रौपदीः—पत्करील इतकेंच नव्हे तर आनंदानें उड्या मारू लागेल. अंधारात जायला भिणाऱ्या मुलाला जर प्रत्यक्ष आईचाच हात मिळाला तर त्याला मग आंणीक तें काय पाहिजे ? हा क्षत्रियकुलाधम आपणाजवळ रणक्षेत्रावर शत्रूच्या देखत नृत्यगायनाचा पाठ न मागो म्हणजे मिळविली.

अर्जुनः—नृत्यगायन ! विश्वप्रळयाच्या वेळीं श्रीशंकर जें भयंकर नृत्य गायन आरंभितो त्या नृत्यगायनाचा साक्षात्कार मात्र या अभागी पोराला सुदैवानें पाहायला मिळेल. बरें पण देवी द्रौपदी, उत्तरेकरितां तूं जसें एक काम मला सांगितलेंस तसेंच तिच्याकरितां दुसरें एक काम मीहि तुला सांगायचें कबूल केलें आहे.

द्रौपदीः—अगबाई, तें काय ?

अर्जुनः—सैरंध्री, तुझे पती जे पांच गंधर्व त्यांना या युद्धांत विराटराजाच्या मदतीला तूं पाचारण करशील का ? ( हंसून व सैरंध्रीचा हात धरून ) सांग ना तूं ही कृपा करशील का ?

द्रौपदी:—जे प्रश्नाचे धनी तेच उत्तराचेहि धनी आहेत. ( हंसून ) पण त्याचा तरी बाई काय नियम सांगावा ? माझे गंधर्व पती मोठे कोपिष्ठ आहेत नाहीं का ? मी त्यांना पाचारण केलें आणि ते न आले आणि उलट माझ्यावरच रागावले तर बाई मी त्यांचा राग कसा घालवूं ?

अर्जुन:—( तिला आलिंगून ) हा असा अज्ञातवासांत तुझ्या आलिंगन सुखाचा लाभ द्रौपदी आज घडला. माझा गृहस्थाश्रम संपण्यापूर्वीच मला वानप्रस्थाश्रमाचा अनुभव मिळाला म्हणायचा !

द्रौपदी:—मग आतां संन्यासच तेवढा घ्यायचा राहिला आहे. दैव मनुष्याला सर्व कांहीं सोंग आणायला लावतें. (हंसून) पण संन्यास घ्यायला मात्र माझी परवानगी हवी हो आपणाला.

अर्जुन:—संन्यासाचें नुसतें सोंग आणायला तुझी परवानगी नको. तें असो. पण आतां बृहन्नडचें सोंग उतरण्याची माझी वेळ झाली ! हें हिडिसवाणें सोंग उतरण्याला तुझी मदत पाहिजे. देवी द्रौपदी, माझा सारथ्याचा पोषाख तूं आपल्या हातानें माझ्यावर घाल. पोलादी चिलखताच्या आंत तुझ्या प्रेमस्पर्शाचें चिलखत मी घातलें म्हणजे मला रणांगणावर दुप्पट बळ येईल. चल तर या संसाररंगभूमीतल्या सोंग बदलण्याच्या जागीं जाऊं.

पद २६. चाल—मुख मोर मोर.

विकृत वेष हा सखि सुफल आज । भोगावि विषाद
परि साधि काज ॥ ध्रु० ॥ रंगभूमिवरि नाट्यविधाना ।
चतुर कुशीलव दावी नाना ॥ धरी तयाची मनिं
नच लाज ॥ विकृत ॥ १ ॥ कार्यार्थी हा तेवि बृह-
न्नट । प्रथम सारथी यथाकालिं भट ॥ विजयोन्मुख
मी हो सुखभाज ॥ विकृत ॥ २ ॥

( सैरंध्रीला आलिंगन देऊन तिजबरोबर जातो. )

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला

[ अमात्य प्रवेश करितो. ]

अमात्यः—पांडवांचा शोध करण्याच्या लालचीनें हा स्वतःला शहाणा म्हणविणारा शकुनी माझ्या हातीं आयता सांपडला आहे. पांडवांना शोधून काढून स्वाधीन करीन, असें कांहीं याला माझें वचन गुंतलेलें नाहीं. शोधाचा प्रयत्न करण्याला मदत द्यायची इतकेंच तें वचन आहे. शकुनीनें काय शोध करायचा तो करावा, मी काय मदत द्यायची ती देईन. आमच्या महाराजांचा पराजय झाला तर शकुनीच्या सहायानें महाराज संकटमुक्त होतील. उलट महाराज यशस्वी झाले तर मग पाहूं शकुनीचा समाचार. सगळ्या जगाला हा आढ्यतेनें कपटनीति शिकवितो. या गुरूची विद्या मला यालाच जर फळवितां आली तर काय बहार होईल!

[ उत्तरा व द्रौपदी सशस्त्र प्रवेश करितात ]

ताईसाहेब, हें काय? आपणाला अशा वेषांत पाहून मला महिषासुरमर्दिनीची आठवण होते. पण सैरंध्रीनें ही क्षात्रदीक्षा आपणापासून कधीं घेतली?

उत्तराः—नाहीं अमात्य, ही क्षात्रदीक्षा सैरंध्री माझ्यापासून शिकली नाहीं, तर उलट तिनेंच मला ती शिकविली. बाबा आणि उत्तरदादा या दोघांनाहि जर अपयश आलें तर विराटनगरावर कौरवांची स्वारी निश्चित होणार. आणि कौरवांची स्वारी झाली म्हणजे आम्हां कुलवधूंच्या अब्रूवर मूर्तिमंत संकटच अवतरलें असें म्हणावें लागेल. ज्या कौरवांनीं आपल्या प्रत्यक्ष भावजयीची अब्रू भरसभेंत घेतली, ते शत्रूच्या स्त्रियांना कसे वागवतील हें सांगायलाच नको. म्हणून आम्हां स्वतःला क्षात्रदीक्षा घेण्याशिवाय मार्ग नव्हता. पण खरें बोलावयाचें म्हणजे हा मार्ग सैरंध्रीनेंच मला प्रथम शिकविला.

अमात्यः—आपण स्वतः तर काय क्षत्रियकन्याच आहां, तेव्हां आपण तरवार कशी काय चालवाल हें बोलायलाच नको. सैरंध्री ही दासी खरी पण—

द्रौपदीः—अमात्य, खबरदार मला यापुढें दासी म्हणाल तर. मी गंधर्ववीरपत्नी आहे. त्यांच्या आज्ञेवरून मी कांहीं काळ दासीचा वेष घेतला होता; पण आतां त्याचें कारण संपलें. वीरपत्नी या नात्यानेंच यापुढें तुम्ही मला मान दिला पाहिजे. माझी यापुढें अवज्ञा कराल तर पश्चात्ताप पावाल.

अमात्यः—एकूण स्त्रिया हातांत तरवार घेतल्याबरोबर इतक्या तेजस्वी होतात अं?

द्रौपदीः—नाहीं. अमात्य, स्त्रिया तेजस्वी असतात ह्मणूनच त्या हातांत तरवार घेतात. याची प्रचिती पहायची आहे काय?

अमात्यः—असो हातांत तरवार न ठरण्याइतका मी ह्मातारा झाल्यावर नगरच्या स्त्रियांना आत्म रक्षणार्थ हातांत हत्यार धरावें लागलें तर त्याला मी काय करणार? पण मी ह्मातान्यानें नगर रक्षणाची शहाणपणाची एक युक्ती योजली आहे ती ही ऐकून ठेवा.

उत्तराः—ती काय?

अमात्यः—कौरवांचा मामा शकुनी याच्यापासून विराटनगररक्षणाचें मी वचन घेतलें आहे.

द्रौपदीः—पण स्वतः कौरव जर नगरावर स्वारी करणार तर कौरवांच्या या मामानें नगर रक्षण करण्याचें वचन तुह्मांला कां द्यावें कांहीं कळत नाहीं!

अमात्यः—प्रश्न बरोबर आहे. पण जगांत देवघेव हीच सर्वप्रभावी आहे हें आपण जाणतांच.

द्रौपदीः—अमात्यराज, याहून अधिक खुलासा करतील तर बरें होईल.

अमात्यः—खुलासा अगदीं सोपा आहे. शकुनीला या नगरांत पांडवांचा शोध लावावयाचा आहे त्या शोधाला मी मदत करण्याचें कबूल केलें



द्रौपदीः—स्त्रिया तेजस्वी असतात म्हणूनच त्या हातांत तरवार घेतात. [ पृ. ६६.

आहे. हें झालें यांचें दे वाण. आणि विराट नगराचें संरक्षण करण्याला शकुनीनें मला मदत करायची हें याचें घे वाण.

द्रौपदी:—अमात्य, शकुनी हें आपलें वचन पाळीलच याचा काय नियम आहे ?

अमात्य—न पाळून सांगतो कुणाला ? पांडवांना शोधायला तो वेषांतर करून आतां इतक्यांतच इकडे येणार आहे. करीना पांडवांचा शोध. आपण त्यांना या नगरांत थोडेच ठेवले आहेत दडवून. तात्पर्य, कांहीं न देतां सर्व साधायचें असा माझा हा डाव आहे. शकुनी आला म्हणजे तो आपल्या ताब्यांतच आहे जातो कुठें ?

उत्तरा:—अमात्य, आम्ही आमच्या नगरांत पांडव दडवून ठेवण्याचा गुन्हा केलेला नाहीं असा तुमच्या म्हणण्याचा अर्थ. तेंच मी प्रतिशब्दानीं म्हणेन कीं पांडवांना आमच्या नगरांत ठवून घ्यायचा मान आमच्या नशिबांत नव्हता.

अमात्य:—कसेंहि म्हणा. पण पांडव आमच्या नगरांत आज नाहींत एवढें तरी खरें आहे ना ?

द्रौपदी::—( स्वगत ) माझ पांचही प्राण या नगरांतून नुकतेच बाहेर पडले आहेत आतां मला शकुनीची भीति नाहीं.

उत्तरा:—पण अमात्य, समजा कर्मधर्मसंयोगानें पांडव आमच्या नगरांत असते तर तुम्ही त्यांना धरून शकुनी मामाच्या स्वाधीन केले असते ?

अमात्य:—हो केले असते. एरवीं नगरचं रक्षण कसं होणार ?

उत्तरा:—अमात्य, कृतीनें हा तुम्हांला विश्वासघात करतां आला नाहीं पण मनानें तुम्ही तो केलातच.

अमात्य:—स्वामिभक्तांना दुसऱ्याचा विश्वासघात माफ असतो.

उत्तर:—समजा पांडवापैकींच एखादा इथ हे तुमचे शब्द ऐकायला असता तर त्यानें काय बरें केलें असतें ?

द्रौपदी:—मी देतें त्याचें उत्तर. स्त्री सैनिकानों ह्या अमात्यांना कैद करा पाहूं.

[ मुली सशस्त्र पुढें होऊन अमात्यास कैद करतात. ]

उत्तराः—अमात्य, तुम्ही आमचे पिढीजाद विश्वासू नोकर आहांत हें खरें. पण पांडवाविषयीं झाली तरी ही विश्वासघात बुद्धी तुह्मांला शोभत नाहीं.

द्रौपदीः—ताईसाहेब, पांडवांचे शत्रुत्व यांनीं मनानें केलें तरीही मी त्यांकडे एकवेळ दुर्लक्ष केलें असतें. पण शकुनीला वेषांतरानें नगरांत घेऊन यानीं शत्रूला फार मोठी मदत केली. युद्ध चालू असतां हा गुन्हा आहे. शकुनीसारख्याच्या शब्दावर यानीं विश्वास ठेवला हीच मुळीं केवढी तरी मोठी चूक झाली. पण त्याबद्दल मी कांहींच ह्मणत नाहीं. त्यावरून अमात्यांचें फार तर बुद्धिमांद्य दिसून आलें असतें. अमात्य, स्त्रियांच्या हातांतल्या तरवारीमुळें त्यांना तेज चढतें कीं आंगच्या तेजामुळें त्या हातीं तरवार घेतात हें आतां आपणाला कळून आलेंच असेल. असो; शकुनीला नगरच्या वेशीवरच मला कैद करविला पाहिजे. अमात्य, ताईसाहेब माझ्या या वर्तनाचा खुलासा आपोआप एकदोन दिवसांतच होईल. तूर्त माझें कृत्य लष्करी कायद्याच्या अमलाच्या स्वरूपाचें आहे असें नुसतें समजा म्हणजे झालें.

( पडदा पडतो. )

---

## अंक ३ प्रवेश २

[ शकुनी गोसाव्याच्या वेषानें प्रवेश करितो. ]

शकुनी:—सुयोधन आणि कर्णराज हे विराटाचे गौळवाडे लुटोत; पण त्यांत त्यांना पांडव न सांपडले तर काय उपयोग ? दूध पिऊन मस्त झालेले गवळी किंवा खोंड हे का सुयोधनाला खरोखर हस्तगत करायचे आहेत ? हंडा हंडा दूध देणाऱ्या गाईंचीं खिल्लारें स्वत: सुयोधनाच्या गौळ-वाड्यांत नसलीं तर त्या विराटाचीं लुटून न्यायचीं ! गौळवाडे लुटायचें नुसतें निमित्त ! पण या क्षुद्र निमित्तानें केवढें मोठें काम होणार आहे ! सुयोधनाच्या मनांत गौळवाड्यावर स्वारी करण्यांत काय डाव आहे हें विराटाला न कळून, एखाद्या परचक्रनिवारणाची तयारी करून तो नगरचें सर्व सैन्य घेऊन बाहेर गेला असें समजतें ! भोळा बिचारा विराट. कसेंहि असो. पण या नुसत्या धामधुमीनें आमचें कार्य साधण्याशीं कारण ! बिळाच्या तोंडीं धूर झाल्यानें बिळांतून उंदीर जसे बाहेर पडतात तसें या कपटी धामधुमींत पांडव प्रगट झाले म्हणजे झालें ! मग विराटाच्या गाई त्याच्या त्याला परत करून वरतीं हस्तिनापुरचीं खिल्लारेंहि हवीं तरी मी त्याला बक्षीस देववीन ! बरें, पांडव युद्धात प्रगट न झाले आणि विराटनगरांतच लपून राहिलें तरीहि आतां ते वांचत नाहींत. इकडे मी त्यांना शोधून काढीन. कधीं सोडणार नाहीं ! मी या विराट नगरांत येऊन पोंचलोंच. तेव्हां आतां अमात्याची गुप्त गांठ घेऊन आपल्या कामाला सुरुवात केली पाहिजे. अरे पण हें काय ? राजवाड्याच्या बाजूनं या इतक्या मुलीमुली जमून कुणीकडे चालल्या आहेत ? [ न्याहाळून पाहून ] हा काय चमत्कार ? या मुलींच्या अंगावर वीरवेष काय म्हणून ? आणि हातांत तरवारी सुद्धां ! हें वीरविडंबन तर खरेंच; पण यांत कांहीं मर्म आहे कीं हा नुसता करमणुकीचा प्रकार आहे हें लक्ष लावून पाहिल्या शिवाय कळणार नाहीं. तेव्हां क्षणभर बाजूला उभें राहून हा प्रकार काय आहे हें पाहिलेंच पाहिजे. [ बाजूला उभा राहतो. ]

[ सुशीला व कुसुम इतर हत्यारबंद मुलींसह येतात. ]

कुसुमः—कायग सुशीले, आपणाला या वेशीकडेच पहारा करायचा आहेना ?

सुशिलाः—होय याच. बाकीच्या वेशींची नाकेबंदी सैरंध्रीनें चांगलीच करविली आहे. नगरच्या या भागांत धोका जरा जास्त म्हणून आपणाला सावधगिरीनें वागलें पाहिजे.

शकुनीः—अरे या पोरींनी नुसता वीरवेषच घेतला नसून त्या शिपाईगिरीचीं भाषणेंही बोलतात ! मी विराटनगरांत न येतां एखाद्या स्त्रीराज्यांत तर चुकून आलों नाहीं ना ! पहावें आणखी पुढें काय प्रकार होतो तो.

कुसुमः—नगरच्या या भागांत आमच्याप्रमाणें किती बायकानीं हातांत हत्यारें घेतलीं आहेत ?

सुशिलाः—सैरंध्रीनें स्वतः हिंडून फिरून एक हजार बायका हत्यारबंद केल्या आहेत. एखादी स्त्री सैनिकांची तुकडी आतां इतक्यांत या बाजूला येईल. त्यांना या वेशीचे संरक्षण कसें करावयाचें हें समजावून द्यायला सैरंध्रीसुद्धां आतां इतक्यांतच इकडे येईल.

शकुनीः—( हंसून ) वाहवा. सगळाच सरंजाम बायकांचा दिसतो. स्त्रियांच्या हातांत हत्यारें पाहून कितीही गंभीर विचाराचा मुत्सद्दी असला तरी त्यालाहि कौतुक वाटून हंसायला आल्याशिवाय राहायचें नाहीं. माझा इकडे येण्याचा हेतु क्षणभर बाजूला राहिला तरी चालेल पण ही कधीं पाहायला न सांपडणारी गंमत नीट पाहिलीच पाहिजे. [ पुढें होऊन ] ( कुसुमला ) हे सुकुमार बालिके, या नगराचें नांव काय ? सांगशिल का ?

कुसुमः—तुह्मांला उत्तर द्यायला मला अधिकार नाहीं.

शकुनीः—तें कां ?

कुसुमः—सुशीलाबाई माझ्या वरिष्ठ अधिकारी आहेत त्या हजर असतां तुह्मांला सगळीं प्रश्नोत्तरें त्यांच्याशींच करायला पाहिजेत.

शकुनीः—अरेच्या इथें तर आतां लष्करी कायदाही सुरू झालेला दिसतो. बरें आहे. आपणाला काय छोटा लष्करी अधिकारी सांगेना तर

आपण बड्या अधिकाऱ्यालाच विचारूं. ( सुशीलेला ) बाळे,· या नगरचें नांव काय ?

सुशीलाः—कां बरें ? ज्यांना आमच्या या नगरचें नांवहि माहीत नाहीं असे तुम्ही कोण हें प्रथम मला सांगा. परक्या मनुष्याला परवानगीशिवाय या नगरांत शिरूं देऊं नये अशी आम्हांला आज्ञा आहे.

शकुनी:—मला गोसाव्याला कुठेंच जायला परवानगी लागत नाहीं.

सुशीलाः—हा तुमचा भोळा भाव इथें सिद्धीला जायचा नाहीं. गोसावी हेच तर सगळ्या मुलखांत अधिक कपटी आणि लबाड असतात. आणि गोसावी नसून गोसाव्यांचीं सोंगें घेणाऱ्या दुष्ट भोंदू लोकांना तर फारच जपावें लागतें.

शकुनीः—अरेच्या इनें मला ओळखलें कीं काय ? आपण हें बोलणें जरासें निराळ्या थाटावरच न्यावें हें बरें. बरें गोसावी कसे कां असेतात; पण कायग मुलीनों हे जे वीरवेष तुम्ही घेतले आहेत ते ग काय म्हणून ?

कुसुमः—कायरे गोसावड्या हें आम्हांला विचारणारा तूं कोण ?

शकुनी:—( हंसून ) वरिष्ट लष्करी सरदार जाग्यावर हजर असतां कनिष्ठाला बोलायचा अधिकार नाहीं हें ही इतक्यांतच विसरली.

सुशीलाः—कुसुम, तूं गप्प रहा मीच देतें त्याला उत्तर. कायरे ए गोसावड्या, तुला नसत्या गोष्टींची पंचाईत कशाला ? पण होय मीच वरिष्ट लष्करी अधिकारी आहे विचार काय विचारायचें तें मलाच विचार. मी देतें उत्तर.

शकुनी:—नाहीं म्हटलें, तुम्हा सुकुमार मुलींनी हीं हातांत हत्यारें कां घेतलीं आहेत ?

सुशीलाः—तुझ्यासारखे गोसावी ही दाढी कशाला लावतात ?

शकुनी:—तुमच्यासारख्या मुलींना भिववायला !

सुशीलाः—मग आम्हीसुद्धां या तरवारी तुमच्यासारख्या गोसाव्यांना भिववायला हातांत घेतों समजलास ?

शकुनीः—पण तुह्मासारख्या कोंवळ्या पोरींच्या हातांतल्या तरवारींना कुणी भ्यायला पाहिजेना !

सुशीलाः—तुझ्या दाढीपेक्षां तरी या तरवारींची भिती पाहणाराला खाचित अधिक वाटेल.

शकुनीः—मला तुमच्या तरवारीची भिती वाटली असती तर मी तुमच्याशीं असा बोलत उभाच राहिलों नसतों. पळून गेलों असतों.

सुशीलाः—तूं पळून गेला असतास पण तुला पळून जाऊं कोण देणार होतें ?

शकुनीः—अरे वाः तर मग काय तुम्ही मला काय कैद केलें असतें ?

सुशीलाः—यांत काय संशय ? भिऊन पळून जाणाऱ्या तुला तर कैद केलें असतेंच; पण भिऊन पळून न जातां आपल्या धारिष्टाचा दिमाख दाखविणाऱ्या तुला गोसावड्याला या पहा आम्हीं आतांच इथल्या इथें कैद करतों.

शकुनीः—शाबास मुलीनों, तुम्हीं आपल्या वीरवेषाची बतावणी तर खूप चांगली केली.

सुशीलाः—ही बतावणी आहे कीं, हा खरा प्रकार आहे हें आम्हीं तुला आतांच दाखवितों. ( शीळ घालते ) [ एका बाजूनें सशस्त्र मुलींची एक तुकडी येते. दुसऱ्या बाजूनें अमात्याला बंदिवान करून घेऊन चाललेली सशस्त्र मुलींची दुसरी तुकडी येते. ] वीरबालिकांनों, पकडा या मुर्दाड गोसावड्याला. ( मुली त्याच्या भोंवतीं गराडा घालून त्याच्या हाताला काडण्या बांधूं लागतात. )

शकुनीः—होऊं दे या मुलींची वीरविडंबनाची भातुकली पुरी होऊं दे. अशी गंमत मला एरवीं कधीं तरी पहायला मिळणार—अरे पण माझ्यासारखा बंदिवान केलेला दुसरा ह्मातारा इकडे कोण येतो आहे ? हा तर अमात्य. पण याला आपण होऊन ओळख देऊं नये हेंच बरें.

अमात्यः—या शकुनीमामा या. तुह्मांला नमस्कार करतों. पण नमस्कार करायला हात मोकळे नाहींत इतकेंच वाईट वाटतें.

**सुशीला**:—( आवेशानें ) कोण शकुनीमामा ? कौरव कुळातला आगलाव्या ? वीरबालिकांनों बांधा याच्या हाताला काढण्या. खचून जोरानें आवळा. भला आयता सांपडला. सैरंध्रीनें इषारा दिल्यावरून आम्ही याच्या पाळतीवर राहण्याकरितांच या वेशकिडे आलों होतों. आमचा कार्यभाग लवकर पार पडला.

**शकुनी**:—( स्वगत ) मला वाटतें अमात्यानें माझ्याशीं केलेला कट सिद्धीला नेण्याकरितांच हें वीरविडंबनाचें कपट नाटक या पोरींकडून उभारलें असलें पाहिजे. आणि तें नाटक कुणाला संशय न येतां पार पडावें ह्मणून स्वतःच बंदिवानाच्या वेषानें तो सामील झाला असावा ! ( उघड ) अमात्य, तुह्मांला शकुनीमामांचीं स्वप्नं अलीकडे पडत असावीं. एरवीं या यात्रेकरू गोसाव्याला तुम्ही शकुनी म्हणून खचित हाक मारली नसती. ( सैरंध्री एकदम प्रवेश करिते. )

**द्रौपदी**:—हा तर शकुनी ! लवकरच सांपडला. पण आपण याच्या दृष्टीला पडतां कामा नये. नाहीं तर तो मला द्रौपदी म्हणून ओळखायचा. ( चटदिशीं पडद्यांत जाते. पडद्यांतून ) सुशिले, या तुमच्या दोघांहि बंदिवानांना घेऊन राजवाड्याकडे ताबडतोब जा. या ठिकाणीं आतां क्षणभरहि उभ्या राहूं नका. ( जाते. )

[ दुःशीला धांवत धांवत प्रवेश करिते. ]

**दुःशीला**:—सुशिले, अग सुशिले, विराट महाराजांनीं निम्या कौरव सेनेचा पराभव करून दक्षिणेच्या गौळवाड्यांतल्या सगळ्या गाई सोडवून परत आणल्या. सैरंध्रीच्या गंधर्व पतींनीं मोठाच पराक्रम केला ह्मणतात. राणीसाहेबांनीं सर्व नगरांत जयजयकार करण्याला नगरच्या स्त्रियांना आज्ञा केली आहे. चला तुम्ही सर्वजणी या तुमच्या बंदिवानांना घेऊन लवकर राजवाड्याकडे चला !

**शकुनी**:—( स्वगत ) हें वीरविडंबन मुलींची वीरवेषांतली भातुकली खास नव्हे. बरें कौरवांचा पराभव करणारे हे वीर गंधर्व कोण ? आणि हे वीर जिचे नवरे ती सैरंध्री कोण ? तें कांहीं असो; पण या मुली

खऱ्याखुऱ्याच वीरांगना असून मीहि त्यांच्या ताब्यांत सांपडलेला खराखुरा बंदिवान आहें यांत शंका नाहीं. अमात्याचा हा कट कीं हें त्याचें कपट ?

सुशीलाः—दुःशीले, जा पुढें आणि राणीसाहेबांना सांग कीं सैरंध्रीच्या आज्ञेवरून आम्ही अमात्याप्रमाणें शकुनीमामांनाहि कैदकरून घेऊन येतों. चला वीरबालिकांनों चला. ह्मणा सैरंध्रीचा आणि तिच्या गंधर्व पतींचा जयजयकार असो ! ( कुसुम व इतर मुली 'सैरंध्रीचा जयजयकार असो, गंधर्व पतींचा जयजकार असो' असें म्हणत अमात्य व शकुनी यांना पुढें घालून जातात. )

---

## अंक ३ प्रवेश ३

[ रणांगण. अर्जुन व उत्तर प्रवेश करितात. ]

अर्जुनः—कुमार, हा पहा मी तुमचा रथ या रणांगणाजवळ आणून उभा केला आहे. आतां तुमच्या युद्धचमत्काराला सुरवात होऊं दे.

उत्तरः—( आसपास पाहून हंसून ) बृहन्नडे, या शून्य रणांगणांत युद्धचमत्कार तो काय दाखवायचा ? मी एक वेळ बहिऱ्यापुढें गायन करीन व आंधळ्यापुढें नृत्य करीन. पण शत्रुविरहित रणांगणांत कोणताहि युद्धचमत्कार माझ्या हातून दाखवितां येणार नाहीं. मला शत्रू दिसूं दे तरी आणि मग पहा माझें रणशौर्य.

अर्जुनः—कुमार, रणांगणांत शिरतांना बढाई मारण्यापेक्षां रणांगणातून यश मिळवून परत येतांना बढाई मारणें अधिक बरें. कदाचित् कौरव अजून दूर असतील पण ते लवकरच तुमच्यासमोर येतील.

उत्तरः—बृहन्नडे, कौरवांचें नांवहि काढूं नको. मी उत्तर अजून जिवंत आहें असा जो निरोप मी अंतःपुरातल्या नृत्यशाळेंतून वारंवार उच्चारला तो कौरवांच्या कानावर गेला खास. बृहन्नडे, कौरवांनीं पळून जाऊन माझी निराशा केलीग. मी आतां रणशौर्य कुणापुढें दाखवूं ?

पद २७. चाल—ललना खरी.

यश चोरिलें मम कौरवांनी रणशौर्य वार्ता परिसोनि
कानीं ॥ धृ० ॥ मम क्षात्र तेजा कवणास मीं । आजि
दावुं सांगे मन हो श्रमी ॥ रिपुशून्य वीरा जग केवि
वानी ॥ यश १ ॥

अर्जुनः—कुमार, अशी घाई करूं नका. तुमचा रणशौर्याविषयींचा उत्साह अगदींच फुकट जाईल असें मला तरी वाटत नाहीं. ( पडद्यांत शंख व भेरी वाजूं लागतात ) ऐका. हा आवाज कशाचा हें तुम्ही ओळखलें ? ऐका नीट लक्ष लावून ऐका !

उत्तरः—( किंचित घाबरून ) आहेत वाद्यें सुरेल आहेत. तालही कांहीं चुकला नाहीं. हा ताल बहुधा त्रिवट किंवा एकताला असावा. ( हातानें ताल धरून तालावर पावलें टाकूं लागतो. )

अर्जुनः—कुमार, तुम्ही आतां अंतःपुरातल्या नृत्यशाळेंत नाहीं, रणांगणावर उभे आहां.

उत्तरः—जाऊं देग बृहन्नडे. मला दोन्ही सारखींच आहेत. रसिक कुठेंहि गेला तरी तो रसिकच. ( पडद्यांत फिरून शंख व रणभेरी यांचा आवाज होतो. )

अर्जुनः—पहा दूर क्षितिजावर शत्रुसैन्याच्या ध्वजा दिसूं लागल्या.

उत्तरः—(स्वगत ) अरे होय कीं. कौरवांचीच ही सेना असेल काय ? तसें असेल तर मग कठीण प्रसंग. ( उघड ) बृहन्नडे, क्षितिजावरचीं निशाणें मी पाहिलीं. पण तीं आमच्या दिशेच्या उलट वाऱ्यावर नाचत आहेत. मला वाटतें कौरव मला भिऊन पळून जात असले पाहिजेत. मी रणांगणावर आल्याची बातमी त्यांना लागली असेल काय ?

अर्जुनः—कुमार, तुमची ही भीति नव्हे—आशा—व्यर्थ आहे. निशाणाचें तोंड मागें धावतें तेव्हां वीर पुढें धांवत असतो. ते पहा निशाणानंतर कौरवसैन्याच्या रथाचे कळसहि हळू हळू दृग्गोचर होऊं लागले. तो पहा. शत्रुसैन्यांतील वीरांचा एखाद दुसरा मुगूटहि सूर्यप्रकाशानें चमकूं लागला. कुमार आतां बोलण्याची वेळ नसून कृतीची वेळ आली आहे.

उत्तरः——थांब बृहन्नडे, मी थोडासा उंच जागेवर जाऊन न्याहाळून पाहतों, म्हणजे खरा प्रकार काय असेल तो कळून येईल. ( इकडे तिकडे हिंडून भीत भीत अवलोकन करितो. )

अर्जुनः——ह्या बायकी पोराचा खेळ करीत किंवा पहात बसायला आतां वेळ नाहीं. सुदैवानें गुरुमहाराजांनीं कळविलेली अज्ञातवाससमाप्तीची वेळहि भरत आली. तेव्हां आतां आपल्या कार्याला लागलेंच पाहिजे. हाच तो शमी वृक्ष. यावर चढून त्यावर गुप्तपणानें ठेवलेलीं आमचीं कवच कुंडलें आणि धनुष्यबाण काढून घ्यावे; कारण त्यांचें काम आतां सुरू होणार. ( झाडावर चढून चिलखत व धनुष्यबाण खालीं काढतो. वृक्षास प्रणाम करून )

पद २८. चाल——वेणु मधुर.

केवि वर्णुं तव गुण तरुराया मातेपरि ममता केली ॥
॥ ध्रु० ॥ लपवुनि अंकीं पदर धरुनि वरि आयुधें
आमुचीं रक्षियलीं ॥ उदरि साठविसि गुप्तवन्हि परि
आटलि नच तव हृदयि दया ॥ केवि १ ॥

हे पवित्र परोपकारी तेजस्वी शमी वृक्षा, मी—आम्ही पंच पांडव—तुझे अत्यंत ऋणी आहों. ज्या पांडवांच्या शस्त्रास्त्रांनीं जगाचे डोळे आपल्या तेजानें दिपवावे त्यांना आपलें तोंड जगापासून लपविण्याचा प्रसंग आला; तेव्हां तूं त्यांना आपल्या उदरांत थारा दिलास. आणि फिरून प्रगट होण्याचा सुप्रसंग आल्यावर तीं पांडवांना अखंड अभंग अशीं परत दिलींस. मनुष्यमात्रापेक्षां तूं आमच्या विश्वासाला अधिक पात्र झालास. या तुझ्या अलौकिक इमानाबद्दल तुझे कितीहि धन्यवाद गाईले तरी ते थोडेच होतील. तुला अग्निगर्भ ह्मणतात तें यथार्थ आहे. तेज प्रगट करण्यापेक्षां तेज लपविणें ही गोष्ट अधिक कठीण आहे. आणि ती तुझ्यासारख्या सहृदय सहायकर्त्यांशिवाय कोणाला कशी पार पाडतां येणार ? आज बारा महिने तुझ्या उदरांतील गुप्त अग्नीच्या सांनिध्यानें सतेज राहिलेलीं हीं शस्त्रास्त्रें घेऊन आम्ही पांडव

आज्ञातवासांतून प्रगट होणार व पराक्रम करणार याचें श्रेय सर्वस्वी तुला आहे. असो; कुमार उत्तर परत येण्यापूर्वी हें चिलखत अंगावर घालून शस्त्रास्त्रां निशीं सज्ज व्हावें हेंच बरें. युद्धांचें तोंड लवकरच लागणार. या नामर्द पोराशीं विनोदाचा रूपंडाव करीत बसायला मला आतां वेळ कुठें आहे.

[ बाजूला जातो. ]

उत्तरः—[ प्रवेश करून ] अरे ही बृहन्नडा एकाएकीं अदृश्य कां झाली ? सारथी हें रथी वीराचें निम्में अंग. मी असा विकलांग होऊन या रणांगणांत एकटा काय करणार ? मला वाटतें बृहन्नडा रणसंग्रामाला भिऊन मला झुकांडी देऊन पळून परत नगराला गेली. पण तिला तरी मी दोष कसा देऊं ? मी प्रत्यक्ष पुरुषासारखा पुरुष आणि क्षत्रिय राजपुत्र असतां क्षितिजावर उमटणारें हें सैन्य पाहूनच गर्भगळित झालों. मग ती तर बोलून चालून अर्धनरनारी. नुसता पुरुष किंवा नुसती स्त्री यांच्या हि पेक्षां तिच्या अंगी धैर्य कमी असणार हें उघड आहे. पण मी आतां काय करूं ? या ओसाड रणांगणांत एकटा उभा राहूनच जर मी इतका भितों तर शत्रुसैन्य अंगावर चालून आल्यावर माझी काय स्थिती होईल ? शत्रूची सोबत भय घालविणारी नसून भय उत्पन्न करणारी असते. [ अर्जुन प्रवेश करितो ] हा पहा शत्रुसैन्यांतला अघाडीचा एक वीर माझ्याकडेच येत आहे. या वेळीं बृहन्नडा जवळ असती तर मला अर्धा तरी धीर आला असता ! परमेश्वरा माझी अब्रू संभाळणारा आतां तुझ्या शिवाय दुसरा कोण आहे ? तुला माझी थोडी तरी करुणा येऊं दे.

अर्जुनः—कुमार, तुम्ही असे घाबरलेले कां दिसतां ? शत्रु अजून थोडा दूर आहे.

उत्तरः—[ घाबरून ] मग तुम्ही कोण ?

अर्जुनः—मी तुमचा मित्र आहें.

उत्तरः—[ थोडा धीर येऊन ] माझ्या अपरिचित मित्राला प्रणाम असो.

अर्जुनः—कुमार तुम्ही मला नीट ओळखलें नाहीं असें दिसतें.

उत्तरः—नाहीं खरेंच. पण या ठिकाणीं माझा दुसरा एक सोबती होता तो कुठें गेला ?

अर्जुनः—तो कोण ?

उत्तरः—माझा गायनवादनाचा शिक्षक. माझा सारथी बृहन्नडा.

अर्जुनः—[ पुढें होऊन ] आणि मी कोण ?

उत्तरः—[ न्याहाळून ] अरे व: बृहन्नडे, तुझ्या अंगाखांद्यावर हीं चिलखतें कुठून आलीं ? तुझा अर्धनारीनराचा पोषाख त्यांनीं अगदीं लोपून गेला. आणि हा वीरवेष, हीं शस्त्रास्त्रें, तुला कुणीं दिलीं ?

अर्जुनः—ही सर्व गुप्त गंधर्वपतींची कृपा.

उत्तरः—अरे व: हे परोपकारी गुप्त गंधर्व कोण ?

अर्जुनः—सैरंध्रीचे पती. ज्यानीं कीचकाचा वध केला त्यानींच या ठिकाणीं अवतीर्ण होऊन माझ्या सारथ्याच्या कामाला उपयोगी असा हा सरंजाम मला देण्याचा अनुग्रह केला.

उत्तरः—ज्या गुप्त गंधर्वांनीं अशीं दिव्य वस्त्राभरणें आणि तेजस्वी शस्त्रास्त्रें दिलीं त्यानां या युद्धात आमच्या बाजूनें तूं लढायला ठेवून घ्यायचें होतेंस. त्यांना जाऊं दिलेंस ही तूं मोठी चूक केलीस.

अर्जुनः—देवता मनुष्याला फक्त पराक्रमाचीं साधनें सुलभ करून देतात; पण पराक्रम हा ज्याचा त्यानें स्वतःच करायचा असतो. कुमारा, पण आतां जीभ आवरून धरून तूं आपले हात पुढें सरसवावेस हेंच बरें. कारण शत्रु अगदीं समीप येऊन भिडला. पहा शत्रुपक्षाच्या वीरांचीं तोंडेंहि मला अंधूक दिसूं लागलीं.

उत्तरः—होय का ? तर मला अगदीं मागें सरकूनच पाहिलें पाहिजे. मला अगदीं जवळच्यापेक्षां लांबूनच थोडें अधिक चांगलें दिसतें. [ मागें सरकूं लागतो. ]

अर्जुनः—मला वाटतें हा तुझ्या डोळ्यापेक्षां तुझ्या हृदयाचाच दोष अधिक आहे. [ पडद्यांत गर्जना होऊं लागते. ] उत्तरा, खबरदार एक पाऊल मागें टाकशील तर.

उत्तरः—[ स्वगत ] अरे ही बृहन्नडा एकदम एकेरीवर कशी आली? [ उघड ] पाऊल मागें पुढें टाकण्याची तुझी आज्ञा नृत्यशाळेंत नृत्य शिकत असतांना योग्य होती व ती मी ऐकली असती. या रणांगणावरच्या वीरनृत्यांत मी शिक्षक आहें आणि तूं शिष्य आहेस. रणांगणाच्या नृत्यशाळेंत माझ्या आज्ञेप्रमाणेंच तुला पावलें टाकलीं पाहिजेत. गायन-स्वरांत जसा षड्ज किंवा तालांत जसा सम तसाच रणांगणावर रथी हा राजा आहे. सारथ्यानें त्याला अनुसरूनच वागलें पाहिजे. बृहन्नडे रथ मागें ने.

अर्जुनः—कुमारा, मी रथ मागें नेणार नाहीं. आणि तूंहि आतां नृत्यशाळेतल्या उपमा—फार काय नृत्यशाळेची आठवणहि विसरून जा.

पद २९. राग—मल्हार.

विसर अजुनि तरि रंगसभा रे नटेल भू ही रणसंभारें
॥ धृ० ॥ रुधिर कर्दमें होईल सिंचन । अस्थिचूर्ण
रंगावलि लेपन ॥ विकट हास्य आक्रंदन गायन। शिर
विरहित नर करितिल नर्तन ॥ शक्ति देवी मंगल
अवतारें ॥ विसर १ ॥

मी तुला बऱ्या बोलानें सांगतों, विराट नगरचा युवराजा व माझा मित्र म्हणून तुला सांगतों, कीं शत्रु जवळ येऊन ठेपला त्याला तोंड दे आणि आपल्या क्षात्र कुलाला कलंक लावूं नकोस.

उत्तरः—मी लढायला कुठें नाकबूल आहें ? पण मागें हटत जाणें हें एकप्रकारचें लढणेंच आहे हें कदाचित तुला माहित नसेल. चढाई करून पुढें जाण्यापेक्षां मागें हटण्याला अधिक कौशल्य, फार काय पण अधिक शौर्यहि लागतें. हल्याचा बचाव काय आडदांड शिपाईसुद्धां करूं शकेल; पण बचावाचा हल्ला करणारा वीर क्वचितच असतो. हें पहा शत्रु सैन्य जवळ येऊन भिडलें. बचावाचा पराक्रम सुरू करण्याला आतां हाच योग्य काल आहे. रथ मागें फिरीव.

अर्जुनः—नाहीं, तें कधींहि होणार नाहीं.

उत्तरः—रथीवीराची आज्ञा मोडल्याबद्दल तुला सारथ्याला लष्करी कायद्याप्रमाणें कोणती शिक्षा करायची याचा विचार मी मागाहून करीनच पण तूर्त मला तरी आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे. [ मागच्या पायानें पळूं लागतो. ]

अर्जुनः—[ ही बतावणी संपविलीच पाहिजे. ] उत्तरा, उभा रहा. क्षत्रियाधमा उभा रहा. विराटकुलकलंका उभा रहा. मी तुला जाऊं देणार नाहीं. तुला स्वतःला तर अब्रू नाहींच पण ज्या विराटानें आमच्या-वर एवढा उपकार केला त्याची अब्रू तुझ्यासारख्या भिकारड्या पोराच्या हातूनहि मी गमावूं देणार नाहीं. [ त्याचा हात धरतो. ]

उत्तरः—[ दटावून ] हां खबरदार, हा नुसता आज्ञाभंग नव्हे तर उपमर्द आहे. [ अर्जुन त्याचा फेटा उडवून त्याची शेंडी धरतो. ] आतां या उपमर्दाला बलात्काराचें स्वरूप आलें. [ दुर्योधन व कर्ण येतात. ]

दुर्यो०:—मित्रा कर्णा, विराट नगराचें सैन्य आमच्यावर चालून येत आहे अशी वार्ता कानावर आली; पण इथें पहावें तों अवघ्या दोन आकृति दिसतात. हा काय चमत्कार ? आणि या दोहोंतहि एक तर पोरच दिसतें.

अर्जुनः—कोण दुर्योधन ! आणि कर्णहि. वाहवा फार चांगलें झालें. मला कौरव सैन्यांतले जे दोन प्रतियोद्धे पाहिजे होते तेच आपल्या पायांनीं चालत माझ्या समोर आले.

कर्णः—मित्रा सुयोधना, या दोहोंतले एक पोर असलें तरी पुरुष आहे. पण त्याच्या बरोबर ही जी दुसरी आकृति दिसते ती तर नीट पहा. तिला स्त्री म्हणावें कीं पुरुष म्हणावें हेंच कळत नाहीं,

दुर्यो०:—छेः ती आकृति स्त्रीची खास नव्हे. स्त्री कुठें अंगापिंडानें इतकी बळकट असते काय ? अशा स्त्रीला अनुरूप असा पुरुष मला वाटतें माझ्या दुनियेंत मिळणार नाहीं. [ उत्तर पडद्यांत पळून जाण्याचा प्रयत्न करीत राहतो व अर्जुन त्याला वरचेवर धरून परत आणतो. ]

कर्णः—न जाणों, स्त्रीजातींत निर्माण झालेला हा एखादा राक्षस असेल कदाचित; पण राक्षस झाला तरी स्त्रीराक्षस.

दुर्यो०:—पण नुसत्या शरीरानें एखादी स्त्री प्रचंड असली तरी तिच्या शरीराची ठेवण पुरुषासारखी असणार नाहीं. मनुष्य देहाचीं मडकीं घडविणारा कुंभार म्हणजे ब्रह्मदेव चुकून चुकला तरी अशा ढोबळ चुका त्याच्या हातून होत नसतात. ते पहा, त्या व्यक्तीचे खांदे कसे भरींव आहेत. जणुंकाय धनुर्विद्येचा अभ्यास तिनें आजन्म केला असावा.

कर्ण:—रानांतल्या मातंग किंवा किरातांच्या बायका आपल्या नवऱ्यापेक्षांहि धनुर्विद्येंत अधिक तयार असतात. त्यांतलीच ही एखादी नसेल असें कशावरून ?

दुर्यो०:—पहा त्या व्यक्तीचें पाऊल कसें ऐटदार पडतें आहे. जातीच्या स्त्रीनें कितीहि वीरविडंबन केलें तरी तें विडंबनच.

कर्ण:—पण वेषावरून तरी पुरुषापेक्षां ती स्त्रीच दिसते कीं नाहीं ?

दुर्यो०:—शरीराच्या नैसर्गिक खुणा सोडून तूं वेषाकडे गेलास. मी तर म्हणतों वेषांतर करून पुरुषाची स्त्री होणें फार सोपें आहे. पण या तुझ्या स्त्रीच्या वक्षःस्थलाकडे पहा. तें वक्षःस्थल विशाल आहे; पण उन्नत नाहीं. इथें सगळा घात झाला. पुरुषाशीं स्पर्धा करण्याकरितां स्त्रियांनीं हत्तीचें गंडस्थळ ईश्वरापाशीं मागून घेऊन तें वक्षःस्थलावर मिरविलें; पण त्यानें त्यांचें स्त्रीत्व न जाऊन अबला म्हणून सर्व जगानें ओळखण्याला तेंच एक ठळक साधन झालें. बचावाचा म्हणून साक्षीदार आणला आणि तोच इथें फिर्यादी ठरला ! गंडस्थळविरहित हत्तीला हत्तीण म्हणतात; पण गंडस्थळविरहित स्त्रीची गणना पुरुषांतच केली पाहिजे.

पद ३०. चाल—देतो ताप मदन हा.

तुज ही फसवि आकृती ।। वेष स्त्रीचा दिसत तरी ती
कपटाचीच कृती ॥ धृ० ॥ गंडस्थळ विरहित गजजाति
ह्मणती तिजासि करेणू ।। गंडस्थळ विरहित नर कामिनि ।
तिजला नर कां न म्हणूं ।।तुज ही ।।१।। निसर्ग लक्षण
लपवुनि नलपे । यत्न बहुत जरि केला ॥ ब्रह्मदेव जो
पिंड घडवितो । कोण बिघडवी त्याला ॥ तुज ही ।।२।।

कर्ण:—ती व्यक्ती स्त्री असो वा पुरुष असो. पण तिचा आवेश मात्र प्रेक्षणीय दिसतो.

दुर्यो०:—त्यावरून ही तो मला पुरुष वाटतो. पण कायरे मित्रा ही त्या उभयतांची झटापट कशाबद्दल चालली असावी ? आपण विराट नगराकडे युद्धाकरितां निघालों. पण आपल्याला आडवे येणारें सैन्य तर कुठेंच दिसत नाहीं हा काय प्रकार असावा ?

अर्जुन:—( उत्तराच्या गळ्यांत धनुष्य घालून त्याला ओढीत ) उत्तरा खबरदार यापुढें पाऊल मागें टाकलेंस तर.

उत्तर:—(काकुळतीनें) बृहन्नडे, नकोग नको. माझ्यावर असा बलात्कार करूं नकोस. शत्रुसैन्याचें दर्शन होतांच माझे पंचप्राण मला सोडून जाऊं लागले. माझ्या पायापेक्षां शरीराचा दुसरा कोणताही भाग आतां जिवंत उरला नाहीं. मी तुझ्या पाया पडतो. मला सोड. मला परत नगराला जिवंत जाऊं दे. माझ्या बाबांना निपुत्रिक करून आमच्या कुळाचा क्षय कां करूं पाहतेस ?

दुर्योधन:—मित्रा, चल आपण जरा पुढें जाऊन हा काय चमत्कार आहे तो जवळून पाहूं.

अर्जुन:—उत्तरा मी तुला रणांगणांतून मागें फिरूं देणार नाहीं. विराटराजाच्या पोटीं असलें कुसंतान उरण्यापेक्षां त्याचें एकदम निःसंतान झालें तरी पुरवलें.

उत्तर:—वः हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण. माझ्या बापाचें निसंतान करायला तुझें काय जातें !

अर्जुन:—तें काय म्हणून ? प्रत्यक्ष पोटचा पोरगा तुझ्या ठिकाणीं असता तरी त्याला मी रणांगणांतून परांङ्मुख होऊन परत जाऊं दिला नसता. माझा मुलगा रणांगणावर युद्धांत पडल्यानें मी निपुत्रिक झालों असतों तर त्या गोष्टीचा पुत्रजन्माप्रमाणें आनंद मानून मी साखर वाटीत नगरांत शिरलों असतों.

उत्तर:—( स्वगत ) बृहन्नडेला पुत्र होणार तेव्हां मग ती निपुत्रिक होणार! [ काकुळतीला येऊन ] बृहन्नडे, तूं माझ्या प्राणावर इतकी कां उठलीस ?

अर्जुन:—तुझ्या घराण्याची अपकीर्ति टाळण्याकरितां.

उत्तर:—प्राण जाणार तर मला कीर्ति घेऊन काय करावयाची ? प्राण जगले तर कीर्ति पुढें मागें मिळवितां येईल. प्राणही राखावे आणि कीर्तिहि मिळवावी हेंच खरें व्यवहार चातुर्य.

अर्जुन:—खऱ्या क्षत्रियाला तुझें हें व्यवहारचातुर्य कधींहि पटणार नाहीं. उत्तरा हें धनुष्य हातांत घे आणि आपणावर चालून येणाऱ्या शत्रूवर बाणांचा भडिमार कर. तूं रथी योद्धा आहेस, शत्रूवर बाण टाकण्याचा पहिला मान मी तुला देतों.

पद ३१. चाल—नयनांतलें जळ.

धनु घे करीं नृपती-तनया। रण प्रेम माझें विसरे न
नया ॥ धृ० ॥ तुज अर्पितों बहुमान हा। दवडूं नको
न येई पुन्हां ॥ करि विक्रमा। विसरीं भया ॥ धनु ॥

उत्तर:—बृहन्नडे, मला मान देण्यापेक्षां शत्रूच्या हातीं माझी मान देणार, असेंच का म्हणेनास ? तुझें हें धनुष्य माझ्या या निर्जीव हातांना उचलवत देखील नाहीं; मग त्यावरून मी शरसंधान कसें करणार ?

दुर्यो०:—मित्रा कर्णराजा, अर यांच्यांतली ही झटापट आमच्याशीं लढण्याकरितांच चालली आहे. या अवघ्या दोन व्यक्ति हेंच आम्हाला सामोरे येणारें सैन्य कीं काय ? हे आमची थट्टा करितात कीं स्वतःची ?

कर्ण:—चला आपण आतां पुढें जाऊं.

अर्जुन:—या, कौरवसैनिकांना पुढें या. तुमचें स्वागत करायला आम्ही तयार आहों.

कर्ण:—तुमच्यासारख्या या व्यक्तींकडून स्वागत घेण्याचा मान तुम्ही दिला तरी तो आम्हाला नको. हें असलें रडत राऊत चिरचिरें नादान पोर आणि तुझ्यासारखा धड ना पुरुष ना स्त्री अशांकडून आमच्या-सारख्या योद्ध्यांचें स्वागत म्हणजे तो एक अपशकूनच होय.

अर्जुनः—आपल्यां पायांनीं मृत्यूच्या मुखांत शिरूं पाहणाराला अपशकुनाशिवाय दुसरें काय लाभणार ? दुर्योधना, कर्णा, तुम्हाला आपले प्राण वाचवायचे असले तर अजून परत जा. उत्तरा, हें तुझ्या गळ्यांतलें धनुष्य काढून मीं आपल्या हातांत घेतलें. तुझ्या हातानें धनुष्य धरवत नसेल तर नसो; पण रथाच्या घोड्यांचे लगाम तरी खास धरितां येतील. युद्धकर्मांत तुझ्याकडून मला इतकें थोडें सहाय मिळालें तरी तें मला पुरे.

दुर्यो०:—तुझ्यासारख्या तृतीयप्रकृतीशीं युद्ध करण्याइतके नादान आम्हीं नाहीं बनलों. कर्णा, चल आपण फिरून आपल्या सैन्यांत जाऊन मिळूं आणि तें घेऊन विराटनगरावर चालून जाऊं.

अर्जुनः—(दुर्योधनाला अडवून) तूं परत जाशील पण असा आयता हातांत सांपडलेल्या तुला मी परत जाऊं दिलें पाहिजेना ?

दुर्यो०:—माझ्या प्रतिपक्षाचें नांव कळल्याशिवाय मला त्याच्याशीं लढतां येत नाहीं. धर्मयुद्धाचीं बंधनें मला पाळलींच पाहिजेत.

अर्जुनः—माझें नांवहि तुला योग्य वेळीं कळेलच. पण प्रथम माझ्या शस्त्रास्त्रांचा आघात किती भयंकर आहे हें तुला कळवितों.

कर्णः—सुयोधना, केवळ आत्मरक्षणापुरता प्रतिकार तृतीयप्रकृतीविरुद्ध करायला धर्मयुद्धाची मोकळीक आहे. (अर्जुनाला आडवूं पाहतो.)

अर्जुनः—तुमच्या मार्गांतील धर्मयुद्धकल्पनेची अडचण मी होऊन दूर करितों. दुर्योधना, कर्णा, मी वेषावरून स्त्री दिसत असलों तरी जातिवंत पुरुष आहे येवढेंच काय पण तुमच्या बरोबरीचा योद्धा आहें. तुह्मांला माझ्याशीं नुसतें आत्मरक्षणापुरतें लढण्याचें कांहीं कारण नाहीं. तुह्मांला युद्धचमत्काराची काय शिकस्त करायची असेल ती करा.

[ दुर्योधन, कर्ण व अर्जुन लढूं लागतात. दुर्योधन व कर्ण लढत लढत पडद्यांत जातात. ]

उत्तरः—शाबास बृहन्नडे, तूं एखाद्या वीराप्रमाणें युद्धकौशल्य दाखविलेंस. तुझा पराक्रम पाहून मी थक्क झालों, इतकेंच नव्हे तर माझ्या हृदयांत थोडथोडी वीरश्रीहि संचारूं लागली. हे वीरपुरुषा बोल, तूं हा

बृहन्नडेचा वेष मुद्दाम घेतला असला पाहिजे. आमच्या अंतःपुरांत काळ घालवून तूं आपल्या देहाची आणि मनाची विटंबना करून घेतलीस, त्याला कांहीं तरी गहन गूढ असाच हेतु असला पाहिजे. अज्ञानभरांत मीं तुझा आजवर अपमान केला तेवढा पुरे झाला. यापुढें मी तुला बृहन्नडा म्हणेन तर माझी जिव्हाच झडेल. सांग तूं आपलें खरें नामाभिधान आणि माझा संशय दूर कर; नाहींतर मी तुझे पाय सोडणार नाहीं.

अर्जुनः—उठ उठ उत्तरा. मीहि यापुढें तुला संशयांत ठेवूं इच्छित नाहीं. माझ्या बृहन्नडा वेषाचें मला यापुढें कारण उरलें नाहीं. ऐक, तुला गुप्त गंधर्व म्हणून जे मीं सांगितले त्यांतलाच मी एक आहें. एवढेंच नव्हे तर हे गंधर्व म्हणजे पंचपांडवाशिवाय कोणी नसून मी तृतीय पांडव पार्थ आहें.

पद. ३२ चाल—जावो मोरा काना.

पार्थ नाम माझें या जगतीं । नरवर मध्यम पांडव
मजला कृष्णसखा म्हणती ॥ ध्रु० ॥ कपटछलास्तव
मींच घेतला व्रीडास्पद हा वेष अति ॥ पार्थ ॥ १ ॥

ते पहा दुर्योधन आणि कर्ण पळून जाऊन आपल्या सैन्याला मिळाले आहेत. आपणाला त्यांच्याशीं आतां युद्ध केलें पाहिजे. आण माझा रथ तयार करून इकडे; आण आणि माझें सारथ्य कर. युद्धाची सर्व कामगिरी मीं आपल्यावर घेतों. विराट राजाच्या या शत्रूंचा पराभव करून तुझ्या आईला आणि बहिणीला आनंदाची वार्ता कळविण्याकरितां आपण लवकरच परत नगराला जाऊं. [ जातात. ]

## अंक ३ प्रवेश ४

[ दुःशीला प्रवेश करिते. ]

दुःशीलाः—या मेल्या सैरंध्रीचें पारडें एकदम इतकें कसें जड झालें? जन्म गेला असेल यजमान यजमानिनींचे पाय चेपतां चेपतां. भिकारडी बटीक कुठली आणि येवढीशी फूस मिळतांच हातांत तरवार घेऊन बनली आहे जशी कांहीं सेनापतीण. सटवीनें आम्हां बरोबरीच्या दासींना कसें अगदीं कवडीमोल करून टाकलें आहे. काय पण तिला ताठा चढला आहे. पण थांब म्हणावें युद्ध संपून सगळें स्थीर स्थावर होऊं दे म्हणजे मग पाहतें तुझा तमाशा.

कुसुमः—दुःशिले, दिवाणखान्यापासून मोठ्या दरवाजापर्यंत रंगी बेरंगी सडे घालायला मला राणीसाहेबांची आज्ञा झाली आहे. मग सांग ना कोणकोणत्या रंगाचे सडे घालूं ते ?

दुःशीलाः—सैरंध्रीला विचार जा. मला काय विचारतीस ?

कुसुमः—राजवाड्यांतल्या दासींची मुख्य तूं म्हणून विचारलें हो.

दुःशीलाः—अग तो अधिकार आतां माझ्याकडे राहिला नाहीं हें नाहीं का तुला माहीत ? जा सैरंध्रीलाच विचार जा.

२ दासीः—गडे दुःशीले, राजवाड्यांत सगळीकडे रांगोळ्या घालायची मला आज्ञा झाली आहे. मग काय काय चित्रें काढूं ती सांग ना ?

दुःशीलाः—घाल माझ्या डोंबल्याच्या रांगोळ्या. अग आतां मला काय विचारतीस ? आतां सैरंध्रीनें सांगावें आणि ती सांगेल तें तुम्ही ऐकावें. मी ग कोणत्या झाडाचा पाला ?

२ दासीः—मेल्ये आमच्यावर कां आग पाखडतेस ! न सांगेनास मी सुचेल तसें करीन. तुझी इतकी प्रतिष्ठा नको.

दुःशीलाः—अग मला आतां प्रतिष्ठा उरली असेल तर ना ?

३ दासीः—दुःशीले, मला दिवाणखान्यांतल्या दर खांबा गणीक पुष्पमाळा लावायचा हुकूम झाला आहे. पण बाई तुझ्या संमतीशिवाय तें कसें करूं ? चुकलें बिकलें तर ?

दुःशीलाः—काय तरी मेल्यांचा त्रास ! अग सैरंध्री सांगेल हो तुला सगळें कांहीं. ती सांगेल तें आतां यापुढें बरोबर आहे. तिलाच विचार जा.

३ दासीः—असें असें. वड्याचें तेल वांग्यावर कां काढतीस ? सैरंध्रीचा छळ करून तूंच आपल्या हातानीं आपल्या पायावर दगड घालून घेतलास त्याला आह्मीं ग काय करावें ? जुन्या चालीप्रमाणें आपली तुला विचारायला आलें इतकेंच. नाहीं सांगायचें तर न सांगेनास बापडी.

दुःशीलाः—आतां जुनी चाल उरली आहे कुठें ? आतांची नवी चाल पायांतलें खेटर डोक्यावर ठेवून पुजायची निघाली आहे. नगरचा सारा अधिकार आज सैरंध्रीकडे गेला आहे हो. तिनें सांगावें आणि आह्मी—पण आह्मींच काय राणीसाहेबांनींहि—ऐकावें असा नवा कायदा निघाला आहे. जा तुझ्या पुष्पमाळांचें प्रकरण सैरंध्रीलाच विचार जा.

[ राणी आणि उत्तरा बोलत येतात. ]

राणीः—मला हें असलें मुळींच खपायचें नाहीं सांगून ठेवतें. ज्यानें त्यानें आपल्या पायरीप्रमाणें वागावें. कसला ग आला आहे त्या मेल्या सैरंध्रीला अधिकार ? काय म्हणे अमात्याला ही कैद करायचा हुकूम देते. आणि तुझ्या ह्या पोरी तिचें ऐकून त्यांना कैद करतात. तुम्ही सान्या पोरी अमात्यांच्या नाती शोभाल. एवढ्या मातबर माणसाची अशी अप्रतिष्ठा !

दुःशीलाः—बरें झालें राणीसाहेबांना तरी माझ्यासारखें वाटतें. या सगळ्या जणी मला विचारायला आल्या, महाराज विजयी होऊन येतात तर सडे रांगोळ्या कशा करूं कसं करूं काय करूं म्हणून. मी सगळ्यांना सांगितलें कीं सैरंध्रीकडे जा आणि ती सांगेल तसें करा. हो नाहीं तर दुसरें काय सांगू ? आतां सैरंध्रीशिवाय होय नाहीं असें तसें ह्मणायची मुखत्यारी दुसरी कोणाला उरली आहे ?

उत्तराः—दुःशीले, तूं असें सांगितलेंस हेंच बरें केलेंस. होय सगळी मुखत्यारी सैरंध्रीलाच दिली आहे समजलीस ! सैरंध्री दासी आणि तूं ग कोण ? यजमानीण वाटतें ! तुम्ही सगळ्या जणींनीं तिचा आजवर हेवा

केला तो पुरा नाहीं का झाला ? ती होती म्हणूनं नगर रक्षणाच्या कामीं आम्हांला धीर तरी आला. आई, तुलाहि मी सांगतें कीं सैरंध्रीनें अमात्यांना कैद केलें तेंच बरोबर केलें. त्यांचा अपराध तुला कुठें आहे माहीत ? त्यानींच या युद्धाच्या वेळीं शकुनीला आपल्या नगरांत आणला. बाहेर पराक्रमी कौरव आणि आंत कपटी शकुनी मग नगरची वाट काय होणार होती तें दिसतेंच आहे.

राणी:—असला ह्मातारा इमानी मुत्सद्दी असली गोष्ट कांहीं तरी खोल मतलबाशिवाय करीत नसतो हें तुम्हां मुलींना काय कळणार ? शकुनीला अमात्यांनीं नगरांत आणलें तें नगरच्या संरक्षणाकरितांच आणलें असेल. शकुनीसारखा कौरवांचा मुत्सद्दी जर आमच्याशीं स्नेहभावानें वागत असला तर मग आह्मांला कौरवांपासून कसलीच भीति नाहीं समजलीस ?

दुःशीला:—होय राणीसाहेब. अमात्यांनीं शकुनीमामाला नगरच्या रक्षणाकरितांच आंत घेतलें हें मला ठाऊक आहे.

राणी:—पण हे पहा अमात्यराजच इकडे आले. तेच सांगतील आपल्या तोंडानें आह्मांला खरें खोटें काय तें. [ अमात्य बंदिवान पुढें आणि द्रौपदी मागें अशीं येतात. ] कायग सैरंध्री तूं अमात्यांना कुणाच्या हुकमानें कैद केलेंस ?

द्रौपदी:—नगरदेवतेच्या हुकमानें.

राणी:—म्हणजे माझ्याच ना ?

द्रौपदी:—नाहीं राणीसाहेब. नगरदेवता आज आपण नाहीं, ती अदृश्य आहे. तिच्याच आज्ञेनें आणि आपल्या अनुमतीनें मीं नगररक्षणाकरितां स्त्रियांचें सैन्य उभारलें; आणि तिच्याच आज्ञेनें अमात्यांना कैद केलें.

राणी:—मी तुझी अदृश्य नगरदेवता ओळखीत नाहीं. तूं आधीं अमात्यांना बंधमुक्त कर. पण स्वारी आलीच वाटतें ! तेच आतां या गोष्टीचा निर्णय करतील !

———

# अंक ३ प्रवेश ५

[ विराट आणि राणी प्रवेश करितात. ]

राणीः——नगरांतून सैन्यासह बाहेर पडायचें झालें तेव्हां बाई माझ्या काळजांत जी काय कालवाकालव झाली ती काय सांगू ? कौरवांच्या शौर्याचा आणि त्याहिपेक्षां त्यांच्या दुष्टपणाचा लौकिक मी ऐकला होता. म्हणून बाई वाटलें कीं, हे पाय फिरून दिसले म्हणजे मी सारें जग मिळविलें. मी कुलदेवतेला एक सोडून शंभर नवस केले असतील कीं, इकडन कौरवांचा पराभव होऊंदे म्हणजे—

विराटः——पण तुझ्याकडून नवस फेडून घेऊन कमाई करावी अशी देवीची इच्छाच नसावी.

राणीः——तें कसें ?

विराटः——कारण माझ्याबरोबर युद्ध करायला कौरव मुळीं आलेच नाहींत.

राणीः——तर मग आपण कुणावर जय मिळविला ?

विराटः——त्याला जय म्हणायलाच मला खंती वाटते.

राणीः—ती कां ?

विराटः——कौरवांवर जय मिळावा या ईर्षेनें मी बाहेर पडलों; पण शेवटीं पहातों तो त्रिगर्तच माझ्यापुढें उभा. नाहीं म्हणायला त्यांतल्या-त्यांत एकच समाधानाची अशी गोष्ट वाटली.

राणीः——ती कोणती बाई ?

विराटः——ती ही. केवळ कीचक बळवान म्हणून त्याच्या सहायानें विराट आपला पराभव करतो अशी आजवर त्रिगर्तांची तक्रार असे. पण आतां कीचकवधानंतर स्वतः एकाकी विराटहि मला भारी आहे अशी कबूली त्याला रणांगणावर द्यावी लागली. पराजित झालेल्या शत्रूच्या दीन वदनांतून निघणाऱ्या एका केविलवाण्या शब्दानें योध्याच्या श्रमांचा जसा पांग फिटतो तसा हजारों दासदासींनीं अंगमर्दन करून अभ्यंग स्नान घातल्यानेंहि फिटत नाहीं. त्यांतून त्रिगर्तांचें आणि माझें वडिलार्जित वैर.

मग मला आनंद किती झाला असेल याची तूंच कल्पना कर. [ दूत प्रवेश करितो ] कायरे काय बातमी आणली आहेस तूं ? बाकी तुझ्या आनंदी मुद्रेवरून तूं कुमार उत्तराच्या विजयाची बातमी आणली असशील हें एखादें पोरही सांगेल.

दूतः—होय सरकार. आनंदाचीच बातमी आहे. कुमार उत्तरांनीं सगळ्या कौरवसेनेचा पराभव केला इतकेंच नव्हे तर दुर्योधनादि वीरांना बांधून घेऊन ते नगराकडे येताहेत. आणि ही बातमी सांगायला बृहन्नडेनें मला इकडे पाठविलें सरकार !

राणीः—अगबाई खरेंच का ? माझा बाळ रागावला बरं का असें मीं तेव्हां म्हटलें तेंच खरें. किती केलें तरी क्षत्रियाचें मूल. रणांगणावर विजयी व्हायचेंच !

विराटः—वाहवा ! फार चांगलें. स्वतःच्या यशाहून आपल्या मुलाचें यश अधिक उज्वल झालेलें पाहणाऱ्या पित्याची धन्यता अपूर्व आहे. त्याचा हट्ट बाजूला ठेवून त्याला नाखूष करून मीच लढाईवर गेलों; पण दैव त्याचें सहायकारी. त्यानें खुद्द कौरवांशीं त्याची गांठ घालून त्याला माझ्या पेक्षांहि मोठा विजय मिळवून दिला ! प्रिये, आतां एक क्षणहि गमावूं नका. माझ्या स्वागताकरितां तुम्हीं तयारी केली ती कांहींच नाहीं अशी अपूर्व तयारी उत्तराच्या स्वागताची झाली पाहिजे. जा, माझ्या खजिन्याचीं दारें मोकळीं टाका. नगरचा कोणताहि कोपरा शृंगारल्या-शिवाय ठेवूं नका. नगरांतील अत्यंत दारिद्री मनुष्यहि निरिच्छ होईल असा दानधर्म करा. पण थांबा, ही सर्व तजवीज मी अमात्यांनाच सांगतों. तूं आपणाबरोबर एकशें आठ कुलवधू सुवासिनी घेऊन नगर-द्वारावर उत्तराला पंचारत्या ओवाळण्याकरितां सिद्ध होऊन जा कशी. कोण आहेरे, अजून अमात्य कसे माझ्या भेटीला आले नाहींत ?

[ बंदिवान अमात्य प्रवेश करितो. ]

अमात्यः—हा पहा मी अमात्य आपल्याच भेटीला आलों आहे महा-राज. मात्र या स्थीतींत !



द्रौपदीः—महाराज नगराला परत आले, आतां माझा सेनाधिपत्याचा अधिकार संपला.—

विराट—( आश्चर्यानें ) हें काय ? अमात्यांना असली थट्टा करण्याची लहर कशी आली ? विनोदांत झाला तरी हा अलंकार फारच विपरीत म्हणायचा.

अमात्य—नाहीं महाराज, हा विनोद नाहीं. मी खरोखरच कैदी आहे.

विराटः—आणि ही तुमची विटंबना कुणी केली ?

राणीः—मी सांगतें काय झालें तें. आपण सर्व सैन्य घेऊन गेला. बाळ उत्तरहि गेला आणि कौरव या आपल्या नगरावर चालून येणार अशी बातमी आली. तेव्हां नगरच्या स्त्रियांनींच सशस्त्र होऊन नगरचें रक्षण करण्याचें ठरवून सैरंध्रीकडे आधिपत्य दिलें. तिच्याच हुकमानें अमात्यराजांना कैद करण्यांत आले.

विराटः—वः एकेक ऐकावें तें आश्चर्यच. आनंदाला अद्भुत रस हा पोपक व्हावा हें ठीकच आहे. संकट एकच आलें पण त्यानें कार्यें तीन साधलीं.

राणीः—तीं कशीं ?

विराटः—प्रथम म्हातारपणींहि मला क्षात्र विद्या सोडून गेली नाहीं हा अनुभव मिळाला. दुसरें उत्तराचें क्षात्र विद्येंत मंगलमय उपनयन झालें. आणि तिसरें सैरंध्रीसारख्या यःकश्चित दासीच्याहि अंगांत केवळ आत्म-रक्षण व स्वाभिमान यांच्या योगानें स्फुरण चढतें हेंहि दिसून आलें. ही दासी—

[ सैरंध्री व उत्तरा प्रवेश करिते. ]

राणीः—हं हं. महाराज सैरंध्रीला दासी म्हणूं नका. त्याचा तिला फार राग येतो.

विराटः—[ हंसून ] दासीला दासी म्हणण्याचा राग येतो ? मग तिला काय यजमानीन किंवा वीरवधू म्हणावें ?

द्रौपदीः—महाराज नगराला परत आले. आतां माझा सेनाधिपत्याचा अधिकार संपला. [ तरवार विराटाच्या पायाजवळ ठेवते ] पण पूर्वी अमात्यांना सांगितलें तितक्याच आग्रहानें महाराजानांहि सांगतें कीं मला या पुढें कोणीही दासी म्हणतां कामा नये. आणि जो कोणी म्हणेल त्याचा प्रतिकार मी केल्याशिवाय राहणार नाहीं.

३३. चाल—रूं झूं बदरिया बरसे.

ठेवियली ही असि चरणीं कारण न तिचें उरत रणीं
॥ धृ० ॥ असि विरहित जरि तरि नच दासी
क्षत्रिय ललना आहे मीं । हिरा शोभे जरि न बसला
कोंदणीं ॥ ठेवि १ ॥

महाराजांच्या इच्छेप्रमाणें मी अमात्यांना बंधमुक्त करितें.

विराट:—सैरंध्री, संकटकाळीं नगर रक्षणाचें काम ज्यानें केलें त्याला यापुढें कोणीहि दास किंवा दासी या नात्यानें वागविणें हें अन्यायाचें होईल हें मी जाणतों. आणि या पराक्रमाबद्दल मी आपण होऊन तुला दासी-पणांतून मुक्त केलेंच असतें. पण कोमेजून कुसकरल्या गेलेल्या निर्माल्य फुलांतून एकदम टशटशीत अर्धोन्मीलित सुगंधमय कळी निर्माण व्हावी त्याप्रमाणें सैरंध्री, दासीपणांतून स्वयंभू पराक्रमानें आणि तेजानें तुझा हा वीरावतार झालेला पाहून मला आनंदाइतकेंच आश्चर्यहि वाटतें. पण सैरंध्री, अमात्यांना तूं कैदेंत कां ठेवलं होतेंस ?

द्रौपदी:—त्यांनीं आपले शत्रू जे कौरव त्यांचा कपटसचीव जो शकुनी याला नगरांत घेतलें म्हणून.

विराट:—अमात्य, तुम्हीं शकुनीला नगरांत कां घेतलें ?

अमात्य:—नगराचें रक्षण व्हावें म्हणून.

विराट:—खुद्द शत्रूला नगरांत घेऊन नगराचें रक्षण करूं पाहणें ही विपरीत रणनीती तुम्हाला कशी आठवली ? चोराच्या हातीं किल्ली देऊन खजिना रक्षण करणार ?

अमात्य:—तसें नव्हे महाराज. दुर्योधनाजवळ रदबदली व स्नेहभावाचा तह करवून देण्याचें शकुनीनें कबूल केलें होतें.

विराट:—आणि याला मोबदला ?

अमात्य:—मोबदला कसला ? आमच्या नगरांत पांडवांना शोधून काढण्याला मदत देण्याचें मी कबूल केलें होतें.

विराट:—[ हंसून ] मोबदला तेवढा खोटा आणि आपणाला होणारा फायदा तेवढा खरा. अमात्य, तुम्ही शकुनीसारख्या कपटपटूलाहि फसविलेंत अं. आमच्या नगरांत पांडवांचा शोध—वाहवा—आमच्या नगरांत आणि पांडवांचा शोध! ठीक. भूलोकावर अमृत हुडकण्यासारखेंच हें हास्यास्पद आहे.

द्रौपदी:—नाहीं महाराज, आपल्या नगरांत पांडव शोधून काढणें इतकें अशक्य नव्हतें. शकुनीच्या आशेला चांगलाच आधार होता. तो त्याचा डाव फसला ही गोष्ट वेगळी. पण त्यामुळें अमात्यांचा दुष्टपणा कांहीं कमी ठरत नाहीं.

विराट:—काय आमच्या नगरांत पांडवांचा वास ?

राणी:—मी झालें तरी सैरंध्रीला प्रथमपासून तेंच विचारतें आहें. आमच्या नगरांत पांडव कुठून येणार ?

द्रौपदी:—माझ्या गुप्त गंधर्व पतीच्या कृपेनें याचा उलगडा लवकरच होईल.

विराट:—असो. हा उलगडा झाला तर मला इष्टच आहे. तूर्त आपण उत्तराला सामोरे जाण्याची तयारी करूं या ?

[ सर्व जातात. ]

## अंक ३ प्रवेश ६

[ उत्तराचा नगरप्रवेश होत आहे. ]

उत्तरः—तोंड दाबून होणारा बुक्क्यांचा मार एक वेळ सोसवेल पण तोंड दाबून होणारा स्तुतीचा मार मी कसा सहन करूं ? पण त्या उपकारी महावीराच्या आज्ञेनें सोसला पाहिजे करणार काय ? निष्कारण मानसंभावनेसारखी तीव्र निंदा दुसरी कोणती तरी संभवेल काय ? आपली योग्यता नसतां होणाऱ्या स्तुतीचा प्रत्येक शब्द स्वाभिमानी मनुष्याच्या मनाला जळजळीत निखाऱ्यासारखा चटका देतो. आपली योग्यता नसतां गळयांत पडणारी प्रत्येक फुलांची माळ त्याला यमपाशासारखी वाटते. नगराच्या प्रेक्षकांना माझी ही मिरवणूक वाटत असेल पण मला ती माझी धिंड निघाल्यासारखी वाटते हें त्या बिचाऱ्यांना काय माहित ? पण मी असा उदासवाणा खिन्न राहीन तर त्या महात्म्यानें माझ्याकडे सोपविलेल्या सोंगाची बतावणी व्हावी तशी होणार नाहीं. वीरश्रेष्ठ अर्जुनानें कार्यसाधन म्हणून बृहन्नडा वेषानें होणारें विडंबन वर्षभर सोसलें तर मी हें खोट्या मोठेपणाचें व वृथा स्तुतीचें विडंबन क्षणभर कां सोसूं नये ? ( मुली आरत्या, पूजासाहित्य घेऊन येतात. )

पद ३४ चाल—त्रिवेपि संगमिया.

मिरवित नेऊं चला । नगरा ।। धृ० ।। रणिं यश मिळ-
वुनि रिपु संहरुनी कुमार उत्तर आले परतुनि ।। मिर-
वित १ ।। रत्नपात्रिं या दीपा उजळुनी । करू कुरवंडी
त्या लागोनि ।। मिरवि २ ।। मंगलाक्षता तच्छिरिं
वाहुनि सुकुसुममाळा गळां घालुनी ।। मिरवित ३।।

सुशीलाः—मिरवणूक क्षणभर थांबूंदे. या ठिकाणीं कुमारांना कुरवंडी करायची आहे.

उत्तरः—[ स्वगत ] ही कुरवंडी पाहून माझी तर मनांत घाबरगुंडीच उडाली. [ मुली उत्तराला कुरवंडी करून गाणें म्हणून ओवाळतात. मिरवणूक थोडी पुढें येते. ]

सुशीलाः—फिरून एकदां या ठिकाणीं थांबायचें आहे. नगरांतल्या स्त्रीसैनीकांकडून कुमारांना पुष्पसमर्पण व्हायचें आहे.

उत्तरः—[ स्वगत ] मी तिकडे भागूबाईसारखा वागत असतां इकडे स्त्रियांनीं हातांत तरवार धरली होती ! असें असून त्यांच्या कडून मी पुष्पहार घालून घेणार ! असो. हेंहि एक वीरविडंबनच म्हणायचें, पांडववीरा अर्जुना माझ्या गळ्यांत पडणाऱ्या पुष्पमाळा तुलाच अर्पण असोत. पण छेः हा बहुमान मला नाहींच सोसवत. [ उघड ] मुलींनों माझा हा व्यर्थ सत्कार कशाला कारितां ?

सुशीलाः—हें काय ? एवढा विजय मिळवून कुमार आले त्यांचा सत्कार करायचा नाहीं तर कुणाचा करायचा ? ( उत्तराला पुष्पमाळा घालतात व गाणें ह्मणतात व मिरवणूक पुढें चालू होते. )

उत्तराः—( प्र. क. ) दादा, तुझें स्वगत असो; तूं क्षत्रियवीराला शोभण्यासारखा पराक्रम केलास. तूं आपली कीर्ति अजरामर केलीस. तुला अंतःपुरांत मी टाकून बोललें त्याची तूं मला क्षमा करशील ना ? मला झाल्या गोष्टींचें फार वाईट वाटतें.

पद ३५. चाल—रणवीर वैरी.

भगिनी तुझीच दादा । विनवि कृतापराधा ॥ धृ ॥
मीं बोललें तूला जें स्मरतांच मन्मन लाजे ॥ विसरूनि
जाइ होउ नेदि ममतेसि बाधा ॥ भगिनी ॥ १ बहु
विक्रमासि केलें । कुलनाम थोर झालें ॥ शिशु लघु-
वदने वानु केवि कीर्तिमंत योधा ॥ भगिनी ॥ २ ।

उत्तरः—ताई हें भलतेंच काय बोलतीस ? मीच अंतःपुरांत वृथा वल्गना केल्याबद्दल—

उत्तराः—अंतःपुरांत बोललास तेंच रणांगणावर खरें करून दाखविलेंस. नुसतें बोलणारापेक्षां आणि नुसतें करणारापेक्षा आधीं बोलणारा आणि मग बोलल्याप्रमाणें करून दाखविणारा हाच अधिक श्रेष्ठ.

उत्तरः—ताई, पण मी रणांगणावर कांहींच पराक्रम केला नाहीं. उलट—

उत्तराः—पराक्रम हातून घडला म्हणजे मग मनाला तो मोठा असा वाटतच नाहीं. पराक्रमाचा हिरा विनयाच्या कोंदणांत अधिकच खुलतो. दादा, तुझी मूर्ति लहान पण कीर्ति जगाएवढी होईल. असा पराक्रमी भाऊ लाभल्याबद्दल मला धन्यता वाटते.

उत्तरः—ताई, ताई माफ कर ही स्तुती कानाला ऐकवत नाहीं. झाला हा पराक्रम बृहन्नडा——

उत्तराः—होय बृहन्नडा ही तुझें सारथ्य करायला मिळाली ह्मणून तुला मोठी मदत झाली हें मी नाहीं कुठें म्हणतें आहे ?

उत्तरः—तसें नव्हे ताई, पण खुद्द बृहन्नडेचा पराक्रम——

उत्तराः—होय दादा, बृहन्नडेसारखीनें रणांत सारथ्य करणें हा तिनें झालें तरी मोठाच पराक्रम केला. मी कुठें नाहीं म्हणतें ? पण बृहन्नडा कुठें गेली ? ती तुझ्याबरोबर कां आली नाहीं ? तिचाहि सन्मान सत्कार आह्मांला करायचा होता.

उत्तरः—ताई, बृहन्नडा युद्धसमाप्तीनंतर लवकरच अदृश्य झाली. तिचा मी पुष्कळ शोध केला पण ती मला सांपडली नाहीं. ताई, बृहन्नडा होती म्हणून माझी रणांगणावरची विटंबना टळली. तशीच ती माझ्याबरोबर नगरसमारंभांत हजर असती तर या सत्कारसमारंभानें होणारी विटंबनाहि टळली असती.

उत्तराः—दादा, विनयाला झालें तरी कांहीं सीमा नको का ? तें कांहीं नाहीं, तुला हा सत्कार करून घेतलाच पाहिजे.

उत्तरः—बरें मी नाहीं म्हणून काय होणार ! तुम्हां सर्वांची हौस तरी फिटूं दे. मग माझेंच काय होईल तें होईल.

[ विराट, राणी, सैरंध्री प्रवेश करितात. ]

विराटः—[ हंसून ] कां या सत्कारसमारंभांतहि तुम्हा भावाबहिणींना भांडणाशिवाय चैन पडत नाहींना ? असो; तुम्हां बहीणभावंडाचा प्रेमकलह माझ्या वृद्धपणाच्या संसारसुखांत भरच घालीत आहे. उत्तरे, तुझा खोडकर भाऊ म्हणतो तरी काय ?

उत्तरा:—बाबा, तो म्हणतो की, माझ्या हातून पराक्रम कांहींच घडला नाहीं. मला तुमचा सत्कार नको.

राणी:—भलतेंच कांहीं तरी. अशा मंगलप्रसंगीं असें बोलूं नये.

विराट:—उत्तर म्हणतो तें एकाअर्थीं बरोबर आहे. कारण खऱ्या क्षत्रियाला पराक्रम प्रिय असतो तरी त्याला स्तुति आवडत नाहीं. तरी पण उत्तरा, आजचा हा प्रसंग लोकोत्तर आहे. आज तुझाच काय पण रणामध्यें सामील झालेल्या सर्व लहानथोरांचाहि मी असाच सत्कार करणार आहें. [ आठवण करून ] अरे हो, माझा सहचर समव्यसनी कंकभट कुठें आहे ? त्यानेंहि मोठाच पराक्रम केला. अक्षविद्येप्रमाणें रणविद्याहि त्याला चांगलीच अवगत दिसते.

अमात्य:—तो जुगारी पुराणीक एकदम राजवाड्यांतून नाहींसा झाला म्हणतात.

विराट:—अमात्य, रणांगणावर कंकभटानें कसें शौर्य दाखविलें हें तुम्ही समक्ष पाहिलें असतें म्हणजे तुम्ही त्याला असें टाकून बोलला नसतां.

राणी:—आमच्या दरबारांत सगळींच माणकें झांकलेलीं कशीं होतीं ? बल्लवानेंहि युद्धांत मोठाच पराक्रम केला म्हणतात.

विराट:—मी त्याच्याच तपासांत आहे. त्याची शक्ति त्याच्या शरीराला साजणारी, आणि त्याचा पराक्रम त्याच्या शक्तीला साजण्यासारखा आहे.

उत्तरा:—मी त्याच्या शोधांत होतें. माझ्या विनंतीबरोबर उत्साहानें उडी मारून तो युद्धाला धांवला. मी त्याचा धन्यवाद करणार होतें; पण बाई तोहि एकदम नाहींसा झाला. आणि तशीच बृहन्नडाहि.

विराट:—आतां रहातां सैरंध्रीचे पति गुप्त गंधर्व राहिले. त्यांचा सत्कार करावा असें फार फार वाटतें. पण जीं माणसें डोळ्यासमोर वावरत होतीं तींसुद्धां सत्काराच्या वेळीं अदृश्य झालीं तर हे काय बोलून चालून गुप्त गंधर्व ! हे प्रगट कसे होणार ?

उत्तरा:—मला वाटतें सैरंध्री हें काम खचित करील. सैरंध्री, गडे मी तुला पदर पसरतें, तूं आपल्या पतींना आम्हाला दर्शन देण्याची विनंति करशील ना?

द्रौपदी:—नको नको ताईसाहेब, एवढ्याशा कामाकरितां आपल्यासारख्या राजकान्येनें पदर तो कशाला पसरायला पाहिजे? मी आपणाला वचन देतें कीं ही गोष्ट अगदीं आपल्या मनासारखी घडून येईल.

पद ३५. चाल—पिया पियारटतप पियारा.

करविन कालें प्रगट पती। गुप्त असति ते निज कार्य
वशें। नच त्या लागे पर विनति॥ धृ०॥ बहु त्यां
तुमचा आदर वाटे। कृतज्ञता ही अंतरिं दाटे॥ नि-
घतां मार्गमधले कांटे॥ पाउल होईल त्वरित गति॥
॥ करविन १॥

उत्तर:—( स्वगत ) देवी द्रौपदी अजून आड पडद्यानें बोलते खरी; पण तिचे मनोगत ओळखणारी एक तरी व्यक्ति इथें आहे हें तिला काय माहीत?

विराट:—असो. केवळ सैरंध्रीच्या गुप्त गंधर्व पतींनीं प्रगट होऊन माझ्या सत्काराचा स्वीकार केला तरी माझ्या कृतज्ञता बुद्धीला थोडेसें तरी बरें वाटेल.

अमात्य:—सर्वांनींच आतां राजवाड्याकडे चलावें. [ जातात ]

# अंक ३ प्रवेश ७

[ दरबार. ]

**विराट:**—अमात्य, दरबार खुला झाला; आतां सुयोधनादि वीरांना घेऊन या. शत्रू पराभूत केला तरी त्यालाहि सन्मानानेंच वागविणें योग्य आहे.

**अमात्य:**—आपल्या आज्ञेची स्फूर्ति होऊन मी त्यांना आणविण्याची आगाऊच तजवीज केली होती सरकार.

[ दुर्योधनादि कौरव व शकुनी येतात. ]

**विराट:**—यावें, राजा सुयोधना, तुमचें स्वागत असो. प्रेम हें वैराहून श्रेष्ठ आहे. तुमचें आमचें वैर रणांगणावर होतें. पण यापुढें जन्मभर तुमचें आमचें प्रेमच रहावें अशी माझी इच्छा आहे.

[ दुर्योधन तोंड फिरवून बसतो. ]

**अमात्य:**—शकुनीमामांची समजूत काढण्याचें काम मलाच केलें पाहिजे. पण त्यांना माझ्यावर रागावण्याचें फारसें कारण नाहीं. त्यांच्याबरोबर मलाहि बंदिवान व्हावें लागलें होतें.

**शकुनी:**—होय अमात्यराज. झालें यांत राग मानण्याचें कांहींच कारण नाहीं; आणि असलें तरी त्याचा दोष तुमच्याकडे नव्हता, माझ्याकडेच होता. सर्पानें आपल्या वैऱ्याला चावतांना देखील हसावें अशी आर्य कणिकाची नीतिच आहे. मग स्वतः सर्पच जर वैऱ्याच्या हस्तगत झाला तर त्यानें हंसलेंच पाहिजे. यांत शंका कसली ?

**विराट:**—असो. उत्तरा, आपले उपकारकर्ते गुप्त गंधर्व प्रगट होण्याची कृपा कां बरें करीत नाहींत ?

**उत्तर:**—ते पहा आलेच.

[ पांडव द्रौपदीसह येऊन सिंहासनावर बसतात. ]

**विराट:**—मला भ्रम तर नाहींना झाला ? यांना गुप्त कसे म्हणूं किंवा गंधर्व तरी कसें म्हणूं ? हीतर माझ्या नित्य परिचयाची माणसें.

ऋषी ( प्रवेश करून ):—राजा विराटा, हीं माणसें तुझ्या परिचयाचीं असतील; पण त्यांचा पराक्रम किंवा त्यांची खरी योग्यता यांचा मात्र तुला परिचय नव्हता. मनुष्य आणि गंधर्व यांच्यामध्यें अलौकिक पराक्रमाशिवाय दुसरा फरक कांहींच असत नाहीं. आणि जे अलौकिक म्हणजे नित्य पहायला न सांपडणारें तें गुप्त असें ह्मणायला काय हरकत ? राजा विराटा, हीं आजवर तुझ्या सेवेला राहिलेलीं माणसें कोण आहेत हें तुला माहीत आहे का ?

विराट:—तें माहीत असतें तर त्यांच्या कडून सेवा घेण्याचें पातक मी कसें केलें असतें ?

ऋषी:—ऐक तर. या देहधारी पंच विभूति हे पंच पांडव असून ही त्यांची पत्नी देवी द्रौपदी आहे.

दुर्यो०:—[ तोंड फिरवून आवेशानें ] वाहवा हें ऐकून मला देखील आनंद झाला. धर्मा, भीमा, अर्जुना तुमच्या अज्ञातवासाचें वर्ष अद्यापि पुरें झालेलें नाहीं. मी तुम्हाला शोधून काढण्याच्या प्रयत्नांतच आजवर होतों. माझें सुदैव म्हणून आज तुम्ही आयतेच प्रगट झालां.

ऋषी:—दुर्योधना, तोंडानें सुदैव म्हटल्यानें दैव अनुकूळ होत नसतें. पांडवांच्या अज्ञातवासाचे बारा महिने कालच संपले. वैराच्या मदभरांत तूं कालगणना शास्त्र विसरलास. ज्या चांद्रमास गणनेनें वनवासाचीं बारा वर्षे संपलीं, त्याच गणनेनें अज्ञातवासाचे बारा महिनेहि संपले.

दुर्यो०:—[ आवेशानें ] अरेरे काय करूं; अंतरिक्षातल्या ग्रहांनीं देखील पांडवांचाच पक्षपात करावा काय ?

ऋषी:—दुर्योधना ग्रहगण कुणाचाच पक्षपात करीत नसतात. त्यांचें वैर किंवा त्यांची मैत्री हा सर्व स्वार्थी दुर्बळ मानवी बुद्धीचा खेळ आहे. कालगणना हा फक्त मनुष्यसंकेत आहे. स्वतः ग्रहांना आपल्या गतीची दादहि नसेल.

दुर्यो०:—ठीक आहे. पंचांगबळावर तोंडचे वार जरी जिंकले गेले, तरी लौकीक जगांत अखेर चतुरंग बलच यशस्वी होत असतें. राजा विराटा, पांडव आणि कौरव हे क्षणभरहि एकत्र नांदूं शकत नाहींत. पांडवांचें

तोंडहि पाहण्याची मला इच्छा नाहीं. त्यांची व माझी गांठ यापुढें पडेल ती रणांगणांतच पडेल, आणि जगांत पांडव उरावे कीं कौरव उरावे याचा कायमचा निर्णय तेथेंच लागेल. [ दुर्योधन शकुनी वगैरे जातात. ]

विराटः—सर्वच प्रकार डोळे दिपविण्यासारखा झाला. असो. दुष्ट शत्रू हे ओढून कितीही जवळ आणले तरी कसे येणार ? पण या नवी जोडलेल्या मित्रांचा वियोग मात्र मी कधींही होऊं देणार नाहीं. मी हे त्यांचे पाय असे धरून ठेवीन. [ धर्माच्या पायां पडतो. ]

धर्मः—राजा विराटा, हें भलतेंच काय करतोस ? कृतज्ञता बुद्धीनें आम्हीच तुझे पाय धरिले पाहिजेत. अज्ञातवास पालन करण्याची वेळ आली तेव्हां सर्व जग आम्हाला पारखें वाटलें. राजा, तुझ्या सौजन्यावर आमचा विश्वास नसता तर आम्हीं तुझ्या नगरांत आश्रय घ्यायला आलोंच नसतों. आम्हाला न कळत कां होईना, तूं जो बारा महिने आश्रय दिलास त्यानें आम्हाला जन्माच्या संकट समुद्रांतून उत्तीर्ण केल्याचें श्रेय तुला लाभलेलें आहे. पांडव सदैव तुझे ऋणीच राहतील.

विराटः—माझ्या सौजन्यापेक्षां आपल्या अंगच्या गुणांनींच आपलें रक्षण केलें खरें. शिवाय चुकून माकून मजकडून झालेल्या सहाय्याबद्दल युद्धांत यश मिळवून देऊन आपण जो मोबदला मला दिला त्याचें मूल्यच करवत नाहीं. आपणा सर्वांना मी कशा रीतीनें वागाविलें हें आठवलें म्हणजे मला लज्जा वाटूं लागते, फार काय पृथ्वीमाता मला जागच्याजागीं गिळून टाकील तरी बरें असें वाटतें. हे वीर श्रेष्ठ भीमसेन, त्यांच्या देह रचनेवरूनच यांना मी अलौकिक कोटींतले मानून त्यांना बहुमानास्पद स्थान द्यायला हवें होतें.

भीमः—माझें स्थान बहुमानाचेंच होतें. आपणा सर्वांना माझ्या हातून अन्नदान घडलें, हें पुण्य मला एरवीं कसें लाभणार ?

विराटः—अर्जुनजींची स्थापना प्रथम पासूनच अंतःपुरांत झाल्यामुळें मला त्यांचे दर्शन क्वचितच होत असे. पण त्यांच्या वेषावर विश्वास ठेवून मी आपली फसवणूक करून घेतली आणि त्यांचा न कळत मोठाच उपमर्द केला.

अर्जुनः—यांत उपमर्द कसला ? मातेच्या अंकावर झोंपी गेल्याप्रमा मी अज्ञातवासामध्यें आपल्या अंतःपुरांत सुखी आणि सुरक्षीतच होतों.

विराटः—आपल्या नैतिक तपोबलाचें वर्णन करावें तेवढें थोडें होईल.

राणीः—खुद्द अर्जुनजींना अंतःपुरांत रहाणें प्राप्त झालें, मग द्रौपद माईंना अंतःपुरांत राहावें लागलें याबद्दल बोलायला जागाच उरली नाहीं, पण त्यांना तेथें दासी प्रमाणें वागाविलें हें आठवलें म्हणजे मेल्याहून मेल्या-सारखें होतें.

द्रौपदीः—आमचा वेष आम्हीच खुषीनें पत्करलेला होता. मल दासीप्रमाणें वागावेण्यांत आपली चूक नसून उलट मला सहायच केलेंत.

विराटः—थोरांनीं आपणाकडे कितीही लहानपणा घेतला तरी तो त्यांना शोभूनच जातो. असो. आतां आपल्या अज्ञातवास समाप्ती बद्दल आनंदोत्सव सुरू करण्याची आपली परवानगी असावी.

अमात्यः—महाराज, आयता आनंदोत्सव होणारच आहे तर त्यांत भरीला भर म्हणून एक मंगल कृत्य करण्याची मलाहि परवानगी असावी.

विराटः—तें कोणतें ?

अमात्यः—एक नवरा नवरीचें जोडपें माझ्या स्वाधीन झालें आहे त्याचा विवाह करूं.

विराटः—जोडपें ? तें कोणतें ?

अमात्यः—हा मोत्यांचा कंठा आणि ही रत्नमाला.

उत्तरः—ताईला मी तो आतां मोठ्या आनंदानें बक्षीस देतो.

उत्तराः—कां, तुझा कंठा माझा घरजांवई होणार म्हटलें तें पहा स्वर झालें. दादा, चल. आपण आतां हा विवाहाचा समारंभ थाटानें करूं.

पद ३६. चाल—नहि जोबनवालीका.

विवाह मंगल आतां करूं । सुखें करूं हो सुखें करूं ॥
विवाह ॥ धृ० ॥ मौक्तिक माला रत्नहार हे वधु—वर
सन्मुख उभे करूं ॥ भाऊ बहिणी व्याही विहिणी अंत-
र्पट त्यामध्यें धरूं ॥ कलह प्रेमा विसरूनि जाउनि
प्रेम अखंडित मनीं वरूं ॥ विवाह मंगल १ ॥

**द्रौपदी:**—[ राणीस ] राणीसाहेब, उत्तराताई खेळांतलें लटोपटीचें लग्न लावो; पण तुमचे आमचे भातुकली खेळायचे दिवस आतां दुर्दैवानें राहिले नाहींत. आपणाला तरी खरोखरीच्याच संसाराचा खेळ खेळला पाहिजे नाहीं का?

**राणी:**—मग तो कसा खेळायचा?

**द्रौपदी:**—[ उत्तरेला हातीं धरून ] आपण या चालत्या बोलत्या भावलीचेंच लग्न करूं. आपणा सर्वांच्या वतीनें [ भीम आणि अर्जुनाकडे पाहून ] मी बाळ अभिमन्युकरितां उत्तरेला मागणी घालतें. [ राणीस ] आपण माझी एवढी हौस पुरवाल ना?

पद ३७. चाल—छइ मजगमे अजि.

बहु गुणवती रुचिरस्मिता सून मजसि बहु आवडली ॥
मत्प्रिय बाल अभिमन्युला म्हणा तुम्हीं निज सुता
दिली ॥ धृ० ॥ मंगल खरें खुरें । करूं या प्रेम भरें ॥
जोडु कुलांची साखळी ॥ बहुगुण ॥ १ ॥

**विराट:**—मी कुमार उत्तर भाग्याचा म्हणत होतों; पण माझी उत्तराच अधिक भाग्याची ठरली. काय? पांडव माझे व्याही होणार? माझा धन्यवाद मी कोणत्या शब्दांनी करूं?

( पडदा पडतो. )

भरतवाक्य. चाल—पहा पहा काय सुंदर.

भरतभूमी दास्यरजनी घोर विलया जाउ लवकर ॥
हिमनगाच्या भालपटलीं चमकुदे स्वाराज्य दिनकर ॥
भरत० ॥ धृ० ॥ प्रगटुनी निज गुणगणांना । आक्रमोनी सुपथ नाना । राष्ट्राजिस्थान माना । पावुं दे हा देई शुभ वर ॥ १ ॥

## संगीत वीरविडंबन नाटक समाप्त.

202
नाटक

समाप्त.

# पुरवणी पदें

## अंक १ प्रवेश ३ पान २०

द्रौपदी:—विजय हा माझा नेहमींच आहे.

[ चाल—साजन होरे ]

नरवर मूर्ती, तनुमती किर्ती, पाहुनियां नेत्र मम धाले ॥ अजि बहु काळें ॥ मन माझें सुखी झालें ॥ सरूनी असुखाचा काल आला बरा, काल आला बरा ॥ परतुनी देई सुख सगळें ॥ ध्रु० ॥ सार्थक झालें पर-गृहवासा ॥ सुख न मज यशा वेगळें ॥ १ ॥

## अंक १ प्रवेश ४ पान २३

उत्तर:—चल ताई.

[ चाल—चल जारे बेदरदे ]

चल जाऊं भाऊराया पाहाया मत्प्रिय सखी विजया । कां वल्गना तूं करिसी ॥ ललित कला स्त्री भोग्या नर मत्सरि फसतिल हठाग्रहें जरि करितिल व्यवसाया ॥ ध्रु० ॥ संभाळ संभाळ मौक्तिक माला ॥ धोका तियेला अवचित आला ॥ नाट्यांत नृत्यांत गीतांत नारी ॥ करितील फजीति तव आज भारी ॥ संभाळ संभाळ ॥ मणिमाला आवडती यश येई तिजला रंगपरीक्षा नाहीं टळत तुला ॥ १ ॥

## अंक ३ प्रवेश १ पान ६७

द्रौपदी:—अमात्यांना कैद करा पाहूं.

[ चाल—सुंदरी मोहे का ]

फसवी वेष हा, दासी मजला मानुनियां ॥ अपमान
करूं नका आतां ॥ ध्रु० ॥ वीरसुता मी शापमुक्त
झालें, उभी असे ही सुवीर कांता ॥१॥

## अंक ३ प्रवेश ६ पान ९४

उत्तर:—स्वाभिमानी पुरुषाच्या मनाला जळजळीत निखाऱ्यासारखा चटका देतो.

[ चाल—काहे मारे ]

कां न दिधलें मरण तें ॥ बाहुनी देवराया ॥ ध्रु० ॥
लज्जानल हा मिथ्या स्तुतितैलें ॥ पेटवि चितसम
मम काया ॥ १ ॥ विक्रम परधन चोरिलें अधमें ॥
जाऊ त्वरित भ्रम सर्व लया ॥ २ ॥

ठाणे, ....
२८२ नों. दि ........
........
दि. ....१।१२।७०.
IRBK-0100282
IRBK-0100282